सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | मंगळवार, दि. २९ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १६४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीची केंद्राने घेतली गंभीर दखल

## केंद्रीय पथक महाराष्ट्रात पाहणी करणार; कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह दौरा करणार

**मुंबई :** महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश भूभाग दुष्काळाने प्रभावित झाल्याच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने राज्यातील परिस्थितीची गंभीर दखल घेतली आहे. दुष्काळी परिस्थितीचा प्रत्यक्ष आढावा घेण्यासाठी महाराष्ट्रात केंद्रीय पथक पाठविण्यात येणार असून, केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण आणि ग्रामीण विकासमंत्री शिवराजसिंह चौहान वरिष्ठ अधिकाऱ्यांसह महाराष्ट्राचा दौरा करणार आहेत.

नवी दिल्लीतील पुसा येथील भारतरत्न सी. सुब्रमण्यम सभागृहात आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय कृषी संमेलन-रब्बी अभियान २०२६ च्या उद्घाटन सत्रात ते बोलत होते. यावेळी केंद्रीय कृषी राज्यमंत्री रामनाथ ठाकूर व भागीरथ चौधरी, केंद्रीय कृषी सचिव अतीश चंद्रा, भारतीय कृषी संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. एम. एल. जाट यांच्यासह केंद्र व विविध राज्यांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

महाराष्ट्रातील सुमारे दोन-तृतीयांश क्षेत्र दुष्काळाच्या विळख्यात असल्याचे नमूद करत चौहान यांनी केंद्र सरकार राज्यातील परिस्थितीबाबत गंभीर असल्याचे स्पष्ट केले. महाराष्ट्रासह कर्नाटकातील दुष्काळी परिस्थितीचे केंद्रीय पथक प्रत्यक्ष पाहणी करून आकलन करणार आहे. कर्नाटकात 3 ऑक्टोबर रोजी केंद्रीय पथक दाखल होणार असून, त्यानंतर महाराष्ट्रातही पथक पाठविण्यात येणार आहे. आपण स्वतः वरिष्ठ अधिकाऱ्यांसह या राज्यांचा दौरा करणार असल्याचे चौहान यांनी सांगितले.

महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर रब्बी हंगामातील पीक नियोजन उपलब्ध पाण्याच्या ताळेबंदावर आधारित असावे, असे चौहान यांनी स्पष्ट केले. प्रत्येक राज्य आणि जिल्ह्याने सिंचनासाठी उपलब्ध पाणी तसेच जमिनीतील ओलावा यांचे मूल्यमापन करून त्यानुसार पिकांची निवड करावी.

पाणीटंचाई असलेल्या महाराष्ट्रातील भागांमध्ये



कमी पाण्यात येणाऱ्या कडधान्ये आणि तेलबिया पिकांना प्राधान्य द्यावे. पुरेशी सिंचन सुविधा असलेल्या भागात उपलब्ध पाण्यानुसार अन्य पिकांचे नियोजन करावे. उपलब्ध पाण्यापेक्षा अधिक पाण्याची गरज असलेले पीक घेतल्यास नंतर पाणीटंचाईमुळे पीक संकटात येण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

महाराष्ट्रासह कर्नाटक, तेलंगणा आणि आंध्र प्रदेशातील दुष्काळी परिस्थितीचा संदर्भ देताना पाण्याची उपलब्धता, जमिनीतील ओलावा आणि त्यानुसार योग्य पीक यांचे नियोजन आधीच करणे आवश्यक असल्याचे चौहान यांनी सांगितले. पेरणीला विलंब झाल्यास उगवण आणि उत्पादनावर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांनी बियाणे, खते आणि अन्य निविष्ठांची पूर्वतयारी करून वेळेत पेरणी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

महाराष्ट्रात कडधान्ये-तेलबियांचे क्षेत्र वाढविण्यावर भर

- धान कापणीनंतर रिकाम्या राहणाऱ्या क्षेत्रात हरभरा, मसूर आणि मोहरीसारख्या कडधान्ये व तेलबिया पिकांची लागवड वाढविण्याचे आवाहन करण्यात आले. कमी पाण्यात येणाऱ्या या पिकांमुळे उपलब्ध जलस्रोतांचा कार्यक्षम वापर होण्याबरोबरच देशाची कडधान्ये व खाद्यतेल क्षेत्रातील आत्मनिर्भरता वाढण्यास मदत होईल. - राज्यांनी रब्बी हंगामातील कडधान्याखालील क्षेत्र आणि उत्पादनाचे निश्चित लक्ष्य ठरवावे तसेच शेतमालाच्या खात्रीशीर खरेदीची व्यवस्था आधीच तयार ठेवावी, असे निर्देश देण्यात आले. राज्यांकडून वेळेत खरेदी न झाल्यास नाफेड आणि एनसीसीएफ या केंद्रीय संस्था थेट शेतकऱ्यांकडून खरेदी करतील, असे चौहान यांनी स्पष्ट केले. - रब्बी हंगामासाठी बियाण्यांची मागणी, उचल आणि वितरणाचा आराखडा आगाऊ तयार ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्रातील विविध हवामान पट्टे आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घेऊन योग्य वाणांची निवड व वेळेत उपलब्धता सुनिश्चित करण्यावर भर देण्यात आला.कृषी विद्यापीठे, भारतीय कृषी संशोधन परिषद आणि कृषी विज्ञान केंद्रांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योग्य वाण आणि पीक व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन देण्याचे आवाहन करण्यात आले.

# एकल माता कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र धोरणाचा मार्ग मोकळा

## ‘शैक्षणिक सहाय्य, संरक्षण आणि सक्षमीकरण धोरण-2026’साठी समितीचा अहवाल सादर

**मुंबई :** एकल माता पालक कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेताना भेडसावणाऱ्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक अडचणी लक्षात घेऊन त्यांच्यासाठी सर्वसमावेशक धोरण तयार करण्याच्या दिशेने राज्य सरकारने पुढचे पाऊल टाकले आहे. या विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहाय्य, विविध सुविधा आणि संरक्षण देण्याच्या उद्देशाने प्रस्तावित ‘शैक्षणिक सहाय्य, संरक्षण आणि सक्षमीकरण धोरण-२०२६’साठी गठित करण्यात आलेल्या समितीने आपला अहवाल शासनाला सादर केला आहे. या अहवालाच्या आधारे धोरणाच्या पुढील कार्यवाहीला दिशा मिळणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सोमवारी दिली.

एचएसएनसी विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. हेमलता बागला यांच्या अध्यक्षतेखाली नऊ सदस्यीय समितीची स्थापना करण्यात आली होती. महाविद्यालयीन प्राचार्य, कायदे तज्ज्ञ आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या सामाजिक कार्यकर्त्यांचा समितीत समावेश होता. समितीने केलेल्या अभ्यासाच्या आधारे तयार करण्यात आलेला अहवाल उच्च शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर आणि सहसंचालक डॉ. अर्चना बोऱ्हाडे यांच्याकडे सादर करण्यात आला.

मंत्रालयात झालेल्या आढावा बैठकीत समितीच्या अहवालावर सविस्तर चर्चा करण्यात आली. एकल माता पालक कुटुंबातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या काळात कोणत्या प्रकारचे शैक्षणिक सहाय्य, सुविधा आणि संरक्षण उपलब्ध करून देता येईल, याबाबत बैठकीत विचारविनिमय झाला. प्रस्तावित धोरणाचा लाभ देताना संबंधित विद्यार्थी किंवा विद्यार्थिनीची संमती घेण्याच्या मुद्द्यावरही चर्चा करण्यात आली.

# चाकण 'एमआयडीसी'मधील कोंडी फोडण्यासाठी साठी 1 हजार 826 कोटींचा आराखडा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस; डिसेंबरपासून कामांना सुरुवात करण्याचे नियोजन

**मुंबई :** औद्योगिक पट्ट्यामुळे सातत्याने वाढणारी वाहतूक कोंडी, पावसाळ्यात साचणारे पाणी, अपुरी रस्ते व्यवस्था आणि नागरी सुविधांवरील ताण दूर करण्यासाठी चाकण आणि हिंजवडीसाठी एकात्मिक पायाभूत विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. चाकणमधील रस्ते, वाहतूक आणि पावसाळी पाणी निचऱ्यासह विविध नागरी सुविधांसाठी १ हजार ४०० कोटी रुपयांच्या, तर हिंजवडीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी ४२६.५४ कोटी रुपयांच्या आराखड्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तत्त्वतः मंजुरी दिली. डिसेंबरपासून कामे सुरू करून पुढील पावसाळ्यापूर्वी चाकणमधील वाहतूक आणि पाणी निचऱ्याच्या समस्येत लक्षणीय सुधारणा करण्याचे नियोजन आहे.

सह्याद्री अतिथीगृहात सोमवारी झालेल्या बैठकीत पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी या आराखड्याचे सादरीकरण केले. नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह विविध विभागांचे सचिव या वेळी उपस्थित होते. चाकणच्या विकासकामांसाठी एमआयडीसी, पीएमआरडीए, सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद आणि अन्य संबंधित यंत्रणांनी स्वतंत्रपणे काम न करता समन्वयाने काम करावे, तसेच विविध विभागांच्या निधीचा एकत्रित वापर करावा, असे निर्देश फडणवीस यांनी दिले. चाकण औद्योगिक परिसरातील पावसाळी पाणी निचऱ्याचा प्रश्न आराखड्यात प्राधान्याने हाती घेण्यात आला आहे. परिसरातील सुमारे ७८ किलोमीटर लांबीच्या नैसर्गिक नाल्यांवर अतिक्रमणे झाल्याने पाण्याचा प्रवाह अडत असल्याचे सर्वेक्षणात आढळले आहे. परिणामी पावसाळ्यात औद्योगिक आस्थापनांमध्ये पाणी शिरणे, वाहतूक विस्कळित होणे आणि काही वेळा कंपन्यांचे कामकाज बंद ठेवण्याची परिस्थिती निर्माण होते.

नैसर्गिक नाले मोकळे करणे, रस्त्यांच्या दोन्ही बाजूंना पावसाच्या पाण्याच्या निचऱ्याची व्यवस्था करणे, कल्व्हर्ट आणि पुलांची क्षमता वाढविणे तसेच आवश्यक ठिकाणी पाणी साठविण्याची व्यवस्था उभारण्याचे नियोजन आहे. सिंचन विभागाच्या सर्वेक्षणाच्या आधारे नाल्यांचे मार्ग निश्चित करण्यात आले आहेत. नाल्यांवरील अतिक्रमणे हटविण्याची सुमारे ७० ते ८० टक्के कार्यवाही पूर्ण झाली असून उर्वरित अडथळे टप्प्याटप्प्याने दूर केले जाणार आहेत. काही ठिकाणी बांधकामे हटवावी लागणार असून काही ठिकाणी नैसर्गिक नाल्यांसाठी जागा उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे.

# माहितीचा अधिकार अधिनियमातील तरतुदींचे सातत्याने वाचन करा – विजय देशमुख

***छत्रपती संभाजीनगर, दि. 28 :-*** माहितीचा अधिकार अधिनियमातील विविध तरतुदींचे सातत्याने वाचन करून त्यातील नियम समजून घेणे आवश्यक आहे. अधिनियमातील तरतुदी व नियमांची योग्य माहिती असल्यास माहिती अधिकाऱ्यांना कोणतेही दडपण न घेता विहित प्रक्रियेनुसार आणि निर्धारित कालावधीत माहिती देणे सुलभ होते, असे प्रतिपादन माहिती अधिकार कायद्याचे तज्ज्ञ तथा महिला व बालविकास विभागाचे स्वेच्छानिवृत्त जिल्हा परिविक्षा अधिकारी विजय देशमुख यांनी केले.



आंतरराष्ट्रीय माहिती अधिकारी दिनानिमित्त विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री.देशमुख म्हणाले, यामाहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत अर्जदारांना विहित कालावधीत माहिती उपलब्ध करून द्यावी. माहिती अधिकारी म्हणून कार्य करताना उपलब्ध अभिलेख, अधिनियमातील तरतुदी आणि नियमांची अचूक माहिती असणे आवश्यक आहे. माहिती देताना अधिकाऱ्यांची जबाबदारी महत्त्वाची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी विविध उदाहरणांच्या माध्यमातून माहितीचा अधिकार अधिनियमाच्या अंमलबजावणीतील बारकावे स्पष्ट केले.

यावेळी सहआयुक्त मंजुषा मिसकर यांनी देशमुख यांचा परिचय करून दिला. त्यांच्या मार्गदर्शनातून अधिकारी व कर्मचाऱ्यांना माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत कामकाज करताना आवश्यक असलेल्या विविध नियमांची माहिती मिळणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच देशमुख यांनी उदाहरणांसह स्पष्ट केलेल्या बाबींचा अधिकारी व कर्मचाऱ्यांनी दैनंदिन कामकाजात उपयोग करून घ्यावा, असे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत कामकाज करताना येणाऱ्या विविध अडचणी व शंकांबाबत प्रश्न उपस्थित केले.

# पदवीधर मतदारसंघ निवडणूक; आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि. २८ - औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर झाल्याने दि. २२ सप्टेंबरपासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू आहे. निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण, निर्भय व सुरळीत पार पाडण्यासाठी कायदा व सुव्यवस्था तसेच आवश्यक सुरक्षा उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा सहायक निवडणूक निर्णय अधिकारी विनय गौडा जी. सी. यांनी दिले आहेत.

ध्वनीक्षेपक वापरावर निर्बंध

निवडणूक आचारसंहिता कालावधीत पोलीस अधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सकाळी ६ ते रात्री १० वा. नंतर कोणत्याही फिरत्या वाहनावर वा कोणत्याही क्षेत्रात ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही. सर्व राजकीय पक्ष आणि उमेदवार, इतर व्यक्ती यांनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाचा वापर करावा, त्यासाठी परवानगी घ्यावी व त्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना द्यावी,असे आदेश जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी निर्गमित केले आहेत. हे आदेश दि.२५ जून पर्यंत अंमलात राहतील असेही त्यांनी स्पष्ट केले आहे.

# निवडणूक आयोगाच्या स्पष्टीकरणाने आरोपांवरील संभ्रम दूर : धनंजय जाधव

**अहिल्यानगर :** निवडणूक आयोगाच्या तीनही आयुक्तांच्या बैठकीनंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनामुळे स्पेशल इंटेंसिव्ह रिव्हिजन (SIR), आयोगाच्या निर्णयप्रक्रियेबाबत निर्माण झालेला संभ्रम दूर झाला आहे. आयोगाचे प्रमुख निर्णय सर्वसंमतीने झाल्याचे स्पष्ट झाले असून, घटनात्मक संस्थांवर आरोप करण्याऐवजी अधिकृत कागदपत्रे आणि तथ्यांच्या आधारे भूमिका मांडावी, असे आवाहन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले.२६ सप्टेंबर रोजी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच निवडणूक आयुक्त डॉ. एस. एस. संधू आणि डॉ. विवेक जोशी यांची बैठक झाली. त्यानंतर जारी करण्यात आलेल्या संयुक्त निवेदनात SIRसह प्रमुख निर्णय संपूर्ण आयोगाच्या संमतीने घेतल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

SIR प्रक्रियेचा उद्देश पात्र मतदारांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित करणे नसून मतदार याद्या अधिक अचूक व अद्ययावत करणे हा असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. पात्र नागरिक, स्थलांतरित मजूर, बेघर नागरिक आणि प्रक्रियेत सहभागी होऊ न शकलेल्या व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी यंत्रणेमार्फत प्रयत्न केले जात असल्याचे जाधव यांनी नमूद केले.

कॅबिनेट सचिवांना पाठविलेल्या पत्राबाबतही आयोगाने स्पष्टीकरण दिले असून, त्याचा SIRशी संबंध नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच SIRदरम्यानच्या फॉर्म-६च्या घोषणापत्राबाबतही अधिकृत नियम व न्यायालयीन प्रक्रियेच्या आधारे वस्तुस्थिती तपासणे आवश्यक असल्याचे जाधव यांनी सांगितले. निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून तिच्या निर्णयांवर प्रश्न उपस्थित करण्याचा अधिकार सर्वांना आहे. मात्र आरोप करताना तथ्ये, अधिकृत कागदपत्रे आणि कायदेशीर प्रक्रियेचा आधार घेतला पाहिजे.

# दुष्काळाच्या आव्हानात छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्याचा बॉयलर पेटला

## 26व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ; शेतकऱ्यांनी हक्काचा ऊस कारखान्यालाच द्यावा – रामचंद्र भोगले

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर यंदाचा ऊस गळीत हंगाम कारखाना आणि ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक असतानाच, दीनदयाळनगर येथील **छत्रपती संभाजी राजे साखर उद्योग लि.**च्या २६व्या ऊस गळीत हंगामासाठी शनिवारी (दि. २६) बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले. प्रसिद्ध उद्योगपती तथा कारखान्याचे संचालक रामचंद्र निळकंठ भोगले यांच्या हस्ते आणि ह.भ.प. भानुदास महाराज आपेगावकर यांच्या आशीर्वादाने



हा सोहळा पार पडला.

कारखान्याचे बॉयलर पूजन जनरल मॅनेजर डिगंबर बडदे व सौ. सीमा बडदे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी रामचंद्र भोगले म्हणाले की, यंदाची दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता शासनाने साखर कारखाने १५ ऑक्टोबरपर्यंत सुरू करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार कारखान्याच्या २६व्या गळीत हंगामासाठी आज बॉयलर अग्निप्रदीपन करण्यात आले.

यंदा दुष्काळाचे संकट असल्याने कारखान्यासह ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी हा काळ आव्हानात्मक आहे. वरुणराजाची कृपादृष्टी होऊन परतीचा पाऊस लवकर व्हावा, अशी ईश्वरचरणी प्रार्थना करत असल्याचे भोगले यांनी सांगितले. तसेच शेतकऱ्यांनी आपला ऊस आपल्या हक्काचा साखर कारखाना असलेल्या छत्रपती संभाजी राजे साखर कारखान्यास देऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कारखान्याचे उपाध्यक्ष दामोधर हरिभाऊ नवपुते होते. यावेळी संचालक विवेकजी देशपांडे, प्रकाश काकडे यांच्यासह चिफ इंजिनीयर राजेंद्र भागवत, चिफ केमिस्ट मुरलीधरराव केदारे, मुख्य शेतकी अधिकारी नानाभाऊ कुटे, वसुली अधिकारी बाळासाहेब बागडे, इथेनॉल प्लॅन्ट इनचार्ज सिताराम खराद, ॲग्रो कंपनीचे कृषी अधिकारी अमोल सोहळे तसेच इतर अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते.

याशिवाय ऊस उत्पादक शेतकरी, तोडणी व वाहतूक ठेकेदार आणि कारखान्याचे हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालक विवेकजी देशपांडे यांनी २६व्या गळीत हंगामासाठी शुभेच्छा देत उपस्थितांचे आभार मानले.

# शेलगाव अन् गेवराई गुंगी येथे आमदार अनुराधा चव्हाण यांच्याकडून बांधावर जाऊन पिकांची पाहणी

**फुलंब्री :** फुलंब्री तालुक्यात ओढावलेल्या तीव्र दुष्काळी परिस्थितीमुळे मका आणि कापूस या पिकांसह अन्य पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शेलगाव व गेवराई गुंगी येथे दि.२७रविवारी लोकप्रतिनिधी आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी थेट शेताच्या बांधावर जाऊन बाधित पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली आणि हवालदिल झालेल्या शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांना धीर दिला.

तालुक्यात पावसाच्या अभावाने शेतातील मका व कापसाची पिके जळून व वाळून खाक झाली आहेत. या कठीण प्रसंगात आमदार अनुराधा चव्हाण, जिल्हा परिषद उपाध्यक्ष जितेंद्रबाबा जैस्वाल, पंचायत समिती सभापती सर्जेराव मेटे, जि. प. सदस्य गोपाळ वाघ, पं. स. सदस्या सविताताई कोलते, माजी सभापती सविताताई फुके, अजिनाथ सोनवणे आणि गणेश तांबे यांनी स्थानिक प्रशासकीय यंत्रणेसह नुकसानग्रस्त भागाचा दौरा केला. या पाहणी दौऱ्यात उपविभागीय अधिकारी (एस.डी.एम.) पूजा वंजारी, तहसीलदार योगिता खटावकर, नायब तहसीलदार संजय राऊत व तालुका कृषी अधिकारी पंकज वाकळे हेदेखील उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी राज्यातील २६४ तालुक्यांमध्ये अधिकृतपणे दुष्काळ जाहीर केला आहे. या निर्णयामुळे ऐन संकटाच्या काळात बाधित शेतकऱ्यांना शासकीय मदत, विविध सवलती व आर्थिक दिलासा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. "संकटाच्या या काळात महायुती सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे," असा पुनरुच्चार उपस्थित नेत्यांनी पाहणीदरम्यान केला.

पाहणीदरम्यान शेतातील जळून गेलेली पिके दाखवताना शेतकरी बांधवांचे डोळे पाणावले होते; त्यांनी आपल्या व्यथा लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्यांसमोर मांडल्या. त्यावर उत्तर देताना प्रशासकीय अधिकाऱ्यांनी नुकसानीचे त्वरित व वस्तुनिष्ठ पंचनामे करून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला लवकरात लवकर भरपाई मिळवून देण्यासाठी पाठपुरावा केला जाईल, असे ठाम आश्वासन दिले. या पाहणी दौऱ्याप्रसंगी परिसरातील शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आदर्श शिक्षकरत्न पुरस्कारासाठी सुरज आव्हाड यांची निवड

तभा वृत्तसेवा

**पैठण दि २८ :-** देवदान बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, सांगली यांच्या वतीने राज्यस्तरीय ‘आदर्श शिक्षकरत्न पुरस्कार २०२६’ जाहीर करण्यात आला आहे.

५ सप्टेंबर २०२६ रोजी जाहीर झालेल्या पुरस्कार यादीत सुरज दिलीपराव आव्हाड यांचा समावेश आहे.

सुरज आव्हाड हे भवानीनगर, ता. पैठण, जि. छत्रपती संभाजीनगर येथील रहिवासी आहेत.

ते सध्या शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र, खेड, जि. रत्नागिरी येथे कार्यरत आहेत.

ते निदेशक या पदावर कार्यरत असून विद्युत तंत्रज्ञान क्षेत्रात सेवा बजावत आहेत.



यापूर्वी त्यांनी शासकीय तंत्रनिकेतन, अंबड येथे अतिथी अधिव्याख्याता, मॅट्रिक्स लाईफ सायन्स कंपनी येथे ट्रेनी इंजिनिअर, तसेच नाथ तंत्रनिकेतन, एम.आय.डी.सी पैठण येथे प्रभारी विद्युत विभाग प्रमुख म्हणून कार्य केले आहे.

तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासासाठी ते कार्यरत आहेत.

त्यांच्या शैक्षणिक व तांत्रिक क्षेत्रातील योगदानाची दखल घेत त्यांची राज्यस्तरीय पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

या निवडीमुळे पैठण तालुक्याचे नाव राज्यस्तरावर अधोरेखित झाले आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल विद्यार्थी, सहकारी, मित्रपरिवार व नागरिकांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# ना. पंकजाताई मुंडे यांच्या बीड संपर्क कार्यालयाचे आगळेवेगळे लोकार्पण

### मुंडे साहेबांची प्रतिमा अन् अनाथ मुलींच्या साक्षीने केला प्रवेश



सर्व सामान्य नागरिकांशी सुलभ संवाद आणि त्यांचे प्रश्न गतीने सोडविण्यासाठी हे कार्यालय माध्यम बनेल - ना. पंकजाताई मुंडे

बीड दि. २७ --- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी शहरात आपले नवे संपर्क कार्यालय सुरू केले असून त्याचे आगळेवेगळे लोकार्पण आज मोठ्या थाटात पार पडले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेबांची प्रतिमा आणि अनाथ मुलींच्या साक्षीने त्यांनी नव्या कार्यालयात प्रवेश करून लोकार्पण केले. जनसेवेचा वसा अधिक दृढ करून सर्व सामान्यांचे प्रश्न या कार्यालयाच्या माध्यमातून जलदगतीने सोडविले जातील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

नगर रोडवरील तहसील कार्यालयाच्या समोर साधना अव्हेन्यू व्यापारी संकुलात हे संपर्क कार्यालय आजपासून जनसेवेत रूजू झाले. दुपारी ना. पंकजाताई मुंडे यांनी लोकनेते मुंडे साहेबांच्या लोकसेवेचा वसा अधिक क्षमतेने चालवण्याचा संकल्प घेऊन त्यांची प्रतिमा हातात घेऊन आणि कु.गायत्री रामकिसन सवंडकर, वेदिका विष्णू आगे, हर्षदा विद्यासागर सोनवणे या अनाथ मुलींच्या हस्ते फित कापून संपर्क कार्यालयाचे उद्घाटन केले.याप्रसंगी माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे, माजी आमदार बदामराव पंडित, केशवराव आंधळे, युवा नेते अक्षय मुंदडा, योगेश क्षीरसागर, भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, आदित्य सारडा तसेच भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे कार्यालय सर्व सामान्य नागरिकांसाठी माध्यम बनेल

लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांनी तळागाळातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी संपूर्ण आयुष्य खर्ची केले. त्यांच्या सेवावृत्तीचा संकल्प दृढ करताना अधिकाधिक नागरिकांशी संवाद व्हावा, त्यांचे प्रश्न सोडविता यावेत या हेतूने बीड शहरातील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर हे नवे संपर्क सुरू केले आहे. या कार्यालयातून प्रत्येकाच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. नागरिकांचे प्रश्न, त्यांच्या अडचणी मार्गी लावताना नागरिकांशी थेट संपर्क आणि संवाद साधण्याचे लोकोपयोगी कार्य या संपर्क कार्यालयातून होईल असा विश्वास ना. पंकजाताईंनी यावेळी व्यक्त केला.

# अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशनचा पदग्रहण समारंभ

### डॉक्टरांनी आपल्या आरोग्याप्रती सजग असावे - डॉ.आनंद वैद्य, संघटना समाजाभिमुख हवी - डॉ.राजेश इंगोले

**अंबाजोगाई :** येथील अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशनच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण समारंभ नुकताच आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ.आनंद वैद्य तर प्रमुख अतिथी म्हणून वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे, इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले, महाराष्ट्र डेंटल कौन्सिलचे अध्यक्ष डॉ.नरेंद्र काळे, डॉ.दिनकर राऊत, प्रा. रवींद्र पाठक, प्रा.विजयकुमार बिदरकर यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरूवात मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्ज्वलनाने व धन्वंतरी पूजनाने झाली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सत्कार करून त्यांना पदभार देण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संघटनेचे नवनिर्वाचित सचिव बालरोग तज्ज्ञ डॉ.संदीप जोगदंड



यांनी सांगितले की, संघटनेला बळकटी देऊन संघटनेच्या सर्व सदस्यांना एकत्रित करून संघटना ही समाजाभिमुख करण्याचा नवीन कार्यकारणीचा प्रयत्न राहील तसेच संघटनेच्या सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने आवश्यक निर्णय घेतले जातील असे प्रतिपादन डॉ.जोगदंड यांनी केले. तर अधिष्ठाता डॉ.शंकर धपाटे यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन व अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर असोसिएशन यांनी सरकारी दवाखान्यांमध्ये मनुष्यबळ कमी पडत असल्यामुळे आपली सेवा द्यावी असे आवाहन केले. तसेच आय.एम.एने सरकारी रूग्णालयांमध्ये डॉक्टरांवर होणाऱ्या अन्यायाबाबत हस्तक्षेप करीत पाठिंबा द्यावा अशी विनंती केली. याप्रसंगी इंडियन मेडिकल असोसिएशनचे प्रदेश उपाध्यक्ष डॉ.राजेश इंगोले यांनी नेहमीप्रमाणेच आपल्या जोशपूर्ण भाषणामध्ये अंबाजोगाई मेडिकल प्रॅक्टिशनर्स असोसिएशन येणाऱ्या आगामी काळामध्ये नवनियुक्त पदाधिकाऱ्यांच्या कार्यकर्तृत्वामुळे निश्चितपणे एका वेगळ्या उंचीवर जाईल असे सांगितले. नव्यांचा जोश आणि जुन्यांचा होश यामुळे संघटनेला निश्चितपणे सकारात्मक दिशा मिळेल आणि संघटनेद्वारे भविष्यामध्ये अनेक चांगले उपक्रम राबविण्यात येतील अशी अपेक्षा व्यक्त केली. संघटनेने सर्व डॉक्टर्स मध्ये समन्वय साधून हे सर्व डॉक्टर समाजाभिमुख कसे होतील एकमेकांच्या सुखदुःखामध्ये कसे सहभागी होतील आणि यांची नाळ एकमेकांशी कशी जोडली जाईल याबाबत विशेष लक्ष देण्याची गरज असल्याचे डॉ.राजेश इंगोले यांनी सांगितले. संघटनेमार्फत डॉक्टर्ससाठी विविध सांस्कृतिक कला क्रीडा कार्यक्रम तसेच अकॅडमी वैद्यकीय परिषदा नूतन कार्यकारणीने घ्याव्या तसेच समाजासाठी विविध आरोग्य शिबीर, व्यसनमुक्ती शिबिरे आरोग्य जनप्रबोधन शिबिरे आयोजित करावी असे सुचविले. या कामी जी काही मदत लागेल ती आम्ही करू असे आश्वासन डॉ.राजेश इंगोले यांनी यावेळी दिले. डॉ.नरेंद्र काळे यांनी संघटनेमध्ये वैयक्तिक हेवेदावे न ठेवता सर्व सदस्यांनी एकत्रितपणे मिळून संघटनेचे कार्य करावे आणि संघटनेला नांवारूपाला आणावे अशी अपेक्षा व्यक्त केली. केज आय.एम.एचे अध्यक्ष डॉ.दिनकर राऊत यांनी अंबाजोगाई येथे सर्व पॅथीचे डॉक्टर्स मिळून गुण्यागोविंदाने एक संघटना चालवतात, विविध उपक्रम राबवतात, एकमेकांच्या सुखदुःखामध्ये सहभागी होतात ही मनाला समाधान देणारी गोष्ट असल्याचे सांगत ही परंपरा जपली गेली पाहिजे असे आवाहन उपस्थितांना केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.आनंद वैद्य यांनी डॉक्टरचे आपल्या दैनंदिन वैद्यकीय सेवेमध्ये इतके व्यस्त असतात की, त्यांना स्वतःच्या आरोग्याकडे स्वतःच्या प्रकृतीकडे लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. आणि निरोगी स्वास्थ्य ही जीवनाची खरी संपत्ती आहे हे उमगेपर्यंत वेळ निघून गेलेली असते. त्यामुळे प्रत्येक डॉक्टरने आपल्या आयुष्यामध्ये आपल्यासाठी वेळ काढून निरोगी शरीर निरोगी मन आणि उत्तम भावनिकता राखण्यासाठी विविध प्रकारचे व्यायाम ध्यान साधना नियमितपणे केली पाहिजे असे प्रतिपादन केले. यावेळी ऍम्पाच्या माजी अध्यक्ष डॉ.सुलभा पाटील व माजी सचिव डॉ.ऋषिकेश घुले यांनी नूतन अध्यक्ष निशिकांत पाचेगावकर व नूतन सचिव डॉ.संदीप जोगदंड यांना पदभार दिला. यावेळी डॉ.प्रिया मुळे, डॉ.अस्लम खान, डॉ.वेणू गोपाल आगळे, डॉ.स्नेहल पेस्टे, डॉ.इम्रान पटेल, डॉ.स्वाती हारे, डॉ.प्रवीण जोशी, डॉ.सचिन कस्तुरे, डॉ.पूजा लोमटे, डॉ.नझीरूद्दीन सय्यद, डॉ.शिवाजी मस्के या नूतन पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदांचा कार्यभार स्वीकारला. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन डॉ.प्रिया तिडके व कु.सई हारे यांनी केले. तर आभार प्रदर्शन ज्येष्ठ सदस्य डॉ.शिवाजी मस्के यांनी केले.

# श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा स्तुत्य उपक्रम; विम्याच्या रकमेतून कर्जाची परतफेड करून वारसांना सोने परत

श्री मंगलनाथ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी, माजलगाव या संस्थेने आजपर्यंत २३५ कोटी रुपयांपेक्षा अधिक सोनेतारण कर्जाचे वाटप केले आहे. कर्जदार सभासदाच्या आकस्मिक मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबावर कर्जाचा आर्थिक भार पडू नये, या सामाजिक बांधिलकीतून संस्था सोनेतारण कर्जासह विविध प्रकारच्या कर्जांसाठी नियमितपणे कर्ज विमा संरक्षणाची योजना राबवत आहे.

संस्थेचे कर्जदार सभासद श्री. जगताप नारायण गंगाराम यांचा अपघाती मृत्यू झाला होता. त्यांच्याकडे संस्थेचे सोनेतारण कर्ज 150000/- होते. त्यांच्या अपघाती मृत्यूची माहिती मिळताच संस्थेने विमा कंपनीकडे आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून विमा रक्कम मिळविण्यासाठी पाठपुरावा केला.



विमा कंपनीकडून विम्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतर संस्थेने श्री. जगताप यांचे संपूर्ण कर्ज बेबाकी केले. व संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. रवींद्र कानडे यांच्या हस्ते मृत सभासदाच्या कुटुंबीयांना तारण ठेवलेले सोने परत करण्यात आले. संस्थेच्या या उपक्रमामुळे मृत सभासदाच्या कुटुंबाला मोठा आर्थिक दिलासा मिळाला.

याप्रसंगी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ॲड. रवींद्र कानडे यांनी सांगितले की, संस्थेमार्फत सोनेतारण कर्ज तसेच इतर विविध प्रकारच्या कर्जांसाठी पात्र कर्जदार सभासदांचा विमा काढण्यात येतो. कर्जदार सभासदाचा दुर्दैवी मृत्यू झाल्यास त्यांच्या वारसांवर कर्जाचा भार पडू नये आणि सामाजिक दुःखासोबत आर्थिक संकटालाही सामोरे जावे लागू नये, हा या योजनेमागील मुख्य उद्देश आहे.सभासदांचे आर्थिक हित जपणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे आणि ठेवीदार व कर्जदार सभासदांना आर्थिक सुरक्षितता प्रदान करणे, याला संस्थेने नेहमीच प्राधान्य दिले आहे. सभासदांच्या आर्थिक सुरक्षिततेसोबतच त्यांच्या कुटुंबाच्या भविष्याची काळजी घेणारा श्री मंगलनाथ मल्टीस्टेटचा हा उपक्रम सहकार क्षेत्रातील सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरत आहे.

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना धीर देत जाणून घेतल्या व्यथा

### शेतकऱ्यांचा बळी जाऊ देणार नाही



परळी वैजनाथ, दि. २६ --

पावसाने ओढ दिल्याने तालुक्यात निर्माण झालेल्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांनी आज लिंबोटा, पांगरी आणि कन्हेरवाडी शिवारात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसान झालेल्या पिकांची पाहणी केली. शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी व व्यथा त्यांनी जाणून घेतल्या. आमच सरकार हे बळीराजाचं आहे, त्यामुळे त्याचा बळी आम्ही जाऊ देणार नाही, शेतकऱ्यांना भरीव मदत दिली जाईल अशी ग्वाही त्यांनी दिली.

यंदा पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने तूर, सोयाबीन, कापूस यांसह विविध पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी पिके हाताशी आलेली असतानाच पावसाअभावी वाया गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता असून शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या पाहणी दरम्यान शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी व नुकसानीची माहिती पंकजाताई मुंडे यांच्यासमोर मांडली. पिकांचे झालेले नुकसान, पावसाची कमतरता आणि त्यातून निर्माण झालेली आर्थिक परिस्थिती याबाबत त्यांनी शेतकऱ्यांशी सविस्तर संवाद साधला.

धीर सोडू नका; सरकार पूर्ण ताकदीने पाठीशी

यावेळी शेतकऱ्यांना धीर देताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या,कमी पावसामुळे पिके वाया गेली असली तरी कोणीही धीर सोडू नका. हे सरकार पूर्ण ताकदीने तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. बाधित शेतकऱ्यांना लवकरात लवकर आणि भरीव मदत मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. मी मराठवाड्याचीच लेक आहे, त्यामुळे इथली परिस्थिती चांगल्या प्रकारे जाणते. शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाची शासनान

# स्वामी विवेकानंद शाळेमध्ये शिक्षक प्रबोधन शिबिर कार्यक्रम संपन्न




**केज प्रतिनिधी:**दि. २७ सप्टेंबर-

जीवन विकास शिक्षण मंडळ केज संचलित, स्वामी विवेकानंद विद्यामंदिर [ माध्यमिक विभाग ] या शाळेमध्ये शिक्षक प्रबोधन शिबिर हा कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून समाजसेवक प्रा. हनुमंत भोसले तर प्रमुख पाहुणे अहिल्यानगर येथील प्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ, लेखक आणि सामाजिक कार्यकर्ते हेरंब कुलकर्णी हे उपस्थित होते. इतर उपस्थित मान्यवरांमध्ये जीवन विकास शिक्षण मंडळ संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे, सचिव जी. बी. गदळे, सहसचिव उपेंद्र कोकीळ, प्राचार्य हनुमंत सौदागर, स्वयंअर्थ शाळेचे शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नारायणराव अंधारे, शाळेच्या मुख्याध्यापिका शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंत शितोळे, स्व. प्रमोद महाजन क. म. चे प्राचार्य शंकर भैरट, स्वयंअर्थ शाळेचे मु. अ. अविनाश कराड तसेच परिसरातील सर्व शिक्षक, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व पाहुण्यांचा परिचय प्राचार्य हनुमंत सौदागर यांनी दिला. याप्रसंगी ते म्हणाले, मी स्वतः त्यांची पुस्तके वाचलेली आहेत. खरोखरच त्यांचे लेखन हे प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा मार्गदर्शक शिक्षणतज्ज्ञ हेरंब कुलकर्णी यांनी याप्रसंगी नाविन्यपूर्ण आणि विद्यार्थी सापेक्ष शिक्षण विद्यार्थ्यांना कसे देता येईल याचा एक आदर्श पाठच घालून दिला. पुढे ते म्हणाले, मानवी जीवन हे यंत्राप्रमाणे गतिशील बनले आहे. आज एक शिक्षक साधारणतः दोनशे विद्यार्थ्यांना शिकवतो.

# सांची बुद्ध विहारात भाद्रपद पौर्णीमा उत्साहात साजरी

**माजलगाव प्रतिनिधी:** तथागत भगवान बुद्धांच्या जिवनात वर्षाच्या बारा पौर्णीमांना महत्व आसुन प्रत्येक पौर्णिमा बौद्ध बांधव विविध ठीकाणी उत्साहात साजरी करत आसतात याच प्रमाणे सांची बुद्ध विहार डॉ. आंबेडकर भवन केसापुरी कॅम्प येथे भारतीय बौद्ध महासभा तालुका - शाखा माजलगांव च्या वतीने वर्षावासातील महत्वाची आसणारी श्रावण पोर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली

पुज्य भन्ते विविकानंद यांच्या कडुन उपस्तीतांना त्रिशरण पंचशील देऊंन सुत्रपठणाने कार्यक्रमाची शुरुवात करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष भारतीय बौद्ध महासभा महिला



तालुका अध्यक्षा मंदाताई साळवे होत्या तर या कार्यक्रमा साठी भारतीय बौद्ध महासभा जिल्हा बीड च्या वतीन राबवण्यात येत असलेल्या प्रवचन मालीकेतील विषय घेऊन प्रमुख मार्गदर्शक भारत सातपुते , आर डी जोगदंड हे उपस्थित होते तर प्रमुख पाहुणे म्हणुन लिलाताई उजगरे, शामभाऊ वाघमारे , गुलाब प्रधान, सेलापुरीचे उपसरपंच शुशीलाताई घडसे हे उपस्थित होते या कार्यक्रमात भारत सातपुते यांनी चार ब्रम्हविहार या विषयावर सखोल अस मार्गदर्शन केले वर्षावासात चालु असलेले भगवान बुद्ध आणी त्यांचा धम्म या ग्रंथाचे वाचन पुज्य भन्ते विवेकानंद यांनी केले तर आर डी जोगदंड यांनी संस्थेच्या कामकाजा विषयी माहीती दिली व मदाताई साळवे यांनी भाद्रपद पौर्णिमा चे महत्व सांगीतले या कार्यक्रमाचे प्रस्ताविक डॉ भागवत साळवे यांनी केले तर सुत्रसंचलन गुलाब धाईजे यांनी केले. कार्यक्रमासाठी सावरगांव ग्राम शाखेच्या अध्यक्षा शांताबाई बोराडे,व संघटक हौसाबाई फंदे यांनी भोजनदान दिले

ह्या कार्यक्रमासाठी नाथाजी घडसे बाबासाहेब घनघाव, चक्रधर पोटभरे ,नितीन डोंगरे तात्यासाहेब साळवे , विशाखाताई वाघमारे , निलावती साळवे,चंद्रकला साळवे,गिरजाबाई पोहरे ,निलावती गायसमुद्रे,चंद्रकला साळवे,सह सावरगांव ,कल्याणनगर,सह तालुक्यातील धम्म उपासक उपासिका व बौद्ध महासभेचे पदाधिकारी मोठ्या सख्येन उपस्थित होते

## मोफत आरोग्य तपासणी शिबीर, आरोग्य सप्ताहाचे आयोजन

माजलगाव- अखिल भारतीय श्री स्वामी समर्थ गुरुपीठ त्र्यंबकेश्वर चे पीठाधीश परमपूज्य गुरुमाऊली अण्णासाहेब मोरे यांच्या आशिर्वादाने व युवासंत चंद्रकांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदगुरू प पू मोरेदादा चॅरिटेबल ट्रस्ट हॉस्पिटल त्र्यंबकेश्वर च्या वतीने दि. १ ते ८ ऑक्टोबर दरम्यान मोफत आरोग्य तपासणी नाडी परीक्षण व सर्व रोग निदान शिबीर (आरोग्य सप्ताहाचे) आयोजन अनुक्रमे खालील ठिकाणी करण्यात आले आहे. दिग्रस, जहांगीरमोहा, हिंगणी, सिरसाळा, भोगलवाडी, देवदहिफळ, आमला, उमरा येथे करण्यात आले आहे. या आरोग्य तपासणी शिबीरात वात, कफ , पित्त, बी पी, शुगर, ईसीजी इत्यादी आजारांची मोफत तपासणी व समुपदेशन करण्यात येणार आहे

# दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी रु 50 हजार तातडीची आर्थिक मदत द्या आणी रब्बीसाठी बियाणे व खते मोफत द्या

### भारतीय किसान संघाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना मा.उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांचे मार्फत निवेदन

**अंबाजोगाई :** महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये यंदा पावसाचे अत्यल्प व असमान वितरण झाल्याने खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. मराठवाडा, पश्चिम विदर्भ, सोलापूर, अहिल्यानगर तसेच राज्यातील जवळपास सर्वच भागांमध्ये पावसाअभावी खरीप पिके हातची गेली आहेत. या पार्श्वभूमीवर भारतीय किसान संघ,तालुका अंबाजोगाई महाराष्ट्र यांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

खरीप हंगामासाठी जमीन मशागत, बियाणे, खते, औषधे, मजुरी, सिंचन, फवारणी, यंत्रसामग्री आदींवर शेतकऱ्यांनी केलेला संपूर्ण खर्च उत्पादन न मिळाल्यामुळे बुडाला आहे. त्यामुळे पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांच्या हातात भांडवल शिल्लक राहिलेले नाही. केवळ



नेहमीच्या निकषांनुसार मिळणारी नुकसानभरपाई शेतकऱ्यांना पुन्हा उभे करण्यासाठी पुरेशी ठरणार नाही, असे किसान संघाने निवेदनात म्हटले आहे.

हेक्टरी ५० हजार रुपयांची तातडीची मदत

खरीप हंगामातील बुडालेल्या भांडवलासाठी हेक्टरी ५० हजार रुपये तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे. ही मदत पारंपरिक नुकसानभरपाईपुरती मर्यादित न ठेवता खरीप हंगामात शेतकऱ्यांनी केलेल्या प्रत्यक्ष उत्पादन खर्चाची भरपाई करण्याच्या उद्देशाने विशेष पॅकेज म्हणून थेट DBT पद्धतीने शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी, अशी मागणी आहे. यामुळे शेतकऱ्यांना पुढील हंगाम सुरू करण्यासाठी किमान कामासाठीभांडवल उपलब्ध होईल, असे भारतीय किसान संघाने स्पष्ट केले आहे.

रब्बी हंगामासाठी बियाणे, खते मोफत देण्याची मागणी

खरीप हंगाम पूर्णपणे हातातून गेल्याने अनेक शेतकऱ्यांकडे रब्बीची पेरणी करण्यासाठी आर्थिक क्षमता राहिलेली नाही. त्यामुळे रब्बी हंगामासाठी बियाणे, रासायनिक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये व आवश्यक कृषी निविष्ठांचा मोफत पुरवठा करावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कोव्हीड काळात कंत्राटी व नंतर रोजंदारी तत्वावर काम केलेल्या उमेदवारांना स्मार्ट सर्व्हिसेस कंपनी मार्फत भरतीमध्ये प्रथम प्राधान्य मिळावे; रोजंदारी कामगारांचे मागणीपर अधिष्ठाता व उपजिल्हाधिकारी यांना निवेदन

अंबाजोगाई - राज्यात सध्या सर्वच ठिकाणी खाजगी तथा कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांची भरती प्रक्रिया राबविण्यात येत आहे. अशाच प्रकारे अंबाजोगाई येथील स्वा रा ती ग्रामीण रुग्णालयात कंत्राटी स्मार्ट सर्व्हिसेस प्रा लि पुणे या कंपनीमार्फत कामगार भरती केल्या जात आहे. मात्र या भरती प्रक्रियेमध्ये बऱ्यापैकी अनियमितता झाल्याचे आढळून आल्याचा आरोप केला जात आहे. या कंपनीमार्फत झालेली भरती प्रक्रिया रद्द करण्यात यावी अशी मागणी कोव्हिडं काळात कंत्राटी पद्धतीने काम केलेल्या व त्यानंतर देखील रोजंदारी तत्वावर काम केलेल्या कामगारांनी उपजिल्हाधिकारी तथा अधिष्ठाता यांना निवेदनाद्वारे केली आहे.

सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे की स्वा.रा.ती.ग्रा. शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई येथे कोव्हीड १९ या महामारी कालावधीपासून आम्ही वर्ग ४ (कंत्राटी) करीता काम केले आहे. काम करत असतानाच दि. ०७/०७/२०२१ रोजी कामावरून अचानकपणे आम्हाला कार्यमुक्त करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा सलग दोन वर्षे रोजंदारी तत्वावर काम केले आहे. मात्र दि. ०१ मे २०२३ रोजी कामगार दिनादिवशीच सर्वांना कार्यमुक्त करण्यात आले. त्यानंतर पुन्हा कामावर घेण्यासाठी कामगारांनी वेळोवेळी कार्यालयाशी पत्र व्यवहार केला आहे. मात्र कार्यालयातून जेंव्हा कधी जागा निघतील तेंव्हा आपला विचार प्राधान्याने केला जाईल असे



आश्वासन अधिष्ठाता यांच्या वतीने देण्यात आले.

कालांतराने स्मार्ट सर्व्हिसेस प्रा.लि. पुणे यांचे मार्फत कंत्राटी तत्वावरील चालू असलेल्या भरतीमध्ये कोव्हीड काळातील अनुभवी कर्मचारी (कामगार) ज्यांनी स्वतःच्या जिवाची पर्वा न करता रुग्णसेवा दिली होती त्यांना अर्ज करुनही वगळण्यात आले आहे.यामुळे सदर कर्मचाऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणी अधिष्ठाता यांनी आमची दखल घेवून व गांभीर्यपूर्वक विचार करुन उपर्युक्त कोव्हीड १९ कर्मचाऱ्यांना प्रथम प्राधान्य देण्याची विनंती या निवेदनातून केली आहे. जर आमच्या विषयावर गांभिर्यपुर्वक विचार केला नाही तर अर्ज करूनही डावललेल्या सर्व कामगाराना दि ५ ऑक्टोबर २०२६ पासून कायद्याच्या मार्गाने उपोषणास बसण्याशिवाय आमच्याकडे काहीही पर्याय उरणार नसल्याचा गंभीर इशारा या कामगारांनी दिला आहे.

उपजिल्हाधिकारी तथा अधिष्ठाता याना सादर केल्याच्या निवेदनाच्या प्रति मुख्यमंत्री तथा , उपमुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य , पालकमंत्री बीड , खासदर बजरंग सोनवणे , वैद्यकीय शिक्षण मंत्री, संचालक , वैद्यकीय शिक्षण व प्रशासन विभाग, मुंबई, आमदार नमिता मुंदडा, जिल्हाधिकारी तसेच उपजिल्हाधिकारी अंबाजोगाई यांना देण्यात आल्या आहेत. या निवेदनावर महेश राम वेदपाठक, युवराज जगन्नाथ काळे , दुर्गेश कुरील, लक्ष्मण वाघमारे, राहुल राऊत, रामेश्वर माने, ज्ञानेश्वर खरात, इरफान पठाण, सतीश दरवेशवार, रोहित शिंदे, अशोक मेंडके, रामदास वाघमारे, प्रसाद आदाटे, रहमान शेख, दीपक लोंढे, योगेश गवळी, अमजीत शेख, लखन परदेशी, उत्तरेश्वर अदाटे, अमरदीप वाघमारे, योगेश हाके, बुद्धभूषण सरवदे, प्रशांत मोरे यांच्यासह अनेक जणांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# पाण्यात बुडून एकाचा मृत्यू



**सोयगाव,दि.२८ सप्टेंबर :** सोयगाव शहरातील सोना नदीच्या पात्रात एकाचा बुडून मृत्यू झाल्याची घटना शनिवारी सकाळी अकरा वाजता उघडकीस आली आहे.सोना नदीच्या बिबन डोहात हा प्रकार घडला आहे.याप्रकरणी सोयगाव पोलीसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. विजय भगवान बागुल( वय.४४ रा.सोयगाव काळे नगर) असे पाण्यात बुडालेल्या तरुणाचे नाव असून शनिवारी सकाळी दहा वाजता सोयगाव नगर पंचायतीच्या पाठीमागे असलेल्या नदीच्या पात्रात त्याचा मृतदेह तरंगून आढळून आला आहे.गेल्या तीन ते चार दिवसांपासून तो बेपत्ता होता त्यामुळे सदर घटना ही तीन ते चार दिवसापूर्वी ची असल्याचे पोलीसांनी सांगितले आहे.दरम्यान कुजलेल्या अवस्थेत त्याचा मृतदेह असल्याने वैद्यकीय अधीक्षक डॉ. दिनाजी खंदारे यांनी घटनास्थळी शवविच्छेदन केले होते. सायंकाळी त्याचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले.त्याच्या पश्चात आई,दोन भाऊ असा परिवार आहे.

## पुण्यातील स्टार्टअपचा कान्समध्ये (फ्रान्स) गौरव

पुणे - वृद्धांच्या गरजा लक्षात घेऊन उत्पादने डिझाइन करणाऱ्या पुण्यातील 'हाऊस ऑफ टुमारो' या स्टार्टअपला 'इनलू' या उत्पादनाच्या डिझाइनसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवण्यात आले आहे. 'इनलू' ही कोणत्याही व्यक्तीला आरामात वापरता येईल अशा प्रकारे तयार करण्यात आलेली टॉयलेट अटॅचमेंट आहे. यामुळे ज्येष्ठ नागरिकांना टॉयलेटमध्ये बसणे आणि उठणे सोपे होते तसेच त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींनाही मदत होते. वृद्धांच्या गरजेनुसार बाथरूममध्ये मोठे आणि खर्चिक बदल करण्याची गरजही 'इनलू'मुळे टाळता येते.आर्किटेक्ट ऐश्वर्या एडाखे आणि प्रॉडक्ट डिझायनर शगुन मालवीय यांनी 'हाऊस ऑफ टुमारो'ची स्थापना केली आहे. चांगल्या प्रकारे वृद्धत्वाकडे जाणे हा केवळ वैद्यकीय विषय नसून डिझाइनशीही संबंधित विषय आहे, अशी 'हाऊस ऑफ टुमारो'ची भूमिका आहे.

## मोटोरोलाच्या स्मार्टफोनवर सणासुदीच्या ऑफर्स

**मुंबई:** मोटोरोलाने आपल्या 'इझ द टाइम टू मोटो' मोहिमेअंतर्गत #बिगबिलियनमोटो डील्सची घोषणा केली आहे. फ्लिपकार्टच्या बिग बिलियन डेज २०२६ विक्रीदरम्यान कंपनीने आपल्या नवीनतम स्मार्टफोनवर आकर्षक सणासुदीच्या ऑफर्स जाहीर केल्या आहेत. २७ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून सुरू झालेल्या या विक्रीमध्ये मोटोरोलाचा एज ७० फ्युजन, मोटोरोलाचा एज ७० प्रो, मोटोरोलाचा एज ७० प्रो प्लस, मोटो जी३७ पॉवर, मोटोरोलाचा सिग्नेचर यांसह विविध स्मार्टफोन विशेष किमतीत उपलब्ध आहेत. मोटोरोलाच्या या सणासुदीच्या मोहिमेत ३० हजार रुपयांच्या आत फ्लॅगशिप वैशिष्ट्ये देणारा मोटोरोलाचा एज ७० फ्युजन, ४० हजार रुपयांच्या आत फ्लॅगशिप दर्जाची कार्यक्षमता देणारा मोटोरोलाचा एज ७० प्रो, ४५ हजार रुपयांच्या आत चार ५० मेगापिक्सेल कॅमेऱ्यांचा अनुभव देणारा मोटोरोलाचा एज ७० प्रो प्लस, ६० हजार रुपयांच्या आत उच्च दर्जाचा कॅमेरा अनुभव देणारा मोटोरोलाचा सिग्नेचर आणि २० हजार रुपयांच्या आत तीन दिवसांपर्यंत चालणारी बॅटरी देणारा मोटो जी३७ पॉवर यांचा समावेश आहे.

## संरक्षित शेतीच्या अनुदानाचा प्रश्ना संदर्भात शेतकरी आक्रमक एनएचबी पुणे कार्यालय वर मोर्चा..

**पुणे प्रतिनिधी :** केंद्र सरकारने राष्ट्रीय फलोत्पादन मंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या संरक्षित शेतीसाठीच्या विविध योजनांच्या अनुदानात १५% घट केल्यामुळे आणि अनुदानाचा लाभ घेण्यासाठी जाचक अटी -शर्ती लागू केल्यामुळे हरितगृह आणि शेडनेट उभारणीकडे देशभरातील शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. त्यामुळे हरितगृह आणि शेडनेट उभारणी व्यवसाय अडचणीत आला आहे. राजधानी दिल्ली येथे १५ सप्टेंबर ला राष्ट्रीय फलोत्पादन महामंडळ हरियाणात आणि १६ सप्टेंबर ला कृषी भवनासमोर दिल्लीत आंदोलन करून आलेले शेडनेट, हरितगृह धारक शेतकरी , पवना संकृती फपीसी आणि इंडियन ग्रीनहाऊस मॅन्युफॅक्चरिंग असोसिएशनच्या (इग्मा) पदाधिकाऱ्यांनी , महाराष्ट्र फुल उत्पादक संघ व पुणे फुल उत्पादक कंपनी यांनी राष्ट्रीय बागवानी मंडळ पुणे येथील कार्यालय वर धडक मोर्चा काढला यावेळी त्यांनी उपसंचालकाची भेट घेतली व विविध मागण्यांचे निवेदन दिले.या वेळी मावळ तालुक्यातील प्रगतीशील शेतकरी मुकुंद ठाकर व फुल उत्पादक संघ कंपनीचे सुमारे ४०० शेतकरी व इग्माचे राष्ट्रीय सचिव परमेश्वर तोर, सह सचिव आणि महाराष्ट्राचे अध्यक्ष तेजोमय घाडगे, वैभव खांडरे , नितीन जगताप , रोशन पिंगळे, जयदिप ननवरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते .

## आकाश एज्युकेशनल सर्व्हिसेस लिमिटेड (एईएसएल) ने अँथे 2026 सुरु केले

**नांदेड :** स्पर्धात्मक शैक्षणिक प्रवासाची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, काय अभ्यास करायचा हे जाणून घेणे हे केवळ एक समीकरण आहे. आपण कुठे आहोत, आपण काय चांगले करत आहोत आणि आपल्याला कुठे सुधारणा करण्याची गरज आहे, हे समजून घेणे तितकेच महत्त्वाचे असू शकते. तयारी आणि आत्म-जागरूकता यांमधील हीच दरी आकाश राष्ट्रीय प्रतिभा शोध परीक्षेने (अँथे) गेल्या १६ वर्षांपासून भरून काढण्याचा प्रयत्न केला आहे. सुरुवातीपासून १ कोटींहून अधिक विद्यार्थ्यांनी अँथे साठी नोंदणी केल्यामुळे, ही परीक्षा भारतातील सर्वात मोठ्या आणि दीर्घकाळ चालणाऱ्या विद्यार्थी मूल्यांकन मंचांपैकी एक बनली आहे. प्रतिभा ओळखण्याचा एक उपक्रम म्हणून जे सुरू झाले होते, ते आता एका संरचित शैक्षणिक मापदंडात विकसित झाले आहे, जे विद्यार्थ्यांना त्यांच्या तयारीचे मूल्यांकन करण्यास, त्यांची स्पर्धात्मक क्षमता समजून घेण्यास आणि पुढील प्रवासासाठी एक मजबूत पाया तयार करण्यास मदत करते.

## डीएचएल एक्सप्रेसने भारतात 2027 साठी वार्षिक प्राइस अ‍ॅडजस्टमेंट्सची घोषणा केली

**मुंबई :** जगातील आघाडीचा इंटरनॅशनल एक्सप्रेस सर्व्हिसेस प्रोव्हायडर डीएचएल एक्सप्रेसने आज प्राइस ॲडजस्टमेंट्सची घोषणा केली, जे 1 जानेवारी 2027 पासून लागू होतील. भारतात ही वाढ 8.9% असेल."इंटरनॅशनल ट्रेड व्यवसायांसाठी नवीन संधी निर्माण करत राहतो, तर सप्लाय चेन सतत जास्त आंतरजोडलेल्या आणि गुंतागुंतीच्या होत चालल्या आहेत," डीएचएल एक्सप्रेसमधील साउथ एशियाचे एसव्हीपी आर एस सुब्रमण्यम म्हणाले. "आम्ही आमच्या ग्राहकांना या बदलत्या वातावरणात पुढे जाण्यास मदत करण्यासाठी कमिटेड आहोत आणि यासाठी आमच्या ग्लोबल नेटवर्क, डिजिटल कॅपेबिलिटीज, सिक्युरिटी इन्फ्रास्ट्रक्चर आणि सस्टेनेबल लॉजिस्टिक्स सोल्यूशन्समध्ये गुंतवणूक करत आहोत. हे वार्षिक प्राइस ॲडजस्टमेंट आम्हाला उच्च दर्जाची सेवा आणि विश्वासार्हता टिकवून ठेवण्यास मदत करते, ज्याची आमच्या ग्राहकांना अपेक्षा असते, तसेच आम्ही आमच्या ग्लोबल ऑपरेशन्सची मजबूती आणि बदलांसोबत जुळवून घेण्याची क्षमता मजबूत करत राहतो."

## लाखो ग्राहकांपर्यंत आणले फ्लॅगशिप दर्जाचे तंत्रज्ञान

**मुंबई :** सणासुदीच्या हंगामापूर्वी एआय प्लस स्मार्टफोन ने आज पल्स २ एफई, नोव्हाटॅब आणि लॅपटॅब लॉंच करून आपल्या उत्पादन श्रेणीचा विस्तार जाहीर केला. संवाद, शिक्षण, मनोरंजन आणि उत्पादकता या क्षेत्रांत ग्राहकांना तीन नवे तंत्रज्ञान अनुभव मिळतील.देशभरातील ग्राहक वर्षातील तंत्रज्ञान खरेदी, अपग्रेड आणि भेटवस्तूंच्या सर्वात मोठ्या काळासाठी तयारी करत असतानाच हे लॉंच होत आहे. या नव्या श्रेणीमुळे एआय प्लस स्मार्टफोन वेगवेगळ्या गरजा आणि किंमत गटांसाठी अधिक पर्याय देत आहे. पहिला स्मार्टफोन घेणाऱ्यांपासून, कनेक्टेड शिक्षणासाठी उपकरण शोधणाऱ्या विद्यार्थ्यांपर्यंत आणि मनोरंजन व कामकाज सहजतेने एकाच मोठ्या स्क्रीनवर करू इच्छिणाऱ्यांपर्यंत सर्वांसाठी यात काही ना काही आहे.

# प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्कार

### शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या हस्ते ठाण्यात सन्मान

तभा वृत्तसेवा

**ठाणे :** शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणारे एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड यांना 'मराठवाडा रत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. मराठवाडा जनविकास परिषद, ठाणे यांच्या वतीने आयोजित मराठवाडा मुक्तिसंग्राम सोहळ्यात राम गणेश गडकरी रंगायतन, तलावपाळी येथे हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.



महाराष्ट्राचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, ठाण्याचे खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा झाला. मराठवाडा जनविकास परिषदेचे अध्यक्ष अण्णासाहेब टेकाळे आणि वरिष्ठ उपाध्यक्ष नितीन कदम यांच्या हस्ते प्रा. डॉ. कराड यांचा गौरव करण्यात आला.

मराठवाडा जनविकास परिषद गेल्या १७ वर्षांपासून मराठवाड्यातील नागरिकांच्या सामाजिक, शैक्षणिक आणि सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत आहे. संस्थेच्या वतीने दरवर्षी मराठवाडा बहुभाषिक दिन सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदा शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाची दखल घेत प्रा. डॉ. मंगेश कराड यांची 'मराठवाडा रत्न' पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. डॉ. मंगेश कराड म्हणाले की, मराठवाडा ही केवळ भौगोलिक भूमी नसून त्याग, पराक्रम, अध्यात्म आणि संघर्षाचा ज्वलंत इतिहास असलेली भूमी आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि राजकीय जडणघडणीत मराठवाड्याचे योगदान अतुलनीय आहे. मराठवाड्याचा पुत्र म्हणून 'मराठवाडा रत्न' हा सन्मान मिळणे ही अभिमानाची बाब आहे.

माईर्स एमआयटी शिक्षण समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. डॉ. विश्वनाथ दा. कराड यांचे आशीर्वाद आणि मार्गदर्शनाच्या बळावर एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या शैक्षणिक कार्याला मिळालेली ही पुरस्काररूपी पावती असल्याचेही त्यांनी नमूद केले. शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाबद्दल मिळालेला हा पुरस्कार केवळ वैयक्तिक सन्मान नसून कराड कुटुंबीयांसह एमआयटी एडीटी विद्यापीठातील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा गौरव असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

## कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्या. यांची सर्व साधारण सभेचे आयोजन

**सोयगाव,दि.२७ सप्टेंबर :** कै.श्री.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सह पतसंस्था मर्या.सोयगाव यांची २८ वी वार्षिक सर्व साधारण सभेचा आयोजन संस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली दि.२८ सोमवार रोजी सकाळी ०९:०० वाजता स्थळ व्यंकटेश कॉम्प्लेक्स छत्रपती शिवाजी महाराज चौक जवळ संस्थेच्या वरच्या मजल्यावर,सोयगाव येथे आयोजित करण्यात आले आहे. संस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला यांच्या अध्यक्षता खाली विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित केलेली आहे.तरी सदर सभेत सर्व सभासद बंधू यांनी उपस्थित राहावे.यावेळी मागील रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून कायम करणे,सन. २०२५ ते २०२६ या वर्षाचे संचालक मंडळाने मंजूर केलेले हिशोब पत्रके तेरीज,नफा तोटा पत्रक दि.३१/३/२०२६ अखेरीस ताळेबंद पत्रक वाचून मंजूर करणे,सन.२०२५-२६ मध्ये अंदाज पत्रकापेक्षा कमी,जास्त झालेला खर्च मान्यता देणे,सन.२०२५-२६ करिताच्या अंदाज पत्रकास मंजुरी देणे, सन.२०२५ते २६ चे ऑडिट दोष दुरुस्ती रिपोर्टला मंजुरी देणे,शासनाने मान्य केलेल्या पॅनलवरील लेखापरीक्षकाची /प्रमाणित लेखापरीक्षकाची नियुक्ती करणे बाबत,ऐनवेळी येणारे विषय अध्यक्ष यांच्या पूर्व परवानगी चर्चीले जातील. अशा अनेक विषय या २८ वी वार्षिक सभेत मांडण्यात येतील.तरी या सभेला सर्व सभासद बंधू व विविध पक्षाचे पदाधिकारी,यांनी उपस्थित राहावे असे आवाहन संस्थेचे चेअरमन दिलीप बिर्ला,व्हा.चेअरमन योगेश बोखारे,संचालक दत्तात्रय देसाई,भगवान पाटील,सुलेमान शेख,कृष्णा कुर्लेकर,बाबुराव चव्हाण,राजेश एलीस,मॅनेजर सिताराम गोतमारे,कॅशियर कृष्णा शेवाळकर यांनी केले आहे

# फुलंब्री तालुक्यात जल जीवन मिशनच्या कामांवर प्रश्नचिन्ह; कोट्यवधी खर्च, तरीही अनेक गावांत नळ कोरडे

**फुलंब्री, प्रतिनिधी :** केंद्र सरकारच्या 'हर घर जल – जल जीवन मिशन' योजनेअंतर्गत फुलंब्री तालुक्यात करण्यात आलेल्या कामांबाबत ग्रामस्थांनी गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. तालुक्यातील अनेक गावांमध्ये कोट्यवधी रुपयांचा खर्च दाखवूनही आजही घराघरातील नळांना नियमित पाणीपुरवठा होत नसल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे.




ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, जल जीवन मिशनअंतर्गत पाइपलाइन टाकण्यासाठी अनेक ठिकाणी सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते खोदण्यात आले. मात्र कामे पूर्ण न झाल्याने रस्त्यांची दुरवस्था झाली असून नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये पाइपलाइन टाकण्यात आली असली तरी नळातून पाणी येत नसल्याचे चित्र आहे.

योजनेतील अनेक कामे अद्याप अपूर्ण असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. काही ठिकाणी पाण्याच्या टाक्यांचे बांधकाम अर्धवट आहे, विहिरींची कामे पूर्ण झालेली नाहीत, मोटारी बसविण्यात आलेल्या नाहीत, तर अनेक तांत्रिक कामेही प्रलंबित असल्याचे ग्रामस्थ सांगत आहेत. तरीही काही ठिकाणी घाईघाईने पाणीपूजन करून कामे पूर्ण झाल्याचे दाखवत बिले काढण्यात आल्याचा आरोप केला जात आहे.

या संपूर्ण प्रकरणाची जल जीवन मिशनचे संबंधित अभियंते, ठेकेदार आणि संबंधित यंत्रणेच्या कामांची सखोल चौकशी करण्यात यावी, तसेच दोषी आढळणाऱ्यांवर कारवाई करून गावागावातील नागरिकांना तातडीने नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## खुलताबाद कोहिनूर कॉलेजमध्ये 'महा जॉब मेळावा' मोहिमेचे आयोजन



तभा वृत्तसेवा

खुलताबाद प्रतिनिधी बेरोजगार तरुण आणि महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांमध्ये नोकरीविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आज कोहिनूर कॉलेज, खुलताबाद येथे एका सत्राचे आयोजन करण्यात आले होते. विद्यापीठ आणि राज्य सरकारच्या सूचनेनुसार २९ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आयोजित केल्या जाणाऱ्या 'महा जॉब मेळाव्या'ची माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी यावेळी एका बॅनरचे अनावरण करण्यात आले. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कमरउन्निसा यांनी उपप्राचार्य डॉ. आर. एम. खान आणि डॉ. एस. जिते यांच्या उपस्थितीत या मोहीम मोहिमेच्या पोस्टरचे उद्घाटन केले.प्लेसमेंट सेलच्या अध्यक्षा आणि या कार्यक्रमाच्या आयोजक डॉ. मनीषा कोटगिरे यांनी 'महा रोजगार मेळाव्या'चे महत्त्व स्पष्ट केले. तर प्लेसमेंट सेलच्या सर्व सदस्यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले.


# हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणीवर डॉ. केजल भारसाखळे

### महिला हॉकीला व्यापक व्यासपीठ देण्यासह खेळाडूंच्या सर्वांगीण विकासावर भर

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** शिक्षण, क्रीडा आणि महिला सक्षमीकरण क्षेत्रात कार्यरत असलेल्या डॉ. केजल भारसाखळे यांची हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणी सदस्यपदी निवड झाली आहे. त्यांच्या निवडीमुळे छत्रपती संभाजीनगरला राज्यस्तरीय हॉकी संघटनेच्या कार्यकारिणीत प्रतिनिधित्व मिळाले आहे.

डॉ. भारसाखळे या एईव्हीपीएम महिला महाविद्यालयाच्या संचालिका असून, महिला आणि युवकांचा क्रीडा क्षेत्रातील सहभाग वाढविण्यासाठी त्या सातत्याने कार्यरत आहेत. महिलांना क्रीडा क्षेत्रात अधिकाधिक संधी मिळाव्यात, या उद्देशाने त्यांनी 'असोसिएशन फॉर वुमेन इन स्पोर्ट्स' (एडब्ल्यूआयएस) ची स्थापना केली आहे. या माध्यमातून महिला खेळाडूंना मार्गदर्शन, खेळाडू विकास, क्रीडा मानसशास्त्र तसेच विविध क्रीडा उपक्रम राबविले जातात.



हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणीवर काम करताना महिला हॉकीला अधिक व्यापक व्यासपीठ उपलब्ध करून देण्यावर त्यांचा भर राहणार आहे. 'महिला हॉकी लीग'सारख्या उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासोबतच मुली आणि मुलांच्या खेळाडूंसाठी समुपदेशन, करिअर मार्गदर्शन आणि खेळाडू सहाय्य सेवा विकसित करण्याचा त्यांचा मानस आहे. खेळाडूंचे मानसिक स्वास्थ्य, पोषण, तंदुरुस्ती, शिक्षण आणि करिअर या बाबींकडेही एकत्रितपणे लक्ष देण्याची दिशा त्यांनी मांडली आहे. "केवळ मैदानावर खेळाडू घडविणे नव्हे, तर त्यांना मैदानाबाहेरही सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि भविष्यासाठी तयार करणे, हा माझा प्रयत्न असेल," अशी भावना डॉ. केजल भारसाखळे यांनी व्यक्त केली.

हॉकी महाराष्ट्राच्या कार्यकारिणीची निवड

हॉकी महाराष्ट्राच्या निवडणुकीत अध्यक्षपदी ज्येष्ठ प्रशासकीय अधिकारी कृष्ण प्रकाश यांची निवड झाली. उपाध्यक्षपदी मनीषा आकेरे, रमेश पिल्ले आणि गुरमीतसिंग नवाब, सरचिटणीसपदी मनोज भोरे, खजिनदारपदी कैलास सोनार, तर सहसचिवपदी महेश खुताळे आणि पूनम दुर्गे यांची निवड झाली आहे.

कार्यकारिणी सदस्य म्हणून डॉ. केजल भारसाखळे यांच्यासह रुपेश चव्हाण, मनोजा गोस्वामी आणि शेख फारुख यांची निवड करण्यात आली आहे. अॅथलिट्स प्रतिनिधी म्हणून ऑलिम्पियन विक्रम पिल्ले आणि ऑलिम्पियन हेलन मेरी, तर सहयोगी उपाध्यक्ष म्हणून आमदार संदीप जोशी आणि नगरसेवक मनीष आनंद यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. भारसाखळे यांच्या निवडीचे क्रीडा, शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रातून स्वागत होत आहे.

## 32 उपवासांच्या अखंड तपश्चर्येनिमित्त भव्य शोभायात्रा व महापारणा



**छत्रपती संभाजीनगर :** जैन धर्मातील तपश्चर्या, संयम आणि आत्मशुद्धीचा संदेश देणाऱ्या चि. राज शरद पाटणी यांच्या ३२ उपवासांच्या अखंड तपश्चर्येनिमित्त भव्य शोभायात्रा व महापारणा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या मंगल प्रसंगी श्री दिगंबर जैन मंदिर, राजाबाजार येथून 28 रोजी सकाळी ठीक ८.१५ वाजता भव्य शोभायात्रेस प्रारंभ होणार आहे. ही शोभायात्रा विविध मार्गाने हिराकाका प्रांगण येथे पोहोचेल. त्यानंतर धार्मिक वातावरणात तपस्वींचा महापारणा सोहळा संपन्न होणार आहे.

३२ उपवासांची अखंड तपश्चर्या पूर्ण करून राज शरदजी पाटणी यांनी संयम, श्रद्धा आणि आत्मसाधनेचे प्रेरणादायी उदाहरण समाजासमोर ठेवले आहे. या तपश्चर्येचे अभिनंदन करण्यासाठी समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तपस्वींचे कौतुक करावे, तसेच महापारणा सोहळ्याची शोभा वाढवावी, असे आवाहन पाटणी परिवारातर्फे करण्यात आले आहे.

या मंगल सोहळ्यास सर्व समाजबांधव, माता-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पाटणी परिवार (कन्नडवाले), छत्रपती संभाजीनगर यांनी केले आहे

## लोहगाव येथे उप बाजार पेठ सुरु करणे बाबत सभापती राजु भुमरे यांना निवेदन

बिडकीन दि .२८ सप्टेंबर पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षीक सर्वसाधारण सभेत बिडकीन, उप बाजार पेठ सुधारणा व तेलवाडी येथे उप बाजार पेठ सुरू करणे , व शेतकऱ्यांच्या मागणीनुसार लोहगाव येथे नविन उप बाजार पेठ सुरू करण्याचा ठराव एकमताने घेतला असल्याची घोषणा आमदार विलास भुमरे यांनी केली.सोमवार दि.२८ रोजी पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीची ३१ वी वार्षिक सर्वसाधारण सभा अभिनंदन मंगल कार्यालयात आ. विलास भुमरे , सभापती राजेंद्र भुमरे, उपसभापती राम एरंडे यांच्या यांच्या प्रमुखते खाली व शेकडो शेतकरी, व्यापारी, संचालक मंडळाच्या उपस्थितीत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.यावेळी सचिव नितीन विखे यांनी वार्षिक नफा तोटा अहवाल सादर केला.त्यानंतर विविध ठराव एकमताने मंजूर केले यात बिडकीन बाजार समिती सुधारणा करणे,तेलवाडी येथे कांदा खरेदीसाठी उप बाजार पेठ प्रस्ताव शासनाने मंजूर केला त्याला लोकनेते खा संदिपान भुमरे संकुल नाव देणे बाबत व लोहगाव भागातील शेतकऱ्यांची मागणी नुसार लोहगाव येथील शासकीय जागेवर उप बाजार पेठ मंजूर करण्याचा ठराव एकमताने घेण्यात आला.

# कृषी उत्पन्न बाजार समितीची 57 वी सर्वसाधारण सभा सभापती सौ. अर्चनाताई कृष्णा सुकासे यांच्या अध्यक्षतेखालील पहिली सभा संपन्न

तभा वृत्तसेवा

**गंगापूर दि.२७:**कृषि उत्पन्न बाजार समिती, गंगापूरची ५७ वी वार्षिक सर्वसाधारण सभा (सन २०२५ २०२६) चे आयोजन समितीच्या मुख्य आवार, गंगापूर येथे बाजार समितीचे सभापती सौ. अर्चतानाई कृष्णा सुकासे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.



बाजार समितीचे सभापती सौ. अर्चनाताई कृष्णा सुकासे पाटील सदर सभेचे प्रस्ताविक करतांना म्हटले की, पहिली महिला सभापती म्हणून काम करण्याची संधी दिल्या बद्दल आमदार प्रशांत बंब साहेब व आमदार प्रा. रमेश बोरनारे व तसेच बाजार समितीचे संचालक सदस्य यांचे आभार मानले व बाजार समितीचे कामकाज पादरर्शकपणे चालविण्याचा सदैव प्रयत्न करेन असे आश्वासन दिले.

सभेस मार्गदर्शन करतांना भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य किशोर धनायत यांनी गंगापुर कृषि उत्पन्न बाजार समिती चांगल्या प्रकारे काम करणारी एक संस्था असुन, या संस्थेच्या माध्यमातुन शेतकरी हिताच्या दृष्टीने अजुन नविन कांदा व्यापारी यांना अनुज्ञप्ती देऊन बाजार समितीच्या पारदर्शक व परिणाम कारक काम करावे व शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळुन द्यावे असे आवाहन केले.

तसेच माजी सभापती नंदकुमार पा. गांधिले यांनी समितीच्या आवारात शॉपिंग कॉम्प्लेक्स, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, ८० मे.टन वजन काटा केल्याबद्दल संचालक मंडळाचे अभिनंदन करून लवकराच मौजे मादलापुर (मांजरी) येथील शासकीय गायरान जमिन ताब्यात घेऊन कांदा मार्केट सुरू करणे बाबत म्हटले.यावेळी शेतकरी शरद हिवाळे यांनी समितीमध्ये पावसाळ्यात शेतकऱ्यांचा शेतमाल सुरक्षित रहावा यासाठी लिलावगृह (सेलहॉल) व कांदा मार्केट कॉंक्रीटीकरण करणे बाबत सुचना मांडण्यात आली.

सभापती सौ. अर्चनाताई कृष्णा सुकासे पाटील यांनी बाजार समितीच्या प्रगती बाबत मार्गदर्शन केले. सचिव मनिष गजभिये यांनी मागील व चालु सभेचा वृत्तांत वाचुन सांगितला. मनोगत डॉ. ज्ञानेश्वर पा.निळ, अहवाल वाचन दिपक बडे यांनी केले, आभार मा. उपसभापती श्री. सचिन पा. काकडे यांनी मानले.

या सभेस किशोर धनायत, माजी सभापती नंदकुमार पा. गांधिले, बद्रिनाथ बाराहाते, लक्ष्मण भुसारे, कृष्णा सुकासे, कृष्णकांत व्यवहारे, हाशम पटेल, दिगंबर काळे, विठ्ठल नरोडे, संतोष पवार, भगवान बोरूडे आदि उपस्थित होते.

यावेळी बाजार समितीचे उपसभापती श्री. सचिन पा. काकडे, भाऊसाहेब पा. पदार, रामेश्वर पा. गवळी, दत्तात्रय पा.दुबिले, डॉ. ज्ञानेश्वर पा.निळ, भारत पाटील, उमेश पा. बाराहाते, नारायण बाराहाते, सौ. सुवर्णाताई पा.जाधव, दिपक जाधव, सतिष डेडवाल, दिपक बडे, श्रीमती सुशिलाबाई राजिगिरे, नवनाथ सुराशे, जाफर शेख, आप्पासाहेब पा. हिवाळे, तौफिक पठाण, सचिव श् मनिष गजभिये, सहाय्यक सचिव विजय हिवाळे, व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### जाहीर प्रगटण

**मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब, न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

फौजदारी किरकोळ अर्ज क्र.३७८/२०२६

अर्जदार :- अविनाश संतोष सोनवणे, वय १९ वर्षे धंदा शिक्षण, रा. अंदरसुल ता. येवला जि. नाशिक

विरुध्द

गैरअर्जदार :- मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर.

प्रकरण :-जन्म-मृत्यू अधिनियम १९६९ सुधारीत अधिनियम २०२६ चे कलम ३ (ए) प्रमाणे जन्माची नोंद घेणे बाबत.

पोलिस स्टेशन :-पोलिस स्टेशन गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. रविराज बी दारुंटे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की अर्जदार हा मौजे अंदरसुल ता. येवला जि. नाशिक येथील रहिवाशी असुन अर्जदाराच्या आईचे माहेर हे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथील असुन अर्जदाराचा जन्म दिनांक १३/१०/२००७ रोजी मौजे गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे झालेला असुन अर्जदाराचे आईवडीलांना पुरेसे ज्ञान नसल्याने अर्जदाराच्या जन्माची नोंद गैरअर्जदार यांचे कार्यालयात करणे राहुन गेले असुन गैरअर्जदार यांनी देखील अर्जदाराच्या जन्म तारखेची नोंद नसल्याबाबतचे अनुउलब्धता प्रमाणपत्र दिनांक २८/०८/२०२६ रोजी दिले आहे, करीता अर्जदार याच्या जन्माची नोंद गैरअर्जदार यांनी त्यांचे जन्म/मृत्यु नोंदवहीत घेणे कामी प्रस्तुतचा अर्ज या मा. न्यायालयात सादर केला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्याचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्दतीनंतर आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदाराचा अर्ज त्यांचे विनंती प्रमाणे मंजुर करतील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक ३०/१०/२०२६ रोजी ठेवण्यात आलेली आहे.

वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक. सहाय्यक अधिक्षक, प्रथमवर्ग न्यायालय गंगापुर

संपादकीय

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# दुष्काळाची घोषणा आणि पुढे...

१९७२ नंतर महाराष्ट्रावर पुन्हा तेवढेच भीषण नैसर्गिक संकट कोसळले आहे. हजारो नागरिक आणि पाळीव प्राण्यांचे जीव घेणारा तो दुष्काळ पाहणारी पिढी अजूनही हयात आहे. विशेषतः दख्खन प्रांताला त्या दुष्काळाच्या झळा सहन कराव्या लागल्या होत्या. अन्नासाठी नागरिकांना दारोदार भटकण्याची स्थिती निर्माण झाली होती. कधीकाळी श्रीमंत असलेल्या नागरिकांना घरेदारे, शेती सोडून शहरांकडे स्थलांतरित व्हावे लागले होते. देशात अन्नधान्याची प्रचंड टंचाई निर्माण झाल्याने अमेरिकेत जनावरांना चारा म्हणून खाऊ घालण्यात येणारा मिलो रेशनच्या दुकानातून नागरिकांना वितरित करावा लागला होता. रानभाज्यांची पाने उकळून खाण्याची वेळ जनतेवर आली होती. निसर्गाचे हे कुचक्र पुन्हा फिरून आले आहे. अल-निनोच्या प्रभावामुळे काही भागात भर पावसाचे महिने असलेले ऑगस्ट आणि पाठोपाठ सप्टेंबर कोरडे गेल्याने राज्यात दुष्काळाची स्थिती निर्माण झाली. परिणामी महाराष्ट्र सरकारला दुष्काळ जाहीर करावा लागला. तब्बल ७५ टक्के महाराष्ट्र दुष्काळाच्या छायेत आहे. ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. जून ते सप्टेंबर या पावसाळ्यातील चारही महिन्यांमध्ये पर्जन्यमानाची तूट निर्माण झाली. विदर्भ आणि मराठवाड्याचा काही भाग हा कापूस, तूर, सोयाबीन पिकांचा पट्टा मानला जातो. आधीच जूनमध्ये पाऊन न आल्याने उशिरा पेरण्या झाल्या. थोडाफार येणारा पाऊस आणि हवेतील आर्द्रतेमुळे पिकांनी तोंडे वर काढली, थोडीफार वाढही झाली. जुलै, ऑगस्ट हे संपूर्ण दोन महिने आणि अर्धा सप्टेंबर अशा अडीच महिन्यांच्या काळात काही भागांत पाऊसच झाला नाही. पीक फुलावर येण्याच्या स्थितीत पावसाने दडी मारल्याने मूग, उडीद, सोयाबीनसारखी पिके शेतातच करपून गेली तर कशीबशी फूट-दीडफूट वाढलेली पऱ्हाटी आता सुकायला सुरुवात झाली आहे. सिंचनाची सोय नसलेल्या शेतीची अवस्था आताच उन्हाळ्यातील स्थितीसारखी झाली आहे. मराठवाड्यातील काही जिल्ह्यांमध्ये तर पावसाची तूट ७० टक्क्यांच्या आसपास पोहोचली आहे. मराठवाड्यातील तब्बल ७४ तालुक्यांमध्ये दुष्काळाची स्थिती आहे. त्यानंतर विदर्भातील ५६ तालुके दुष्काळाच्या छत्रछायेखाली आहेत. यामध्ये अमरावती, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ, अकोला आणि नागपूर या सहा जिल्ह्यांमध्ये शंभर टक्के दुष्काळाची नोंद झाली आहे. पुणे आणि परिसरही त्यात आहेच. राज्याच्या काही भागांत गेल्या उन्हाळ्यात सुरू करण्यात आलेले पिण्याच्या पाण्याचे टँकर्स सुरूच आहेत आणि पुढचा पावसाळा येईपर्यंत सुरूच ठेवावे लागतील. गेल्या दहा वर्षांची स्थिती पाहता यावर्षीची स्थिती फारच गंभीर आणि विदारक आहे. जमीन कोरडी ठण्ण पडली असून जमिनीतील ओलावाही घटला आहे. आठवड्यापूर्वी राज्य सरकारने ५ ऑक्टोबरनंतर दुष्काळी सर्वेक्षण सुरू करण्यात येणार असल्याचे जाहीर केले होते; पण, शेतकऱ्यांच्या हातून सर्व काही निसटून गेल्याने पीक पंचनाम्यांना उशीर करण्यात अर्थ नसल्याने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दुष्काळ जाहीर केला. कारण, दुष्काळासाठीच्या उपाययोजनांची अंमलबजावणी सरकारी यंत्रणेला करायची आहे आणि यंत्रणेत बसलेले किती तत्पर, संवेदनशील आणि जनतेप्रति जागरूक आहेत, याची जाणीव सर्वसामान्यांना आहेच. पण, आता हयगय करून चालणार नाही. स्थिती फारच विदारक असल्याने एकूण ३६ पैकी ३२ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ व्यवस्थापन संहिता, २०१६ नुसार ट्रिगर-१ लागू करण्यात आली आहे. ट्रिगर-१ लागू करण्यासाठीचे मान्सूनच्या काळात ७५ टक्क्यांपेक्षा कमी पाऊस आणि पावसाचा प्रदीर्घ खंड हे दोन्ही मुख्य शास्त्रीय निकष पूर्ण झाले आहेत. दुष्काळग्रस्त भागासाठी सवलती लागू करण्यात आल्या असून पिकांची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी करून पंचनामे करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. खुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दुष्काळग्रस्त भागाचा दौरा करून शेतकऱ्यांना धीर देण्याचा प्रयत्न केला. दुष्काळ हे नैसर्गिक संकट असून ते संथपणे चालत येते आणि त्याचा परिणाम व्यापक क्षेत्रावर होतो. या संकटाचा परिणाम केवळ शेतकरी वर्गावर होणार नसून शेतीशी निगडित असलेल्या कित्येक क्षेत्रांवर होतो. अर्थकारण आणि समाजावरही परिणाम होतात. हाताला काम नसल्याने मजुरांचे स्थलांतर वाढून शहरांच्या व्यवस्थेवर ताण येतो. नैसर्गिक दुष्काळाचा सर्वाधिक फटका शेतीशी निगडित असलेल्या शेतमजुरांना बसतो. शेतमजूर आर्थिकदृष्ट्या कमकुवत असतो. हातावर पोट असल्याने त्यांचे जीवनचक्रच बदलून जाते. कष्टकरी शेतकरी आणि शेतमजूर मदतीच्या केंद्रस्थानी असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. येणारा काळ हा शासन आणि जनता या दोघांसाठी कसोटीचा ठरणार आहे. दुष्काळग्रस्त भागासाठी कृषी पंपांच्या वीज बिलात सूट, शेती कर्जाच्या वसुलीला स्थगिती, कृषी पंपांची वीज जोडणी खंडित न करणे यासारख्या उपाययोजना करून शासनाने दिलासा दिला आहे. शालेय आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात संपूर्ण माफी दिली आहे. मात्र, सरकारने गरजू विद्यार्थ्यांचे शिक्षण शुल्क माफ करण्यासंदर्भात निर्णय घेणे आवश्यक झाले आहे. पीक हातचे गेल्याने शेतकरी आणि हाताला कामच नसल्याने मजूर आपल्या मुला-मुलींचे शिक्षणशुल्क भरू शकणार नाहीत. अशा परिस्थितीत शिक्षणात खंड पडण्याचा धोका निर्माण होतो किंवा शिक्षण अर्धवट सोडून देण्याची वेळ येऊन ठेपते. त्यामुळे गरज असेल तेथे शिक्षण शुल्काबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. पावसाअभावी खरीप हंगाम हातचा गेल्यानंतर धरणांमधील पाणी पिण्यासाठी राखीव ठेवावे लागणार आहे.

मराठवाड्यातील धरणांतील पाणी तर आधीच पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवले आहे. परिणामी गहू, हरभरा, सूर्यफूल ही रबीतील पिकेही येणार नाहीत. त्यातच जगात सुरू असलेल्या युद्धामुळे इंधनाच्या किमती वाढल्याने महागाई पाय पसरत आहे. याचा फटकाही जनतेला बसत आहे. आता दसरा, दिवाळीसारखे सण अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपले आहेत. शेतकरी हाच घटक या दोन्ही सणांच्या केंद्रस्थानी आहे. शेतकरी वर्गाने खरेदी केली तरच शहरांमधील बाजारपेठांमध्ये झगमगाट असतो. पण, शेतकरीच संकटात सापडल्याने त्याचे परिणाम व्यापाऱ्यांवर होणे निश्चित आहे.

महाराष्ट्राला दुष्काळाचे संकट काही नवीन नाही. १९७२ नंतर, १९८७, २००४ आणि २०१६ या वर्षांमध्ये राज्य दुष्काळात होरपळून निघाले होते. विशेष म्हणजे प्रत्येकवेळी अवर्षणग्रस्त मराठवाडा आणि विदर्भाला दुष्काळाचा तडाखा बसला आहे. १९७२ मध्येही २८ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ पडला होता. मात्र, ५०-६० वर्षांपूर्वीची स्थिती वेगळी होती. लोकसंख्या कमी असल्याने आणि माहिती आणि दळणवळणाची साधने उपलब्ध नसल्याने त्यावेळी दुष्काळाची दाहकता उघड होत नव्हती. परिणामी शासकीय यंत्रणेवर तेवढा ताण आणि दबाव नव्हता. पण, सध्याच्या स्थितीत काहीही लपून राहत नसल्याने शासकीय यंत्रणेला सतत दक्ष राहावे लागणार आहे. हा देश कृषिप्रधान असल्याची बिरुदावली मिरवीत असतो. पण, आज देशाच्या आणि राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेला शेतकरी आणि त्याचे पशुधन हे दोन्ही घटक संकटात सापडले आहेत. दसरा, दिवाळीसारखे सण तोंडावर आहेत. सण-उत्सवांच्या काळात शेतकऱ्यांच्या घरच्या चुली पेटत्याच राहतील, अशी काळजी सरकारला घ्यावी लागेल. मजुरांच्या हाताला काम मिळेल यासाठी 'विकसित भारत-जी रामजी' या योजनेची अंमलबजावणी व्यापक स्वरूपात आणि इमानदारीने करावी लागणार आहे. कारण, कधीकाळी ही योजना म्हणजे भ्रष्टाचाराचे कुरण झाली होती. अधिकाऱ्यांनी थेट बांधावर जाऊन नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिल्याने सरकारचे अभिनंदन करावे लागेल. पण, येणाऱ्या काळात केवळ कागदोपत्री आकडेवारीवर विसंबून न राहता शेतकरी, शेतमजुरांना थेट मदत मिळेल याकडे सरकार लक्ष देईल, ही अपेक्षा आहे. तेच गरजेचे आहे. ■

## प्रासंगिक

# श्री अशोकजी सिंघल : राष्ट्र उभारणीच्या कार्याला वाहून घेतलेले महान व्यक्तिमत्त्व

**नरेंद्र मोदी,** पंतप्रधान


एक खूप सुंदर म्हण आहे,
**वृक्षकबहुँ नहिं फल भखै, नदी न संचै नीर ।**
**परमारथ के कारने, साधुन धरा शरीर ।।**

याचा अर्थ असा, की वृक्ष स्वतःची फळे स्वतः खात नाही आणि नदी स्वतःचे पाणी स्वतः साठवून ठेवत नाही. दोन्ही इतरांच्या कल्याणासाठीच अस्तित्वात असतात. आपले संत आणि ऋषिमुनी देखील अनंत काळापासून आपल्याला हीच शिकवण देत आले आहेत की, आपल्या सभोवतालच्या लोकांच्या कल्याणासाठी समर्पित केलेले जीवन हे वैयक्तिक कतृत्वापेक्षा अधिक अर्थपूर्ण ठरते. आपल्या जगण्यात सातत्याने याच भावनेचे प्रतिबिंब असलेली अशी एखादी व्यक्ती जर कोण असेल, तर ते श्री अशोकजी सिंघल होते.

२७ सप्टेंबरपासून, आपण आध्यात्मिक साधना, सांस्कृतिक प्रबोधन आणि अनेक दशकांचे समर्पित संघटनात्मक कार्याचे एकात्मीकरण घडवून आणणाऱ्या या महान व्यक्तिमत्त्वाचा गौरव करण्यासाठी त्यांची जन्मशताब्दी साजरी करणार आहोत. अशोकजी यांच्याशी संवाद साधण्याच्या आणि त्यांच्या स्नेहाची अनुभूती घेण्याच्या अगणित संधी मला लाभल्या, हा मी माझा बहुमानच मानतो. त्यांच्याबाबतीतल्या माझ्या अगदी सुरुवातीच्या आठवणींपैकी एक आठवण १९८१ मधली आहे. त्यावेळी मी माझ्यावर सोपवलेल्या संघटनात्मक जबाबदाऱ्या पार पाडणारा एक तरुण कार्यकर्ता होतो. मला त्यांनी स्वतः हाताने पत्र लिहिले होते. साहजिकच, तो माझ्यासाठी एक उल्लेखनीय प्रसंग होता. या पत्रातून त्यांनी एका महत्त्वाच्या आगामी कार्यक्रमाबद्दल लिहिले होते आणि काही कामे माझ्यावर सोपवली होती.

गेली अनेक दशके, मी त्यांना अहोरात्र काम करताना पाहिले आहे. गुजरातमधील आदिवासी भागांमध्ये प्रवास करण्याची प्रचंड उत्सुकता त्यांच्यात कायम दिसायची. त्यांचे मन सतत कुठे ना कुठे धावत असायचे, ते सतत समाजातील वंचित घटकांसाठी आणखी काय करता येईल, याचाच विचार करत असायचे. जेव्हा कधी देशाच्या कोणत्याही भागात नैसर्गिक आपत्तीच्या घटना घडायच्या, त्या त्या वेळी अशोकजी हे एकतर तिथे स्वतः पोहोचणाऱ्या किंवा बाधितांच्या मदतीसाठी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या आघाडीच्या लोकांमधले एक असायचे. २००१ मध्ये कच्छला आलेल्या भूकंपाच्या भीषण परिस्थितीच्या काळात त्यांच्यासोबत काम करण्याचा माझा स्वतःचा अनुभव तर मी कधीच विसरू शकत नाही.

खरे तर ते एका अत्यंत प्रतिष्ठित आणि संपन्न कौटुंबिक पार्श्वभूमीतून आलेले होते. त्यांचे वडील, श्री महावीरजी, एक नामवंत प्रशासक होते. त्यांचे एक बंधू, श्री बी. पी. सिंघल, पोलिस दलात उच्च पदापर्यंत पोहोचले होते आणि त्यानंतर ते खासदारही झाले होते. त्यांचे दुसरे बंधू, श्री व्ही. पी. सिंघल, ज्यावेळी त्रिपुरा राज्याची नुकतीच निर्मिती झाली होती तेव्हा त्रिपुराचे मुख्य सचिव म्हणून कार्यरत होते. कुटुंबातील इतर सदस्यांनी देखील व्यापार आणि कृषी क्षेत्रात मोठे यश मिळवले होते. पण अशोकजी मात्र अगदी तरुण वयापासूनच एका वेगळ्याच ध्येयाकडे आकर्षित झाले होते... ते म्हणजे भारतमातेच्या लेकरांना त्यांचे वैभव पुन्हा मिळवून देण्याच्या आणि राष्ट्राचे पुनरुत्थान घडवण्याच्या ध्येयाकडे. प्रयागराजमध्ये लहानाचे मोठे होत असताना अशोकजी संगमाच्या काठावर तासनतास बसायचे. नदीविषयी



त्यांना स्वाभाविकच आकर्षण होते, पण संगमावर येणारे संत, साधू आणि भाविकही त्यांचे लक्ष वेधून घेत असत. या सगळ्या वातावरणातून भारताच्या सांस्कृतिक जीवनमूल्यांची त्यांना ओळख होत गेली आणि समाजासाठी काहीतरी करण्याची त्यांची इच्छा अधिक बळकट झाली. इतरांसाठी जगण्याची हीच भावना त्यांना राष्ट्रीय स्वयंसेवक संघाकडे घेऊन गेली. त्यांच्यावर जेव्हा जेव्हा एखादी जबाबदारी सोपवण्यात आली, तेव्हा ती त्यांनी उत्साहाने, शिस्तीने आणि कर्तव्यभावनेने स्वीकारली. अशोकजी सिंघल यांनी सातत्य आणि अथक परिश्रमाने अनेक संस्था आणि चळवळी उभ्या केल्या. त्यांचा आवाज भारदस्त होता आणि त्यांच्या ओघवत्या वक्तृत्वाने संपूर्ण सभा जणू भारावून जायची. सहकारी कार्यकर्त्यांबद्दलची त्यांची आस्था आणि आपुलकीही तितकीच उल्लेखनीय होती. त्यांच्या संपर्कात आलेल्या कोणालाही त्यांच्या विलक्षण साधेपणाचे कौतुक वाटल्याशिवाय राहायचे नाही. संत मंडळींशी त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते.

अशोकजींच्या असामान्य व्यक्तिमत्त्वाची झलक दाखवणारे दोन प्रसंग माझ्या मनात आजही ताजे आहेत. त्यापैकी पहिला प्रसंग १९९३ सालचा आहे. स्वामी विवेकानंदांनी शिकागो येथे केलेल्या ऐतिहासिक भाषणाला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने विश्व हिंदू परिषदेने अमेरिकेत एका अधिवेशनाचे आयोजन केले होते. परदेशात अशा प्रकारचे अधिवेशन आयोजित करण्याची कल्पना, त्यामागचे नियोजन आणि विविध क्षेत्रांतील लोकांना एकत्र आणण्याचे प्रयत्न या सगळ्यांतून अशोकजींचे विलक्षण संघटनकौशल्य दिसून आले होते.

दुसरा प्रसंग २००० सालचा आहे. त्रिनिदाद आणि टोबॅगोमधील पोर्ट ऑफ स्पेन येथे जागतिक हिंदू अधिवेशन आयोजित करण्यात आले होते. यात सहभागी झालेल्या प्रतिनिधींमध्ये अशोकजींच्या उपस्थितीने किती उत्साह निर्माण झाला होता, हे मला तिथे पाहायला मिळाले. माझे भाषण झाल्यानंतर अशोकजींनी केलेले कौतुक माझ्यासाठी खूप भावणारे होते. त्यांच्या प्रोत्साहनामुळे प्रत्येक कार्यकर्त्याला नव्या उत्साहाने काम करण्याची प्रेरणा मिळत असे, हे मी पुन्हा एकदा अनुभवले.

अशोकजी सिंघल यांचा उल्लेख करताना रामजन्मभूमी आंदोलनातील त्यांच्या महत्त्वाच्या भूमिकेची आठवण झाल्याशिवाय राहत नाही. १९९१ मध्ये बोट क्लबवर झालेल्या सभेतील त्यांचे भाषण कोण विसरू शकेल? आंदोलन ऐन भरात असताना जखमी आणि रक्तबंबाळ अवस्थेतील अशोकजींचे ते चित्र आजही कुणीच विसरू शकत नाही. आज अयोध्येत भव्य राममंदिर उभे आहे. हे शक्य होण्यासाठी अशोकजींसारख्या अनेक ज्येष्ठ नेत्यांनी कोणतीही अपेक्षा न ठेवता या कामासाठी आपले आयुष्य वाहून घेतले. अयोध्येत राममंदिर साकारताना पाहून अशोकजींना खूप आनंद झाला असता.

अशोकजी सिंघल यांना विचारांची असाधारण स्पष्टता लाभली होती. समाजात सौहार्दपूर्ण वातावरण निर्माण झाले पाहिजे आणि बंधुभावाचा संदेश सातत्याने अधोरेखित केला गेला पाहिजे, हा त्यांचा ठाम विश्वास होता. सामाजिक एकोपा आणि समतेची भावना दृढ करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. अयोध्येतील राम मंदिराची पहिली शिळा ठेवण्याचा मान समाजातील वंचित घटकातून आलेल्या व्यक्तीला मिळावा, असा त्यांचा विचार होता. त्यामुळे बिहारमधील वंचित घटकातून आलेले आणि विश्व हिंदू परिषदेचे तळागाळातील कार्यकर्ते असलेले कामेश्वर चौपालजी यांच्या हस्ते राम मंदिराच्या पहिल्या शिळेचे पूजन करण्यात यावे, अशी त्यांची भूमिका होती. काशी येथे आयोजित धर्मसंसदेत त्यांनी डोम राजांचा सन्मान करण्याचा निर्णय घेतला. यानंतर विविध सामुदायिक उपक्रमांमध्ये त्यांनी डोम राजांसोबत काम केले. समाजातील प्रत्येक घटकाला समान सन्मान, प्रतिष्ठा आणि स्थान मिळाले पाहिजे, या त्यांच्या दृढ विचारांचे हे कृतीतून दिसून आलेले उदाहरण होते.

राष्ट्रनिर्माणाच्या कार्यापलीकडे अशोकजी सिंघल यांच्या जिव्हाळ्याचे आणखी दोन विषय होते, एक म्हणजे शिक्षण, विशेषतः वैदिक शिक्षण आणि दुसरे संगीत. वाराणसीचे खासदार म्हणून मला विशेष अभिमान वाटतो की, मी प्रतिनिधित्व करत असलेली शाश्वत काशी नगरी अशोकजी सिंघल यांच्या जीवनाशी एका महत्त्वपूर्ण नात्याने जोडलेली आहे. त्यांचे शिक्षण बनारस हिंदू विद्यापीठात (बीएचयू) झाले. विद्यार्थिदशेत अत्यंत अभ्यासू आणि गुणवंत, अशी त्यांची ओळख होती. दुर्गम आणि ग्रामीण भागांपर्यंत, विशेषतः आदिवासी समाजापर्यंत मूलभूत शिक्षण पोहोचवण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'एकल विद्यालय' उपक्रमाशी त्यांचा घनिष्ठ संबंध होता.

अशोकजी सिंघल हे विपुल वाचन करणारे तसेच उत्तम श्रोते देखील होते. अधिकाधिक वाचन करण्याचा सल्ला ते आपल्या तरुण कार्यकर्त्यांना नेहमी देत असत. अशोकजींना जवळून ओळखणाऱ्यांना त्यांच्या उत्तम गायनकौशल्याची निश्चितच जाणीव होती. नागपूर येथे झालेल्या काही बैठकींच्या आठवणी आजही मनात ताज्या आहेत. या बैठकींमध्ये ते 'एकल गीत' सादर करत आणि त्यांच्या गायनाने उपस्थित सर्व जण मंत्रमुग्ध होत. त्यांच्या गायनामुळे बैठकीचे वातावरणही एका विशेष उत्साहाने भारून जात असे आणि बैठकीची सुरुवातच एका वेगळ्या ऊर्जेने होत असे. २०१५ मध्ये त्यांच्या ९० व्या वाढदिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमादरम्यान, त्यांनी उपस्थितांना आश्चर्यचकित करत ''हे मातृभूमि मेरी, हे पितृभूमि मेरी'' हे गीत गायिले. त्यांच्या या अनपेक्षित आणि उत्स्फूर्त गायनाचा व्हिडीओ मोठ्या प्रमाणावर प्रसारित झाला आणि तो सर्वत्र चर्चेचा विषय ठरला.

त्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अधिकाधिक तरुणांना त्यांच्या महान कार्याची आणि व्यक्तिमत्त्वाची ओळख करून देण्याचा आपण संकल्प करूया. तसेच, आपल्या राष्ट्राच्या आणि देशवासीयांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी पाहिलेली स्वप्ने साकार करण्याच्या दिशेने कार्य करण्याचा आपला संकल्प पुन्हा दृढ करूया. ■

## वेध

**निशिकान्त मायी**

# एका दिवसापुरते झाले भिक्षेकरी

१९९० साली आलेल्या 'आशिकी' चित्रपटात 'मैं दुनिया भूला दूँगा, तेरी चाहत में' हे गीत लोकप्रिय ठरले होते. चित्रपटात प्रेमासाठी वाट्टेल ते करणारे काहीही करू शकतात. मै सबकुछ लुटा दूंगा... म्हणून जिवावरही उदार होतात. मध्यंतरी 'स्वामी तिन्ही जगाचा आईविना - भिकारी' हा चित्रपट चांगलाच गाजला होता. हा चित्रपट एका श्रीमंत उद्योगपती आणि त्याच्या आईच्या भावनिक नात्यावर आधारित असून आईला कोमातून बरे करण्यासाठी आणि तिच्या प्रकृतीसाठी तो कोट्यवधी रुपयांची संपत्ती बाजूला सारून ४८ दिवस भिकारी बनून जगतो, अशी साधारणपणे या चित्रपटाची कहाणी आहे. या चित्रपटात स्वप्निल जोशी कोट्यवधींचा मालक दाखवला आहे, पण केवळ आईच्या जीवासाठी तो भिकारी होऊन वावरतो. रुपेरी पडद्यावर दाखवलेले असले, तरी वास्तवात अशी अनेक उदाहरणे आपल्याला दिसून येतात. अनेक कलाकारांनी वास्तववादी जीवनातही असे विचित्र प्रयोग केलेली उदाहरणे याच महाराष्ट्रात पाहायला मिळतात. २०१६ साली असेच काहीसे घडले होते. मुंबईतील जुहू परिसरात रस्त्याच्या कडेला एक भिकारी बसला होता. तो अतिशय सुमधुर आवाजात सतत गाणी गात होता. रस्त्यावरून येणारे-जाणारे लोक त्याचे ते गाणे आणि मधुर आवाज ऐकून क्षणभर थांबायचे आणि मग पुढे निघून जायचे. सर्वांना तो एक सामान्य भिकारीच वाटत होता. कुणीही या कलाकाराला ओळखले नाही. प्रत्यक्षात तो गायक सोनू निगम होता. सोनू निगमने रस्त्यावर गाणाऱ्या गरीब गायकाचे रूप घेऊन हा प्रयोग करण्याचे ठरवले होते; त्याचाच भाग म्हणून तो भिकाऱ्याच्या वेषात रस्त्यावर बसला होता. त्याने सलग तीन तासपर्यंत २५ वर गाणी गायिली. नंतर खरी परिस्थिती माहिती झाल्यावर याची बातमीही झाली अन् समाज माध्यमावरून ही घटना मोठ्या प्रमाणात व्हायरलही झाली. केवळ आपल्या चाहत्यांचे आपल्यावर किती प्रेम आहे, हे जाणून घेण्यासाठी सोनूने हा प्रयोग केला असला, तरी त्यासाठी निवडलेला अनोखा मार्ग वाखाणण्याजोगा ठरला होता.

८० च्या दशकात अशीच एक घटना समोर आली होती. एका कोट्यधीशाने आपल्या मागे कोणीही वारस नसल्याकारणाने आपली सर्व संपत्ती गरिबांना आणि गरजूंना अक्षरशः वाटून दिली होती. इतकी उदारता अनेक लोकांमध्ये असते. मात्र, असेही काही लोक असतात; केवळ परीक्षा पाहण्याच्या उद्देशाने किंवा आपली समाजाप्रति असलेली गरज ओळखण्यासाठी वेड पांघरूण पेडगावला जातात अन् काही लोक वेष बदलून आपल्या समाजातल्या प्रतिमेचीच परीक्षा पाहत असतात.

हे सारं सांगायचा उद्देश हा की, माणूस कशासाठी काय करेल याचा नेमच राहिला नाही. आता हेच बघा ना, कोट्यवधीच्या मालमत्तेचे मालक असलेल्या एका भाजपा आमदाराने एका दिवसासाठी 'भिकारी' बनून समाजमाध्यमाचे लक्ष आपल्याकडे वेधून घेतले. आमदार असल्याने अर्थातच असलेली आपली सर्व सुरक्षा, महागडी वाहने आणि सर्व सुखसुविधांचा काही तासांसाठी का होईना त्याग केला अन् रस्त्यांवर भिकाऱ्याच्या वेषात वेळ घालवला. त्यामागे त्यांची असेल काही श्रद्धा! पण लोकांना आपली खरी ओळख माहीत होऊ नये म्हणून त्यांनी चेहऱ्यावर मेकअप करून भिकाऱ्याचे रूप धारण केले आणि रस्त्यांवर भिक्षाही मागितली! श्रीमंत आमदारांपैकी एक असलेले घाटकोपर पूर्वचे भाजप आमदार पराग शाह यांनी आगळावेगळा आणि चर्चेत राहणारा प्रयोग केला आणि त्यांना यातून जीवनाचे वास्तव कळले. जेव्हा एखाद्या व्यक्तीचा सामाजिक दर्जा अज्ञात असतो, तेव्हा लोकांच्या वागण्यात कसा बदल होतो, याचा अनुभव त्यांना आल्याचे त्यांनी समाजमाध्यमावर सांगितले. इतकेच नव्हे तर रस्त्यावर भिकाऱ्याच्या वेषात फिरत असताना त्यांना एका नागरिकाने जेवणासाठी २० रुपयेही दिले. एका समोसा विक्रेत्याने, पैसे नसल्याचे सांगितल्यावर, कोणतेही पैसे न घेता जेवणही दिले. महत्त्वाचे असे की, या आमदार महोदयांनी केवळ भीकच मागितली नाही, तर मिळालेले अन्न खाल्ले. काहीही असले तरी 'मै सबकुछ लुटा दूंगा तेरी चाहत में' म्हणणाऱ्या आमदार महोदयांच्या या अनोख्या प्रयोगाची जोरदार चर्चा सुरू होती. त्यांनी त्यांच्या कारकीर्दीत हजाराहून जास्त व्यक्तींसाठी प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या रोजगार उपलब्ध करून दिला असून त्यांना प्राणिमात्रांविषयीही जिव्हाळा, प्रेम आहे, हे उल्लेखनीय! ■

९८८११५२४३९

## दिल्ली दिनांक

# पाकिस्तान युद्धाच्या तयारीत!

**रवींद्र दाणी**

फिल्ड मार्शल मुनीर पाकिस्तानचे सर्वेसर्वा होण्यासाठी भारताच्या विरोधात एखादे युद्ध करण्याच्या तयारीत आहेत काय? या प्रश्नाचे नेमके उत्तर कुणाजवळही नसले तरी, पाकिस्तानने भारत सीमेलगत सुरू केलेली मोर्चेबांधणी मुनीर यांच्या मनात की डोक्यात काहीतरी सुरू असल्याचा संकेत करीत आहे.

**'आर्मी डे'चे निमित्त :** ६ सप्टेंबर १९६५ ! पाकिस्तानच्या 'ऑपरेशन ग्रॅण्ड स्लम'ला उत्तर देण्यासाठी भारताच्या फौजा पाकिस्तानी पंजाबमध्ये दाखल झाल्या. त्याची आठवण म्हणून पाकिस्तान दरवर्षी ६ सप्टेंबर रोजी आपला 'आर्मी डे' साजरा करीत असतो. यावर्षीही पाकिस्तानने तीन आठवड्यांपूर्वी आपला आर्मी डे साजरा केला आणि त्यानिमित्ताने आयएसपीआर म्हणजे इंटर सर्व्हिसेस पब्लिक रिलेशन्सने काही छायाचित्रे जारी केली. त्यात पाकिस्तानने भारतीय सीमेलगत चिनी बनावटीच्या एसएच-१५ जातीच्या २५० हून अधिक तोफा तैनात केल्याचे दाखविण्यात आले आहे. वास्तविक शांततेच्या काळात अशी तैनाती केली जात नाही. पाकिस्तानच्या मनात ऑक्टोबर महिन्यात भारताच्या विरोधात लष्करी कारवाईचा विचार सुरू असल्याच्या बातम्या अधूनमधून येत असतात. त्यात तथ्यांश किती याची कुणालाही कल्पना नसली तरी या तोफांची तैनाती मात्र पाकिस्तानच्या मनात म्हणण्यापेक्षा फिल्ड मार्शल मुनीर यांच्या डोक्यात काहीतरी सुरू आहे याचा संकेत करणारी आहे.

**बोफोर्सला उत्तर :** १९८९ च्या लोकसभा निवडणुकीत बोफोर्स तोफ काँग्रेसच्या पराभवाचे कारण ठरली होती. भारताने स्वीडनच्या एबी बोफोर्स कंपनीकडून घेतलेल्या ४०० तोफा हा त्या निवडणूक प्रचाराचा मुख्य मुद्दा ठरला होता आणि १० वर्षांनी म्हणजे १९९९ मध्ये कारगिल युद्धात याच बोफोर्स तोफांनी भारताच्या विजयात मोलाची भूमिका बजावली होती. १५५ मिलिमीटर तोफगोळा क्षमतेच्या या तोफा अचूक व लांब पल्ल्याच्या माऱ्यासाठी ओळखल्या जातात. पाकिस्तानी सैन्याजवळ या तोफा नव्हत्या. आता पाकिस्तानने चीनकडून या तोफा खरेदी केल्या असून त्यातील २५० तोफा पाकिस्तानला मिळाल्या आहेत आणि त्याची तैनाती प्रामुख्याने राजस्थान लगतच्या भारत-पाकिस्तान सीमेलगत करण्यात आली असल्याचे म्हटले जाते.

**७२ किमीचा पल्ला :** चीनची संरक्षण उत्पादन कंपनी 'नॉरिनको'ने तयार केलेल्या या तोफांचा पल्ला ७२ किलोमीटर म्हणजे बोफोर्स तोफांच्या जवळपास दुप्पट आहे. विशेष म्हणजे या तोफा सहाचाकी ट्रकवर लावण्यात आल्या असल्याने त्याची जलद तैनाती करणे सोयीचे मानले जाते. या तोफाही १५५ मिलिमीटर तोफगोळा क्षमतेच्या आहेत. भारताच्या बोफोर्स तोफांना उत्तर देण्यासाठी पाकिस्तानने या तोफा खरेदी केल्या आहेत हे स्पष्ट आहे.

**चिनी लष्कराचा वर्धापनदिन :** पाकिस्तानने आपल्या लष्करासाठी आर्मी डे साजरा करणे यात काही गैर नाही, पण पाकिस्तानने नुकत्याच एका विशेष समारोहात चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मीच्या स्थापनेचा ९९ वा वर्धापन दिन साजरा केला. यास मुख्य अतिथी फिल्ड मार्शल मुनीर व पाकिस्तानातील चिनी राजदूत होते. पाकिस्तान व चीन याच्यातील लष्करी संबंध दिवसेंदिवस मजबूत होत असल्याचे प्रतिपादन मुनीर यांनी केले. १५ महिन्यांपूर्वी झालेल्या ऑपरेशन सिंदूरदरम्यान, पाकिस्तान-चीन यांच्यातील लष्करी सहकार्याची कल्पना भारताला आली. पाकिस्तानचे ८१ टक्के लष्करी साहित्य चिनी बनवटीचे होते हे भारताने अधिकृतपणे सांगितले होते. यात आता या तोफांची भर पडली आहे. म्हणजे लढाऊ विमाने, तोफा, दळणवळणाची यंत्रणा सारे काही चीनचे, फक्त सैनिक मात्र पाकिस्तानचे अशी स्थिती पाकिस्तानी लष्करात तयार होत आहे.

**लष्करी साहित्याचे आगमन :** मागील महिन्यात ७ ऑगस्ट रोजी पाकिस्तान, सौदी अरेबिया आणि तुर्की यांच्यात लष्करी सहकार्याचा 'मक्का करार' झाला आणि काही दिवसांपूर्वी तुर्कीची लष्करी साहित्याने भरलेली विमाने पाकिस्तानच्या हवाई तळांवर उतरू लागली. तुर्कीने आपल्या अमेरिकन बनवटीच्या सी-१३० हर्क्युलस आणि एअरबस अटलास यातून पाकिस्तानला लष्करी साहित्य पाठविले तर याच काळात चीनने वाय-२० या आपल्या लष्करी वाहतूक विमानातून पाकिस्तानला लष्करी उपकरणे पाठविली. रावळपिंडीजवळील नूरखान, कराचीजवळील मससूर व चाकवालचा मुरेद या पाकिस्तानी वायुदळाच्या तळांवर ही विमाने उतरली. यातून मोठ्या प्रमाणावर ड्रोन पाकिस्तानला पाठविण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.

**नवे दुस्साहस? :** फिल्ड मार्शल मुनीर यांना आता मुख्य सत्ताधीश होण्याचे वेध लागले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने माजी पंतप्रधान इम्रान खान यांना वैद्यकीय उपचारासाठी १६ सप्टेंबरपर्यंत शिफा या खाजगी रुग्णालयात ठेवण्याचा आदेश दिला होता. सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशाचे पाकिस्तान सरकारने उल्लंघन केले. पण, नंतर सर्वोच्च न्यायालयाने याबाबत मौन पाळले. आपल्या आदेशाची सरकारने पायमल्ली केली हे उघडपणे दिसत असूनही न्यायालयाने काहीच केले नाही. हा परिणाम लष्कराच्या दबावाचा होता. म्हणजे मुनीर यांना कोणत्याही परिस्थितीत इम्रान खान यांनी बाहेर येणे नको आहे. कारण, त्यांना सध्याची कमजोर राजवट सोयीची आहे.

**सिंदूरचा फायदा :** फिल्ड मार्शल मुनीर यांना फिल्ड मार्शल हा किताब मिळाला तोच मुळी ऑपरेशन सिंदूर दरम्यान त्यांनी बजावलेल्या तथाकथित उल्लेखनीय कामगिरीनंतर. या युद्धात पाकिस्तान विजयी झाला असे वातावरण पाकिस्तानात व जगात निर्माण करण्यात मुनीर यशस्वी झाले. राष्ट्रपती ट्रम्प यांनी विजेत्याच्या थाटात मुनीर यांना व्हाईट हाऊसमध्ये मेजवानी दिली. मुस्लिम जगतात पाकिस्तानचा भाव वधारला. त्यातून पाकिस्तान, सौदी अरेबिया व तुर्की यांनी लष्करी सहकार्याचा 'मक्का करार' केला. पाकिस्तानी संसदेने विशेष अधिवेशन बोलावून घटनादुरुस्ती करीत मुनीर यांना आजीवन फिल्ड मार्शल करण्याचा निर्णय घेतला. म्हणजे ऑपरेशन सिंदूरचा पूर्ण फायदा मुनीर यांनी उठविला.

**आणखी एक संघर्ष :** भारतासोबत आणखी एक संघर्ष केल्यास आपण पाकिस्तानचे सर्वेसर्वा होऊ शकतो असे मुनीर यांना वाटत असल्याचे म्हटले जाते. आणि पाकिस्तानचा आजवरचा इतिहासही तसाच आहे. कारगिल युद्धात नवाझ शरीफ यांच्यामुळे पाकिस्तान पराभूत झाला असे वातावरण तयार करण्यात तत्कालीन लष्करप्रमुख जनरल परवेझ मुशर्रफ यशस्वी झाले होते. त्याचा परिणाम शरीफ यांची सत्ता जाण्यात आणि मुशर्रफ यांची सत्ता येण्यात झाला होता. पाकिस्तानात लष्करप्रमुखाने सत्ता हाती घेणे ही काही नवी बाब नाही. मुनीर यांना पुन्हा ते घडवून आणावयाचे आहे. त्यासाठी 'भारत' नावाची सबब लागते. कोणत्या तरी प्रकारे ती सबब तयार करावयाची आणि एक मर्यादित युद्ध करून पाकिस्तानची सत्ता आपल्या हाती घ्यावयाची अशी मुनीर यांची मानसिकता असल्याचे मानले जाते आणि अमेरिका व चीन या दोन शक्ती त्यांच्या बाजूला असताना, त्यांनी घाबरण्याचे कारणच नाही.

**महाशक्तींचा पाठिंबा :** अमेरिकेचे राष्ट्रपती डोनाल्ड ट्रम्प हे वारंवार मुनीर यांचे कौतुक करीत आहेत. कारण, मुनीर यांनी ट्रम्प कुटुंबापर्यंत पोहोचण्याचा 'मार्ग' शोधून काढला आहे. त्यामुळे उद्या मुनीर पाकिस्तानचे शासक झाल्यास ट्रम्प यांना ते हवेच आहे. कारण इम्रान खान यांना अमेरिकाविरोधी मानले जाते. आपले सरकार अमेरिकेच्या इशाऱ्यावरून हटविण्यात आले असा इम्रान खान यांचा दावा आहे आणि त्यात बरेच तथ्य असल्याचे मानले जाते. मुनीरप्रमाणेच अमेरिकेलाही पाकिस्तानात इम्रान खानचे पुनरागमन नको आहे. आणि चीनने मुनीर यांना विरोध करण्याचे कारणच नाही. पाकिस्तानात सारे काही चीनच्या मर्जीने होत आहे.

**दोन फिल्ड मार्शल :** पाकिस्तानात आजवर दोनच फिल्ड मार्शल झालेत. फिल्ड मार्शल आयुब खान आणि फिल्ड मार्शल मुनीर. आयुब खान प्रथम देशाचे राष्ट्रपती झाले आणि नंतर त्यांनी स्वतःला फिल्ड मार्शल घोषित केले. मुनीर प्रथम फिल्ड मार्शल झाले. फिल्ड मार्शल झाल्यावर आता ते या पदावर समाधान मानतील काय? पाकिस्तानचा इतिहास सांगतो, 'नाही'! ■

## वाचक पत्र

### गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या...

गणेशोत्सवाचे दहा दिवस कसे निघून जातात, हे कळतही नाही. या काळात सर्व भेद मिटून समाज एकत्र येतो. पण जेव्हा बाप्पाच्या विसर्जनाची वेळ येते, तेव्हा सर्वांच्या मनात एकच भाव असतो. ''बाप्पा, येथेच राहा ना!'' परंतु, विसर्जन आपल्याला एक मोठा धडा शिकवतो. जिथे येणे आहे, तिथे जाणे अटळ आहे! विसर्जनाच्या वेळी आपण केवळ बाप्पाच्या मूर्तीला निरोप देतो; पण त्यांनी दिलेली एकता, सहकार्य, बंधुता आणि सामाजिक जबाबदारीची शिकवण आपण मनात कायम ठेवायची असते. हे विसर्जन समाजाला बदलांचा हसतमुखाने स्वीकार करायला शिकवून परिपक्व बनवते. मातीपासून बनलेली मूर्ती पुन्हा मातीत मिसळणे, हे सृष्टीच्या शाश्वत नियमाचे प्रतीक आहे. बाप्पा जातात म्हणूनच आपल्याला पुढच्या वर्षाची आस, नवी आशा आणि उत्सुकता असते. त्यामुळे विसर्जन ही समाप्ती नसून एका नव्या सुरुवातीचे प्रतीक आहे. ■

**संजय श्रौती**/९८६०४५१८४०.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर **दिनांक**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


# दिवाळीसाठी मुंबई–लातूर विशेष रेल्वे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : दिवाळीत रेल्वे प्रवाशांची संख्या लक्षात घेता मध्य रेल्वे विभागाने छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई - लातूर - छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस मुंबई द्वि-साप्ताहिक विशेष गाडी सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे. १३ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर कालावधीत ही रेल्वे असणार आहे. त्यामुळे लातूरसह मार्गावरील प्रवाशांची मोठी सोय होणार आहे.

गाडी क्रमांक ०११०५ द्वि-साप्ताहिक विशेष गाडी दिनांक १३ ऑक्टोबर ते २४ नोव्हेंबर या कालावधीत दर मंगळवारी आणि गुरुवारी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून रात्री १२.३५ वाजता सुटेल आणि लातूर येथे त्याच दिवशी ११.४० वाजता पोहोचेल. तर गाडी क्रमांक ०११०६ द्वि-साप्ताहिक विशेष गाडी त्या काळात दर मंगळवारी आणि गुरुवारी लातूर येथून ४.३० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी पहाटे ४.१० वाजता पोहोचेल.



## विविध वृत्त.....

## आरोग्य तपासणी शिबिरामधून ६७ हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : गणेशोत्सवाच्या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष प्रमुख श्री. रामेश्र्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने आणि विविध आरोग्य संस्थांच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे हजारो नागरिकांपर्यंत मोफत आरोग्यसेवेचा लाभ पोहोचला आहे. श्री गणेश स्थापना ते श्री अनंत चतुर्दशीपर्यंत सदर उपक्रमामधून सार्वजनिक, धर्मादाय अंतर्गत तसेच खाजगी आरोग्य संस्थांच्या मार्फत संबंधित संस्था तथा विशेषतः सार्वजनिक गणेश मंडळाच्या ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात आली.

लातूर जिल्ह्यात १५ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर दरम्यान १०५३ आरोग्य शिबिरे आयोजित करण्यात आली. या शिबिरांतून ६७ हजार ९९८ नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान आजार आढळलेल्या रुग्णांना तज्ज्ञांकडे पुढील उपचाराकरिता सल्ला देऊन संबंधित करण्यात आले आहे. मोफत आरोग्य तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांमध्ये ३० हजार ६८६ पुरुष, ३२ हजार ५६२ महिला आणि ४ हजार ७५० बालकांचा समावेश आहे.

या अभियानात लातूर जिल्ह्यातील सर्व ग्रामीण, निमशहरी, शहरी अशा सर्व स्तरावरील सार्वजनिक आरोग्य संस्था, धर्मादाय नोंदणीकृत अंतर्गत आरोग्य संस्था, महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना संलग्नित रुग्णालय, मुख्यमंत्री सहायता निधी योजना संलग्नित रुग्णालय आणि विविध वैद्यकीय महाविद्यालय यांचा समावेश आहे. या उपक्रमामध्ये जिल्ह्यातील लहान खेड्यापासून ते लातूर महानगरपालिकेतील विविध गणेश मंडळांमध्ये शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. लातूर जिल्ह्यात मोठ्या संख्येतील श्री गणेश मंडळांनी या उपक्रमाला उत्स्फूर्त सहकार्य करून लोकाभिमुख उपक्रम अधिक परिणामकारक करण्यास हातभार लावला आहे.

## मांजरा व तावरजा प्रकल्पाच्या कालव्यांची स्वच्छता

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : लातूर जिल्ह्यातील मांजरा प्रकल्प, तावरजा येथील सुमारे १० किलोमीटर लांबीच्या कालव्याची स्वच्छता ही कॅसकेड इंडिया मटेरियल हँडलिंग प्रा. लि. कंपनीच्या सी एस आर निधीतून आणि नाम फाउंडेशनच्या माध्यमातून यशस्वीरत्यिा पूर्ण करण्यात आली आहे.

या कामामध्ये कालव्यात वर्षानुवर्षे साचलेला गाळ, झाडे, झुडपे व इतर अडथळे यंत्रांच्या सहाय्याने काढून टाकण्यात आले. त्यामुळे कालव्याची मूळ वहनक्षमता पूर्ववत झाली असून पाण्याचा प्रवाह अधिक सुरळीत झाला आहे. या प्रकल्पामुळे कालव्यालगतच्या शेतकऱ्यांना मोठा फायदा होत असल्याचे दिसून येत आहे. कालव्यातील अडथळे दूर झाल्याने पाण्याचा प्रवाह वेगवान झाला

असून पाणी शेवटच्या टोकापर्यंत पोहोचण्यासाठी लागणारा वेळ लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. परिणामी अधिक क्षेत्राला वेळेवर सिंचनाचे पाणी उपलब्ध होण्यास मदत होत आहे. या उपक्रमामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून त्यांनी प्रकल्पाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

तसेच या कामाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी जलसंपदा विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल त्यांचे विशेष आभार मानण्यात आले. कॅसकेड इंडिया मटेरियल हँडलिंग प्रा. लि. आणि नाम फाउंडेशन यांच्या या संयुक्त प्रयत्नामुळे जलव्यवस्थापनाला चालना मिळाली असून भविष्यातही अशा लोकहितकारी व शाश्र्वत विकासाच्या उपक्रमांना प्राधान्य दिले जाणार आहे.

# रिचार्ज ची मुदत वाढल्यामुळे ग्राहकांना मिळणार दिलासा





तभा वृत्तसेवा/ प्रमोद सुरवसे

लातूर दि. २८ सप्टेंबर : खासदार राघव चड्डा यांनी संसदेत मोबाईल रिचार्ज२८ दिवसांऐवजी३० दिवसांचे असावे, अशी मागणी केली होती . त्यानूसार केंद्र सरकार आणि टेलिकॉम रेग्युलेटरी अथॉरिटी ऑफ इंडियाने मान्य केली . त्यानूसार

ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून केंद्र सरकारने टेलिकॉम कन्झ्यूमर प्रोटेक्शन रेग्यूलेशन्स२०२६ सादर केले . आता प्रीपेड रिचार्ज करणाऱ्या ग्राहकांना२८ दिवसांसोबतच३० दिवसांची व्हॅलिडीटी असलेले प्लॅन उपलब्ध करून देणे टेलिकॉम कंपन्यांना बंधनकारक असणार असून ज्या युजर्सना मोबाईल डेटाची आवश्यकता नाही अशांसाठी मोबाईल डेटा नसलेले फक्त कॉलिंग आणि एसएमएस सुविधा उपलब्ध असलेले पॅकही उपलब्ध करून आवे लागणार आहे . आणि विशेष म्हणजे ग्राहकांना आपल्या सोईप्रमाणे पॅक निवडण्याचा अधिकार असणार आहे .

यामुळे यापुढील काळात वर्षांतून१३ ऐवजी आता फक्त१२ वेळा मोबाईल रिचार्ज करावा लागणार असल्यामुळे मोबाईल धारकांत आनंदाचे वातावरण बघायला मिळत असून त्यांनी समाधान व्यक्त केले आहे .

केंद्र सरकारने टेलिकॉम कन्झ्यूमर प्रोटेक्शन ( तेरावी दुरुस्ती ) रोयुलेशन्स,२०२६ लागू केल्यामुळे यापूर्वी टेलिकॉम कंपन्या२८ दिवसांचा महिना धरून ग्राहकांकडून वर्षातून१३ वेळा रिचार्ज करून घेऊन ग्राहकांची आर्थिक पिळवणूक करत असत . पण आता या नव्या नियमांमुळे ग्राहकांच्या पैशांची तसेच वेळेची बचत होणार असल्यामुळे खासदार राघव चड्डा यांनी केंद्र सरकारचे तसेच टेलिकॉम कंपन्यांचे ग्राहकांच्या वतीने आभार मानले आहेत .

बऱ्याच वेळी ग्राहकांना मोबाईल ला इंटरनेटची गरज नसते . त्यांना फक्त व्हाईस कॉल आणि एसएमएस ची सुविधा हवी असते पण त्यांना फक्त ही सुविधा मिळत नसल्यामुळे डेटा पॅकचीच निवड करावी लागत होती . आता मात्र कंपन्यांना डेटा सुविधा नसलेले आणि फ्क्त कॉलिंग तसेच एसएमएस सुविधा असलेले रिचार्ज पॅक उपलब्ध करून द्यावे लागणार असल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला असला तरी एका बाबीचा खुलासा केंद्र सरकार तर्फे झाला ना टेलिकॉम कंपन्यांकडून . ती बाब म्हणजे रिचार्ज संपल्यानंतर एका दिवसानंतर त्या मोबाईलवर इनकमिंग आणि आऊटगोईंग कॉल बंद केले जातात . ही बाब ग्राहकांची नेहमीच डोकेदुखी राहिलेली असून पूर्वीप्रमाणे रिचार्ज संपल्यावर किमान इनकमिंग सुविधा सुरु ठेवाव्यात जेणेकरून ग्राहकांना मनस्ताप होणार नसून काही अंशी दिलासा मिळेल .

सर्वसामान्य ग्राहकांकडे कधी - कधी मोबाईल रिचार्ज करण्यासाठी पुरेसे पैसे उपलब्ध नसतात आणि अशा वेळी रिचार्ज संपला तर ग्राहकांना हकनाक त्रास होत असतो . त्यामुळे पूर्वी प्रमाणे मोबाईलचा रिचार्ज संपल्यावर इनकमिंग बंद न करता किमान दहा दिवस चालू ठेवावा जेणेकरून ग्राहकांना दिलासा मिळेल

## अवैध बांधकाम प्रकरणी तहसीलदार तांदळेंच्या पत्नीला मनपाची नोटीस

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : शहरातील गोविंदनगर, मयुरबन कॉलनीत लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांच्या पत्नी सरोजा सौदागर तांदळे यांनी मयूरबन सोसायटीतील मालमत्तेवर अनाधिकृत बांधकाम केल्याच्या तक्रारींनंतर लातूर शहर महानगरपालिकेचे क्षेत्रीय कार्यालय 'डी' च्या वतीने थेट नोटीस बजावली आहे. त्यामुळे शहरात अवैध बांधकाम करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

शहरातील गोविंदनगर, मयूरबन सोसायटी येथील मालमत्ता क्र. डी १-३९९-३२ वर अनधिकृत बांधकाम सुरू असल्याच्या एका पाठोपाठ एक अशा ३ तक्रारी लातूर शहर महानगरपालिकेकडे प्राप्त झाल्या होत्या.

अजयकुमार घोडके, सद्दाम एकबाल सय्यद आणि वैजनाथ देशमुख यांनी या बांधकामाविरोधात लातूर मनपाकडे रीतसर तक्रारी अर्ज दाखल केले होते. या तक्रारींची

गंभीर दखल घेत लातूर शहर महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्तांनी सरोजा सौदागर तांदळे यांना नोटीस जारी केली आहे. या नोटीसमध्ये बांधकामाशी संबंधित सर्व अधिकृत कागदपत्रे १४ दिवसांच्या आत क्षेत्रीय कार्यालयात सादर करण्याचे स्पष्ट



आदेश देण्यात आले आहेत. कागदपत्रे वेळेत सादर न केल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६ व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये कडक कायदेशीर कारवाई केली जाईल, असा सज्जड दमही मनपाने दिला आहे. एकीकडे प्रशासनात जबाबदार पदावर असणाऱ्या तहसीलदारांच्या कुटुंबावरच अनधिकृत बांधकामाचा आरोप झाल्याने लातूर खळबळ उडाली आहे.

## राहुल गांधीकडुन देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न

## एसआयआरच्या मुद्दयावरून आ.संभाजी पाटील निलंगेकरांचे कॉग्रेसवर टिकास्त्र

तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : एसआयआरच्या प्रक्रियेवरून राहुल गांधी आणि विरोधी पक्षानी निवडणूक आयोगावर जे आरोप केले आहेत त्या आरोपाना तीन्ही निवडणूक आयुक्तांनी उत्तर देवून राहुल गांधींचा फेक नॅरेटिव्ह खोडुन काढला आहे. संविधानाचे पुस्तक हाता घेवून राहुल गांधींनी संवैधानिक संस्था आणि न्यायालयासह लोकशाहीवर जे आरोप करत आहेत त्या आरोपाच्या माध्यमातून राहुल गांधी देशात अस्थितरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याची टिका माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी केली आहे.



एसआयआरच्या प्रक्रियेवरून राहुल गांधी यांच्यासह विरोधी पक्षानी जो फेक नॅरेटिव्ह पसरविण्याचा प्रयत्न केला आहे त्याला निवडणूक आयुक्तांनी योग्य उत्तर दिलेले असले तरी कॉंग्रेस पक्षाकडुन संवैधानिक संस्था अर्थाच निवडणूक आयोगाच्या विरोधात आंदोलन करण्याचा जो प्रकार होत आहे तो केवलवाणी असल्याचा सांगत माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी एसआयआरची प्रक्रिया पुर्णपणे कायदेशीर पध्दतीनेच पार पडत असल्याचे स्पष्ट केले. राहुल गांधी आणि त्यांच्या पक्षाकडुन यापूर्वीही अशा पध्दतीने फेक नॅरेटिव्ह निर्माण करण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे. संविधानाचे पुस्तक हातात घेवून कधी संवैधानिक संस्थावर तर कधी लोकशाहीवर त्याचबरोबर न्यायालयीन व्यवस्थेवरही अविश्वास दाखविण्याचा प्रकार त्यांच्याकडुन झालेला आहे. केवळ स्वत:च्या राजकीय स्वार्थ्यांसाठी सातत्याने तयांच्याकडुन अशा पध्दतीचे आरोप होत आहेत. आपल्या राजकीय फायदयासाठी जातीचा आधार घेण्याचा प्रयत्न राहुल गांधी आणि त्यांच्या कंपनीकडुन सातत्याने होत आहे. ज्या संविधानाचे पुस्तक हातात घेवून राहुल गांधी ज्या खोटया आरोपांची राळ उडवत आहेत. त्यातून त्यांचाच संविधानावर विश्वास नसल्याचे दिसून येत असल्याचा आरोग्य माजीमंत्री आ.निलंगेकर यांनी केला.

निवडणूक आयोगाकडुन एसआयआरची जी प्रक्रिया राबविली जात आहे त्याला न्यायालयाने सुध्दा वैध केलेले असतानाही निवडणुक आयोग मनमानी कारभार करत असल्याचा आरोप करणे म्हणजे हास्यपद आहे. तेलंगना, पंजाब, कर्नाटक व हिमाचलमध्ये कॉग्रेसनी निवडणुका जिंकल्या की निवडणुक आयोग चांगले आणि इतर राज्यात भाजपने निवडणुक जिंकल्या तर त्याचे खापर ईव्हीएम व निवडणुक आयोगावर फोडून राहुल गांधी आणि त्यांची कंपनी रिकामी होते. निवडणुक का हरतात यांचे आत्मपरिक्षण करण्या ऐवजी संविधानाचा दाखला देत संवैधानिक संस्था, न्यायालयीन व्यवस्था यांना टिकेचे लक्ष करत स्वत:च्या राजकीय स्वार्थ्यांसाठी जातीचे राजकारण करणारे राहुल गांधी यांचेकडुन देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे सांगत माजीमंत्री आ.संभाजी पाटील निलंगेकर यांनी देशातील जनता राहुल गांधी यांच्या फेक नॅरेटिव्हला भीक घालणार नाहीत असा विश्वास प्रसिध्दी पत्रकाच्या माध्यमातून व्यक्त केला आहे.

## शाळा–महाविद्यालयातून सायबर सुरक्षेची नवी क्रांती!



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर व क्विक हिल फाऊंडेशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या जनजागृती अभियानांतर्गत बुधवार (दि. २३ जुलै ) पोतदार इंटरनॅशनल स्कूल लातूर, येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम पार पडला.

सकाळी ८:३० ते ९:३०या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात इयत्ता ५ वी ते ७ वी मधील २०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. सायबर वॉरियर नेहल बुलानी ,नम्रता तौर ,साहिल जाधव व कृष्णा पांढरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत सायबर सुरक्षेच्या विविध पैलूंवर मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यार्थ्यांना गेम्स चे दुष्परिणाम, कृत्रिम बुद्धिमत्ताचा वापरून तयार होणाऱ्या प्रतिमा, मजबूत पासवर्ड तयार करण्याची योग्य पद्धत, तसेच मोबाईलमध्ये प इन्स्टॉल करताना आवश्यक आणि अनावश्यक परवानग्यांबाबत सविस्तर माहिती देण्यात आली. याशिवाय ऑनलाइन फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची खबरदारी, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत अनेक शंकांचे निरसन करून घेतले. विद्यालयाचे मुख्याध्यापक गिरीधर रेड्डी सर तसेच सर्व शिक्षकांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सहकार्य केले.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना सुरक्षित डिजिटल सवयी अंगीकारून जबाबदार डिजिटल नागरिक बनण्याचा संदेश देण्यात आला , व त्यांच्या कडून प्रतिज्ञा म्हणून घेतली...आणि सर्वांना सायबर जागरूक करून हा कार्यक्रम संपन्न झाला.

### औसा तालुक्यास मराठवाड्यात दुष्काळ जाहीर करा

## एमआयएमची मुख्यमंत्री फडणवीस यांच्याकडे मागणी



तभा वृत्तसेवा

औसा दि.२८ सप्टेंबर : औसा तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात यंदा अत्यल्प पाऊस झाल्याने भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. निकष बाजूला सारून व प्रत्यक्ष पाहणीत वेळ न घालवता तातडीने दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा .अशी मागणी एमआयएमचे औसा तालुकाप्रमुख सय्यद मुजफ्फरअली इनामदार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

यावर्षी औसा तालुक्यासह मराठवाड्यात पावसाने मोठी ओढ दिली आहे. पावसाळा संपत आला तरी पावसाने सरासरी गाठली नाही.पुर्ण हंगामात पुरेसा पाऊस झाला नाही.त्यामुळे खरिप हंगामातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पावसाअभावी शेतातील पिके करपून गेल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेला आहे. विहिरी, कूपनलिका तसेच स्थानिक जलसाठे आटत चालल्याने ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न्न गंभीर बनला आहे .जनावरांच्या चारा व पाण्याचीही समस्या निर्माण झाली आहे.

या पार्श्र्वभूमीवर शासनाने तातडीने उपाययोजना करून शेतकरी आणि जनतेला दिलासा द्यावा. औसा तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात तातडीने अधिकृत दुष्काळ जाहिर करावा.तसेच देवस्थान, इनाम जमीन असलेल्या शेतकऱ्यांना शासनाच्या मदत योजनांमध्ये समाविष्ट करून त्यांच्या खात्यावर थेट मदत जमा करावी.बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी. शेतीकर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन संपूर्ण व सरसकट पीककर्ज माफ करावे, ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे टँकर आणि जनावरांसाठी चारा छावण्या तातडीने सुरू कराव्यात. रब्बी पेरणीसाठी प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी,विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी पूर्णतः माफ करावी. अशा मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्र्यांना देण्यात आले आहे.मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे अस्तित्व टिकवण्यासाठी आणि त्यांना दुष्काळाच्या संकटातून बाहेर काढण्यासाठी शासनाने तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा.अशी मागणीही या निवेदनात सय्यद मुजफ्फरअली इनामदार यांनी केली आहे.

## जय भारत शाळेत १२०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे धडे



तभा वृत्तसेवा

लातूर दि. २८ सप्टेंबर : जय भारत शाळेत विद्यार्थ्यांना बदलत्या डिजिटल युगातील सायबर धोके आणि त्यापासून सुरक्षित राहण्याच्या उपाययोजनांची माहिती देण्यासाठी विशेष सायबर सिक्युरिटी जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. टीळलज्ञ क्शरश्र र्ह्रीपवरींळेप यांच्या सहकार्याने ठरक्षरिहीशश ड्हरर्ही चरहर्रींळवूरश्ररूर येथील विद्यार्थी साहील जाधव आणि परमेश्र्वर पांढरे यांनी हा उपक्रम प्रभावीपणे राबविला.

या कार्यक्रमात तब्बल १२०० हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांना इंटरनेटचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक, फिशिंग लिंक, जढझ संदर्भातील फसवणूक, सोशल मीडिया सुरक्षितता, मजबूत पासवर्ड, अनोळखी व्यक्तींकडून येणारे संदेश व लिंक, तसेच डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक पद्धतीने माहिती न देता मनोरंजक, संवादात्मक आणि उदाहरणांवर आधारित पद्धतीने सायबर सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगण्यात आले. त्यामुळे विद्यार्थ्यांचा कार्यक्रमातील सहभाग वाढला. डिजिटल जगात एखाद्या छोट्याशा चुकीमुळे मोठे आर्थिक किंवा वैयक्तिक नुकसान होऊ शकते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली.

सायबर सुरक्षेच्या विविध विषयांवर माहिती देताना विद्यार्थ्यांना सोशल मीडियावर वैयक्तिक माहिती शेअर करताना घ्यावयाची काळजी, लोकेशन शेअरिंग, कॅमेरा व मायक्रोफोनच्या परवानग्या, बनावट वेबसाइट्स आणि लिंक ओळखण्याच्या पद्धती याबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. तसेच कोणत्याही संशयास्पद संदेशाला प्रतिसाद देण्यापूर्वी त्याची सत्यता तपासण्याचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न्न विचारले. साहील जाधव आणि परमेश्र्वर पांढरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्र्नांना सोप्या भाषेत उत्तरे देत डिजिटल सुरक्षिततेच्या सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. डिजिटल युगात तंत्रज्ञानाचा वापर जितका महत्त्वाचा आहे, तितकीच त्याची सुरक्षितता देखील महत्त्वाची आहे, हा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यात आला.

या उपक्रमामुळे १२०० हून अधिक विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे प्राथमिक ज्ञान मिळाले असून, डिजिटल माध्यमांचा वापर अधिक सजगपणे करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद देत सायबर सुरक्षेबाबत मिळालेली माहिती आपल्या कुटुंबीयांपर्यंत आणि मित्रपरिवारापर्यंत पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त केला.

सायबर शिक्षणातून सायबर सुरक्षिततेकडे या उद्देशाने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे शाळेतील शिक्षक, विद्यार्थी आणि उपस्थितांनी कौतुक केले. टीळलज्ञ क्शरश्र र्ह्रीपवरींळेप आणि राजश्री शाहू महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी घेतलेल्या या पुढाकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये डिजिटल सुरक्षिततेबाबत सकारात्मक आणि जागरूक वातावरण निर्माण झाले.

## संक्षिप्त...

### माझी गौराई' स्पर्धेत उजनीची साक्षी ढवण राज्यात प्रथम




तभा वृत्तसेवा

औसा दि.२९ सप्टेंबर : गौरी-गणपतीच्या सजावटीतून आदर्श जिल्हा परिषद शाळा कशी असावी? सामाजिक व शैक्षणिक विचार मांडणाऱ्या उजनी येथील साक्षी सुरज ढवण हिच्या देखाव्याची इंदापूरच्या सावली लाइफस्टाइलने दखल घेतली आहे. 'माझी गौराई' घ्या माध्यमातून आयोजित केलेल्या भव्य राज्यस्तरीय सजावट स्पर्धा २०२६ मध्ये या संकल्पनेला प्रथम क्रमांक मिळाला असून पैठणी, चषक आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

गौरी-गणपतीचा उत्सव केवळ सजावट आणि देखाव्यापुरता मर्यादित न ठेवता. यातून एखादा सकारात्मक विचार समाजापर्यंत पोहोचावा. या भावनेतून 'आदर्श जिल्हा परिषद शाळा' संकल्पना साकारली. स्मार्ट क्लासरूम, स्मार्ट बोर्ड, ग्रंथालय, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी, खेळाचे मैदान आदी सुविधांसह विद्यार्थ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि आनंददायी शैक्षणिक वातावरण मिळावे, असा संदेश या देखाव्यातून देण्यात आला.

यंदाच्या गौरी सणाच्या माध्यमातून सरकारी शाळांच्या प्रश्नाकडे समाजाचे लक्ष वेधणे आणि प्रत्येक मुलाला चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळाव्यात. या उद्देशाने संकल्पना साकार झाली.आणि सावली लाइफस्टाइलच्या उपक्रमात सहभाग घेतला. कलात्मक संकल्पना, सामाजिक, शैक्षणिक संकल्पनेची दखल घेत साक्षी सुरज ढवण च्या देखाव्यास राज्यस्तरीय प्रथम क्रमांक देण्यात आला आहे. या स्पर्धेत वैष्णवी अभिजित फडतरे यांच्या 'दत्त जन्म सोहळा' या देखाव्याला द्वितीय, तर सारिका अरविंद कुंभार कोल्हापूर 'शिव-पार्वती विवाह सोहळा' या देखाव्यास तृतीय क्रमांक मिळाला आहे.या विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

### डॉ.नरसिंग कदम यांना महाराष्ट्र पर्व लाईव्ह न्युज साहित्यरत्न पुरस्कार प्रदान

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. २८ सप्टेंबर : छत्रपती शिवाजीराजे महाविद्यालय,उदगीर येथे साहित्यिक,शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये कार्यरत असणारे तसेच मराठी विश्र्वकोश निर्मिती मंडळ महाराष्ट्र राज्य मुंबईचे सदस्य प्रा.डॉ.नरसिंग कदम यांच्या छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यकथा या कथासंग्रहाला अतिशय मानाचा समजला जाणारा महाराष्ट्र पर्व साहित्यरत्न लाईव्ह न्युज पुरस्कार २०२६ पत्रकारांच्या वतीने देण्यात येणारा मान्यवरांच्या हस्ते हिमायतनगर येथे प्रदान करण्यात आला. चौथा वर्धापन दिन व मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार साहित्यिक डॉ. नरसिंग कदम यांच्या समवेत सौ.गोदावरी कदम, मित्र दीपक बेद्रे, सौ. सारिका बेद्रे,कु. वृषाली बेद्रे यांनी स्वीकारला. डॉ कदम हे मसाप संभाजीनगर व तिफण त्रैमासिक संभाजीनगर चे सदस्य आहेत. उस्मानिया विद्यापीठ हैदराबाद येथील एम एच्या अभ्यासक्रमात महात्मा फुले यांचे कार्य : शोध आणि बोध, महात्मा फुले : साहित्य आणि विचार या दोन संपादित पुस्तकांची संदर्भ ग्रंथ म्हणून निवड झालेली आहे.

तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगरच्या बीए तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमात संदर्भ ग्रंथ म्हणून महानुभाव संप्रदायः स्वरूप आणि विशेष या संपादित ग्रंथाची निवड झाली. त्यांनी जीवनशैली, निर्भया, गोंडर,धडक बेधडक,संघर्षयोद्धा बापूसाहेब हे कवितासंग्रह गड्या, आपुला गाव बरा हा बालकथासंग्रह, छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्यकथा हा कथासंग्रह,आधुनिक मराठी साहित्य समीक्षा,आंबेडकरवादी साहित्य समीक्षा, आधुनिक मराठी साहित्य शोध आणि बोध हे समीक्षा ग्रंथ आहेत.

# निळकंठेश्वरच्या सर्वसाधारण सभेत १० ठरावांना मंजुरी

## ४ लाख मेट्रिक टनाच्या विक्रमी गाळपाचे उद्दिष्ट किल्लारीत कृषी विज्ञान केंद्रासाठी शासनाकडे मागणी



तभा वृत्तसेवा

औसा दि.२९ सप्टेंबर : किल्लारी येथील निळकंठेश्वर शेतकरी सहकारी साखर कारखान्यांच्या ३७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत विषय पत्रिकेतील १० ठरावांना बहुमताने मंजुरी देण्यात आली.त्यामध्ये कारखान्याचे आधुनिकीकरण, कार्यक्षेत्राचा विस्तार, भागभांडवलात वाढ, आगामी गाळप हंगामाचे नियोजन यासह किल्लारी येथे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) सुरू करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्याचा निर्णयाला या सभेत मंजुरी देण्यात आली.

आमदार अभिमन्यू पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या सभेत २८ वार्षिक सभा, १७ जुलै २०२६ रोजीची विशेष सभा, व्यवस्थापन समितीचा वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण अहवाल, आर्थिक पत्रके आणि सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात आली. एनसीडीसी कर्जाच्या अटींनुसार विशेष लेखापरीक्षकांमार्फत वैधानिक लेखापरीक्षण करण्यास तसेच ई-ऑक्शनद्वारे झालेल्या स्क्रॅप विक्रीस कार्योत्तर मंजुरी देण्यात आली.. कारखान्याची गाळप क्षमता १,२५० वरून २,५०० मेट्रिक टन प्रतिदिन करण्यात आली असून, यंदा ४ लाख मेट्रिक टन ऊस गाळपाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यावर्षी ऊस तोडणीसाठी २२ हार्वेस्टर, ५० बैलगाड्या आणि अन्य वाहतुकीचे नियोजन करण्यात आले आहे.कार्यक्षेत्रात सुमारे १५ लाख मेट्रिक टन ऊस उपलब्ध असल्याचे सांगण्यात आले आहे.

**राज्य सरकारकडून १८ कोटीची मदत**

राज्य सरकारने कारखान्याच्या आर्थिक अडचणी दूर करण्यासाठी १८ कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे .दोन बँकांचे सुमारे १० कोटी रुपयांचे कर्ज फेडून मालमत्ता तारणमुक्त करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे आ.अभिमन्यू पवार यांनी सांगितले.

**शेतकऱ्यांनी ऊस निळकंठेश्वरला द्यावा : आ. अभिमन्यू पवार**

कारखान्याचे सुमारे ८५ टक्के आधुनिकीकरण पूर्ण झाले आहे. कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा असून आपण विश्र्वस्त म्हणून काम करत आहोत. शेतकऱ्यांना योग्य दर देण्याचा प्रयत्न राहील. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला ऊस निळकंठेश्वर कारखान्याला द्यावा. असे आवाहन आ.अभिमन्यू पवार यांनी केले.

औसा व निलंगा तालुक्यातील लगतची ६१ गावे कार्यक्षेत्रात समाविष्ट करण्यास तसेच अधिकृत भागभांडवल ५२.५० कोटींवरून ६० कोटी रुपये करण्यास मंजुरी देण्यात आली.

किल्लारी कारखाना परिसरात कृषी विज्ञान केंद्र सुरू करण्यासाठी शासनाकडे मागणी करण्यात आली आहे. मंजुरी मिळाल्यास कारखान्याकडून १२ एकर जमीन उपलब्ध करून देण्यात येणार आहे.सभेस प्रविण फडणीस, समृत जाधव, सुभाषराव जाधव, वैधानिक लेखापरीक्षक व्ही. व्ही. डोके, आकुसकर, संतोष मुक्ता, परिक्षीत पवार, राम पाटील, बळीराम पाटील, पतंगे, शिवाजीराव पाटील उत्लेकर यांच्यासह शेतकरी सभासद, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना टँकरने पाणीपुरवठा व्हावा यासाठी पाठपुरावा करणार : आ. संजय बनसोडे




तभा वृत्तसेवा

उदगीर : लातूर जिल्ह्यातील सर्वात मोठी बाजार समिती म्हणून उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीचा विस्तार आणि विकास करण्यासाठी आपण खंबीरपणे पाठीशी उभे राहणार असून, बाजार समितीशी संबंधित सर्व प्रस्तावित कामे मार्गी लावण्यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा करणार असल्याची ग्वाही माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी दिली.

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेप्रसंगी शेतकरी बांधवांशी संवाद साधताना आ. संजय बनसोडे बोलत होते. यावेळी बाजार समितीच्या विकासासह शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर त्यांनी भूमिका मांडली.

यावेळी सभापती शिवाजीराव हुडे, उपसभापती प्रिति भोसले, संचालक कल्याण पाटील, बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, गटनेते दिलीप मटके, जि.प. सदस्य उमेश उमापुरे, बालाजी भोसले, वसंत पाटील, बाळासाहेब मरलापल्ले, विक्की भोसले, प्रा.श्याम डावळे, ज्ञानेश्र्वर पाटील दावणगावकर, प्रमोद पाटील, सोपानराव ढगे, बालाजी देवकत्ते,रविंद्र कोरे, गौतम पिंपरे, रामेश्र्वर बिरादार, प्रदिप पाटील, सर्जेराव भांगे , श्रीधर बिरादार, दत्ता सुरनर, आकाश वाघमारे, विठ्ठलराव मुळे, विकास देशमाने, विवेक सुकणे, शिवाजी सुकणे, नागेश आंबेगावे, संदिप पाटील, बबन धनबा, अशोक माने, संग्राम भोसले, शिवानंद नष्टे, शुभम केंद्रे, गजानन दळवे पाटील, आकाश वाघमारे, आदीसह देवर्जन, डिग्रस, लोणी, सुकणी, सताळा, डाऊळ, कल्लुर, डोंगरशेळकी आदी गावचे चेअरमन व सरपंच, उपसरपंच, व्यापारी, हमाल, शेतकरी उपस्थित होते.

उदगीरची बाजार समिती भविष्यात अधिक सक्षम आणि सुसज्ज करण्याच्या दृष्टीने १०० एकर जागेत विस्तारित मार्केट कमिटी उभारण्याचा मानस असल्याचे त्यांनी सांगितले. बाजार समितीसाठी सुसज्ज प्रशासकीय इमारत उभारण्यासह आवश्यक पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संबंधित पणन मंत्र्यांकडे प्रत्यक्ष जाऊन प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

शेतकरी हा बाजार समितीच्या केंद्रस्थानी असून, शेतकऱ्यांवर कोणतेही संकट ओढवल्यास बाजार समितीच्या माध्यमातून आवश्यक ती मदत करण्यासाठी प्रयत्न केले जातील. सध्या दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून, या परिस्थितीची गंभीर दखल घेऊन दुष्काळाच्या अनुषंगाने राज्य शासन शेतकऱ्यांसोबत असल्याचे आ. बनसोडे म्हणाले.

दुष्काळामुळे पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठी पाण्याचा प्रश्न गंभीर होऊ नये, यासाठी गरज भासल्यास शेतकऱ्यांना टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यासाठी प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

उदगीर मतदारसंघाच्या सहकार क्षेत्राला अधिक बळकटी देण्यासाठी सुमारे २० कोटी रुपयांचे सहकार भवन उभारण्याचा मानस असल्याचे त्यांनी नमूद केले. बाजार समिती, सहकार क्षेत्र आणि शेतकरी यांच्या विकासासाठी उपलब्ध असलेल्या विविध योजनांचा प्रभावीपणे उपयोग करून घेण्याची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी सर्वांनी एकसंघ राहणे आवश्यक आहे. विकासाच्या प्रश्नांवर राजकीय मतभेद बाजूला ठेवून शेतकरी, व्यापारी, हमाल, मापाडी आणि बाजार समितीशी संबंधित सर्व घटकांनी एकत्रितपणे काम केल्यास उदगीर बाजार समितीचा विकास अधिक वेगाने साध्य होईल, असे आवाहन आ. संजय बनसोडे यांनी केले.

उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा, बाजारपेठ आणि पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनस्तरावर आवश्यक तो पाठपुरावा करण्याची ग्वाही आ.संजय बनसोडे यांनी यावेळी दिली.

### दसरा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी संगम पाटील यांची तर सचिव पदी अमर पाटील



तभा वृत्तसेवा

अहमदपूर दि. २८ सप्टेंबर : अहमदपूर तालुक्यातील सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या पदाधिकाऱ्याची व्यापक बैठक शासकीय विश्राम ग्रहांमध्ये मार्गदर्शक ओम भाऊ पुणे यांच्या अध्यक्षतेखाली होऊन तीत २०२६ सार्वजनिक दसरा महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी संगम पाटील यांची तर सचिव पदी अमर पाटील यांची बिनविरोध निवड सर्वांनू मते करण्यात आली

उर्वरित कार्यकारणी खालील प्रमाणे उपाध्यक्ष म्हणून जयराज तेलंगे, सुरज पाटील, सहसचिव अजित शेटकार, कोषाध्यक्ष राजेश्र्वर कल्याणी यांची तर सदस्य म्हणून नामदेव शेळके, गौरव चवडा, सुनील तत्तापुरे, संतोष गोरे, प्रताप पाटील, गंगाधर सूर्यवंशी, त्र्यंबक महाजन यांची तर सजावट प्रमुख म्हणून नितीन धर्माधिकारी, योगेश शेटकार, गजानन सूर्यवंशी, गोविंद हिवरे यांची प्रसिद्धी प्रमुख अक्षय कदम, रांगोळी प्रमुख मुन्ना आया यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी शिवकुमार उटगे, चिंतामणी येवनदगे, प्रा, विश्र्वंभर स्वामी, सूर्यकांत अय्या, गणेश कोदळे, नगराध्यक्ष स्वप्निल व्हत्ते, डॉ. अशोक सांगवीकर यांची मनोगतवर भाषणे झाली. अध्यक्षीय समारोप ओम भाऊ पुणे यांच्या भाषणांने करण्यात आला. सूत्रसंचालन राम तत्तापूरे, यांनी अहवाल वाचन साईनाथ पाटील यांनी तर आभार गोविंद गिरी यांनी मानले.

या सोहळ्याला धनंजय जोशी, नगरसेवक संदीप चौधरी नगरसेवक एडवोकेट किशोर कोरे, नगरसेवक एडवोकेट अजिंक्य चामे, रवी महाजन, राम पाटील, सुभाष गुंडिले, भागवत पाटील, संतोष निटुरे यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

## श्रद्धा, प्रज्ञा आणि आचरणातूनच धम्मजीवन समृद्ध होते : भंते धम्मसार



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. २८ सप्टेंबर : बुद्धांचा धम्म केवळ श्रद्धेने स्वीकारून किंवा धम्माचे विचार ऐकून जीवन बदलत नाही. धम्म समजून घेण्यासाठी मन श्रद्धावान असण्याबरोबरच प्रज्ञावान झाले पाहिजे आणि त्या धम्मविचारांचे आचरण जीवनात उतरले पाहिजे. शील, समाधी आणि प्रज्ञेच्या मार्गाने चालत असताना माणसाच्या मनातील विकार कमी होतात आणि त्याच्या जीवनात मैत्री, करुणा, समता व सदाचाराची निर्मिती होते, असे प्रतिपादन पूज्य भंते धम्मसार यांनी केले.

तालुक्यातील माळेगाव (क) येथे वर्षावास कालीन एकदिवसीय अनापान ध्यान व धम्मसंस्कार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपासक-उपासिकांना मार्गदर्शन करताना भंते धम्मसार बोलत होते.

पुढे बोलताना भंते धम्मसार म्हणाले की, भगवान बुद्धांनी माणसाला स्वतःच्या दुःखाचे कारण शोधण्याचा आणि त्यातून मुक्त होण्याचा मार्ग दाखविला. म्हणून धम्म म्हणजे केवळ पूजा, वंदना किंवा विधी नव्हे; तर स्वतःच्या मनाचा शोध घेऊन चुकीच्या प्रवृत्तींवर विजय मिळविण्याची जीवनपद्धती आहे. अनापान ध्यानातून श्र्वासाच्या नैसर्गिक प्रक्रियेचे निरीक्षण करताना मन हळूहळू स्थिर होते. मन स्थिर झाले की विचारांकडे पाहण्याची दृष्टी बदलते आणि त्यातून आत्मपरीक्षणाची प्रक्रिया सुरू होते.

धम्माची खरी ताकद समाजात समता निर्माण करण्यात आहे. जात, वर्ण, उच्च-नीचतेच्या भिंती नाकारून प्रत्येक माणसाकडे माणूस म्हणून पाहण्याची शिकवण बुद्धांनी दिली. त्यामुळे बुद्धांच्या धम्माचा स्वीकार करणाऱ्या प्रत्येकाने केवळ धम्माची ओळख सांगण्यापेक्षा पंचशीलाचे पालन, सदाचार, करुणा, मैत्रीभाव आणि विवेकशील विचार आपल्या आचरणातून समाजासमोर ठेवला पाहिजे. धम्म घराघरात पोहोचविण्याची सुरुवात स्वतःपासून झाली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वर्षावास हा आत्मपरीक्षण, धम्मश्रवण आणि साधनेसाठी महत्त्वाचा काळ असून, या काळात उपासक-उपासिकांनी नियमित ध्यान, धम्मअभ्यास आणि सदाचरणाला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवावा, असे आवाहनही भंते धम्मसार यांनी केले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज चौकातून पूज्य भंते धम्मसार यांना सामाजिक सभागृहापर्यंत पुष्पवृष्टी करीत सन्मानपूर्वक आणण्यात आले. त्यानंतर तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे सरपंच सरस्वती उघाडे यांच्या हस्ते दीप, धूप व पुष्प अर्पण करून पूजन करण्यात आले. पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

शिबिरात माळेगाव (क) तसेच परिसरातील उपासक, उपासिका, बालक व बालिका मोठ्या संख्येने सहभागी झाले. अनापान ध्यान, धम्मसंस्कार आणि मार्गदर्शनाच्या माध्यमातून उपस्थितांनी धम्मजीवनाची दिशा समजून घेतली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सूर्यकांत उघाडे, भीमराव पोस्ते, संतोष नाटकर, दत्तात्रय पोस्ते, शिवाजी खलुले, गजेंद्र नाटकर, संदीपान बामदे, नेताजी विनकर, राहुल विनकर, अमोल पोस्ते, मिलिंद उघाडे यांच्यासह उपासकांनी परिश्रम घेतले. संघर्ष महिला बचत गट, प्रबोधिनी महिला बचत गट तसेच इतर महिला बचत गटातील महिलांनीही कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

### आदर्श शिक्षक विजयकुमार कोरे सरांचा मित्रपरिवाराकडून गौरव

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. २८ सप्टेंबर : जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या वतीने सन २०२३-२४ चा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले शिक्षक विजयकुमार सदाशिव कोरे यांचा मित्रपरिवाराच्या वतीने शाल, फेटा, श्रीफळ व पुष्पहार देऊन गौरव करण्यात आला.

कोरे सरांनी शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसोबतच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली तळमळ यामुळे त्यांचे कार्य इतर शिक्षकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.

पुरस्काराच्या निमित्ताने आयोजित या सत्कार सोहळ्याचे नियोजन संदिप धुमाळे, माजी शहराध्यक्ष राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) यांनी केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी कोरे सरांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

यावेळी सेवानिवृत्त आदर्श शिक्षक गुंडेराव आवाळे गुरुजी, दीपक धुमाळे, अशोक कोरे, गुरुबस सुगावे गुरुजी, कुमार संभाळे गुरुजी, नगरसेवक संतोष शिवणे, नगरसेवक सुधीर लखनगावे, धनंजय देवंगरे, अकबर तांबोळी, म्हेत्रे, महादेव नाबदे,अजय धुमाळे, महादेव कोरे आदी उपस्थित होते.




## किनगावकरांचा संताप: ग्रामपंचायतीला, भीम नगर येथील नालीतील घाण दिशेना का ?



तभा वृत्तसेवा

किनगाव दि.२७ सप्टेंबर : किनगाव येथील दलित वस्तीत घाणीने नाल्या तुडुंब भरल्यामुळे येथील नागरिकांच्या आरोग्यास धोका होत असल्याचे जनतेमध्ये बोलले जात आहे. अहमदपूर तालुक्यातील नवाजलेली मोठी ग्रामपंचायत म्हणून या ग्रामपंचायतीचा पंचक्रोशीत नाव आहे. परंतु म्हणतात ना नाव मोठे लक्षण खोटे असाच प्रकार येथील दलित वस्ती अंतर्गत येणाऱ्या भीम नगर येथे ग्रामपंचायतीच्या सरपंच व उपसरपंच यांच्या इकडून सध्या जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याची जनतेमध्ये चर्चा होत आहे. या वस्तीतील नाल्या घाणीने तुडुंब भरल्यामुळे या वस्तीतील जनतेचे आरोग्य धोक्यात आले असल्याचे दिसत आहे. या एरियातून ये जा करणाऱ्या जनतेला अक्षरशा नाकाला रुमाल लावून जावे लागते. येथील स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत असून भीम नगर येथील या गोष्टीकडे येथील ग्रामपंचायतीचे लक्ष दिसत नसल्याचे भीम नगर येथील जनता बोलत आहे. किनगाव शहरात अनेक ठिकाणी कचऱ्याची ढीग, अस्वच्छ रस्ते आणि साचलेल्या घाणीमुळे नागरिकांना नाहक त्रास सोसावा लागत आहे. स्वच्छतेची जबाबदारी नेमकी कोणाची? असा सवाल नागरिकाकडून उपस्थित केला जात आहे. अशा समस्या सोडविण्याबाबत ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी करूनही ठोस उपाययोजना होत नसल्याची नागरिकांची तक्रार आहे. शहर स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी येथील ग्रामपंचायतीची असताना, नागरिकांना मात्र अस्वच्छतेचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. ग्रामपंचायतीने स्वच्छता मोहीम राबवून भीम नगर येथील घाणीचे साम्राज्य असलेल्या नाल्या साफ कराव्या अशे येथील नागरिकांमध्ये बोलले जात आहे

# दुष्काळसदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांना सर्वतोपरी सहकार्य- मंत्री बावनकुळे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ सप्टेंबर**

दुष्काळसदृश्य परिस्थितीत शासन संवेदनशीलतेने काम करीत असून, शेतकरी, विद्यार्थी, शेतमजूर, नागरिक आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी विविध सवलती व उपाययोजना लागू करण्यात आल्या आहेत. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, औंढा नागनाथ, कळमनुरी, सेनगाव आणि वसमत या पाचही तालुक्यांचा यामध्ये समावेश आहे. या तालुक्यातील पीक परिस्थितीचे तात्काळ पंचनामे करून नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती प्रशासनाने संकलित करावी, असे निर्देश राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. शेतकऱ्यांनी धीर सोडू नये, शासन त्यांच्या पाठीशी असून त्यांना सर्वोतोपरी सहकार्य केले जाईल, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी कळमनुरी तालुक्यातील अराठी येथे दुष्काळसदृश्य पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतातील पिकांची पाहणी करून शेतकऱ्यांशी आस्थेवाईकपणे संवाद साधला. पिकांचे नुकसान, पावसातील खंड आणि सद्यः स्थितीबाबत शेतकऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. संकटाच्या काळात शासनाकडून आवश्यक ती मदत उपलब्ध करून देण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी शेतकऱ्यांना दिले.

यावेळी सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, आमदार संतोष बांगर, आमदार डॉ. प्रज्ञा सातव, जिल्हाधिकारी राहुल गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, जिल्हा पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी प्रदीप कच्छवे, जिल्हा कृषी विकास अधिकारी अतुल वायसे, उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भुते, तहसीलदार जे. के. कांबळे, तालुका कृषी अधिकारी के. एस. जाधव, पदाधिकारी, शेतकरी आदी उपस्थित होते.

जिल्ह्यात निर्माण झालेल्या दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सर्व तालुक्यांतील पीक नुकसानीचे तात्काळ पंचनामे करण्याचे निर्देश महसूल मंत्री श्री. बावनकुळे यांनी प्रशासनाला दिले. पंचनाम्यांची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर पीक नुकसानीचे वस्तुनिष्ठ चित्र स्पष्ट होण्यास मदत होईल. दुष्काळाच्या परिस्थितीत चारा, पिण्याचे पाणी, पशुधनासाठी पाणी तसेच शेतकऱ्यांना आवश्यक आर्थिक मदत याबाबत तत्परतेने काम करण्यात येईल असेही सांगितले.

हिंगोली जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात सुमारे तीन लाख हेक्टर क्षेत्रावर पेरणी झाली आहे. यापैकी सुमारे अडीच लाख हेक्टर क्षेत्रावर सोयाबीन, ३३ हजार हेक्टरवर तूर, तर ३४ हजार हेक्टर क्षेत्रावर कापूस लागवड करण्यात आली आहे. पावसाचा लांबलेला खंड आणि प्रतिकूल परिस्थितीमुळे विशेषतः सोयाबीन पिकाला मोठा फटका बसल्याचे यावेळी सांगितले.

राज्य शासन संवेदनशीलतेने काम करीत असून, राज्यातील मंत्री, खासदार आणि आमदार शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थितीची पाहणी करीत आहेत. संकटाच्या काळात शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली. जनावरांसाठी आवश्यक चारा उपलब्ध करून देणे, जलसंधारणाची कामे सुरू करणे, पिण्याच्या पाण्याचे तसेच पशुधनासाठी पाण्याचे योग्य नियोजन करणे, यावर विशेष भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शासनाने घेतलेल्या निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी करून शेतकरी व नागरिकांना आवश्यक तो दिलासा मिळेल, यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे, अशा सूचनाही महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

# महसूल मंत्र्यांनी स्वीकारली शेतकरी, नागरिकांची निवेदने

## शेतकरी, नागरिकांच्या प्रश्नांवर होणार कार्यवाही



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ सप्टेंबर**

दुष्काळसदृश्य परिस्थितीची पाहणी करण्यासाठी हिंगोली जिल्हा दौऱ्यावर आलेले राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शासकीय विश्राम गृह येथे पत्रकार, शेतकरी तसेच नागरिकांच्या विविध मागण्यांशी संबंधित निवेदने स्वीकारली.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मघना साकोरे-बोर्डीकर, खासदार रामराव वडकुते, आमदार डॉ. प्रज्ञा सातव व पदाधिकारी आदीची उपस्थिती होती.

यावेळी विविध प्रश्न व मागण्यांबाबत नागरिकांनी महसूलमंत्री बावनकुळे यांच्याकडे निवेदने सादर केली. शेतकऱ्यांच्या अडचणी, दुष्काळी परिस्थितीतील उपाययोजना तसेच स्थानिक पातळीवरील विविध विकासकामांबाबत नागरिकांनी आपल्या मागण्या मांडल्या. यावेळी मोठ्या संख्येने जिल्ह्यातील विविध भागातील शेतकरी, शेतमजूर तसेच नागरिक उपस्थित होते. प्रत्येकांची निवेदने स्विकारात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संवाद साधला तसेच निवेदकांचे म्हणणे थोडक्यात ऐकून घेत त्यांचे समाधान करण्याचा प्रयत्न केला.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी संबंधित निवेदनाची दखल घेत, नागरिकांनी मांडलेल्या प्रश्नांबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे सांगितले. यावेळी भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिंगोलीत काँग्रेसचे मुख्य निवडणुक आयुक्ताविरोधात आंदोलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ सप्टेंबर**




एसआयआरच्या माध्यमातून मत चोरी करणाऱ्या मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना बडतर्फ करून अटक करा या मागणीसाठी येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेस पक्षाचयवतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी मुख्य निवडणुक आयुक्तांच्या प्रतिकात्मक पूतळ्याचे दहन करण्यात आले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सोमवारी मुख्य निवडणुक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेस पक्षाच्यावतीने आंदोलन करण्यात आले. यावेळी एसआयआर, नव मतदारांचे अनधिकृत नोंदणी, नावे वगळणे आणि निवडणुक आयोगाच्या आयटी प्रणालीचे केलेले केंद्रीकरण या विरोधात आंदोलन करण्यात आले. संतप्त कार्यकर्त्यांनी मुख्य निवडणुक आयुक्तांचा प्रतिकात्मक पूतळा दहन केला. त्यानंतर जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. निवेदनावर जिल्हाध्यक्ष डॉ सतीश पाचपुते, जक्की कुरेशी, सुरेशअप्पा सराफ, साहेबराव देवकते, जुबेर मामू, डॉ रमेश शिंदे यांच्यासह पदाधिकारी व कार्यर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

यावेळी महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचाताफाजिल्हाधिकारीकार्यालयासमोरून जात असतांना मंत्री बावनकुळे यांनी गाडी थांबवून काँग्रेसच्या आंदोलनाची दखल घेत निवेदन स्विकारले.



**हिंगोली- खासदार रामराव वडकुते यांच्या निवासस्थानी घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरास राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी भेट दिली. यावेळी खासदार रामराव वडकुते, मंत्री मेघनाताई बोर्डीकर, आमदार डॉ. प्रज्ञा राजीव सातव, शिवाजी मुटकुळे, शशिकांत वडकुते, रजनी पाटील, सुनिता मुळे, क्रिष्णा रूहिटीया, कविता इमडे, वर्षा खंदारे, आदींची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### शिरड शहापूर येथे मोफत शिबीर संपन्न



औंढा नागनाथ -शिरड शहापूर येथे गॅलेक्सी हेल्थकेअर चॅरिटेबल ट्रस्ट नांदेड येथील डॉ. नितीन जोशी यांच्यामार्फत मोफत इंडॉस्कॉपी व रक्त तपासणी शिबिर घेण्यात आले. या कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना उपतालुकाप्रमुख प्रेम स्वामी यांनी केले होते. या शिबिरामध्ये शेकडो रुग्णांची तपासणी व २६ जणांची यशस्वीरित्या इंडॉस्कॉपी करण्यात आली. यावेळी श्रीशैल्य स्वामी महाराज माजी जिल्हा परिषद सदस्य, डॉ श्याम गबारे, शंकर स्वामी, गजानन स्वामी, अशोक देशमुख, लिंबाजी कठाळे, कृष्णा जोगदंड, पिंटू स्वामी, अविनाश मलमवार, कृष्णा नेव्हल, गंगा जाधव, सतीश लुटे व सर्व गावकरी उपस्थित होते.

### पूरजळ आरोग्य उपकेंद्राला सर्वोत्कृष्ट मानांकन

हिंगोली- हिंगोली जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बाजार अंतर्गत उपकेंद्र पूरजळ या आरोग्य संस्थेने राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन कार्यक्रम अंतर्गत केंद्रीय आरोग्य संस्था राष्ट्रीय आरोग्य व्यवस्था संसाधन केंद्र दिल्ली ह्यानी निर्धारित केलेल्या निर्देशांक ह्यांची पूर्तता करून, विशेष परीक्षण केंद्रीय गठीत समिती मार्फत करण्यात आले. सदरील केंद्रीय परीक्षण ७ ऑगस्ट २०२६ रोजी संपन्न झाले त्यांचा मुद्दे निहाय परीक्षण करून अहवाल केंद्रीय समितीस सादर करण्यात आला. सदरील अहवालानुसार उपकेंद्र पूरजळ या आरोग्य संस्था ज्याने ८८.८९% गुण प्राप्त करून राष्ट्रीय गुणवत्ता आश्वासन मानांकन केंद्रीय महत्त्वाकांक्षी पुरस्कार प्राप्त झाला आहे. उपकेंद्र पूरजळ याना आरोग्य संस्थेचा बहुमान मिळाला. त्याबद्दल राज्यस्तरीय अधिकारी ह्यानी भरभरून कौतुक केले व स्थानिक नागरिकांनी अभिनंदन करून कौतुक केले आहे याचे श्रेय पूरजळ उपकेंद्राची टीम व वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र जवळा बाजार यांच्यासह संपूर्ण कर्मचारी आणि जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रशांत पुठावार यांनी सुद्धा अथक परिश्रम घेऊन सहकार्य केले यांची भूमिका सर्वात महत्त्वाची आहे.हे उच्चस्तरीय मानांकन प्राप्त करण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता व मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांचें वेळोवेळी प्रेरणादायी मार्गदर्शन आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन मिळाले.

### जिल्हा कचेरीत माहीती अधिकार दिन साजरा

हिंगोली- जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवार दि २८ सप्टेंबर रोजी माहिती अधिकार दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी तहसीलदार तोटावर, नायब तहसीलदार गोळेगावकर, नायब तहसीलदार जोशी यांच्यासह कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# डिग्रस कऱ्हाळे सर्कलमधील अनेक कार्यकर्त्यांचा भाजपमध्ये प्रवेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस सर्कलमधील डिग्रस, लोहगाव, पेहणी आणि वैजापूर या गावांतील नागरिक व कार्यकर्त्यांनी हिंगोलीचे आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त करत भारतीय जनता पक्षात मोठ्या संख्येने प्रवेश केला.

आमदार तानाजीराव मुटकुळे यांच्या माध्यमातून मतदारसंघात विविध विकासकामे मोठ्या प्रमाणात करण्यात आली असून, या विकासकामांमुळे प्रभावित होऊन तसेच गावांच्या विकासासाठी भाजपच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत अनेक कार्यकर्ते व नागरिक पक्षात सहभागी झाल्याचे यावेळी सांगण्यात आले. डिग्रस सर्कलमधील चार गावांतून झालेल्या या पक्षप्रवेशामुळे परिसरात भाजपची संघटनात्मक ताकद वाढल्याचे चित्र आहे. नव्याने पक्षात दाखल झालेल्या कार्यकर्त्यांचे पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. यावेळी भाजप युवा जिल्हाध्यक्ष शिवाजीराव मुटकुळे, उपजिल्हाध्यक्ष संतोष टेकाळे, तालुकाध्यक्ष माणिक लोडे, डिग्रस सर्कलचे संपर्कप्रमुख रमेश कराळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. आगामी काळात डिग्रस सर्कलमधील विविध गावांमध्ये पक्ष संघटना अधिक मजबूत रण्याचा निर्धार यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

# दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर अधिकारी, कर्मचाऱ्यांना पूर्वपरवानगीशिवाय रजा मंजूर करू नये

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २८ सप्टेंबर**

खरीप हंगाम २०२६ मधील अंतर्गत जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती घोषित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणाची कामे तसेच नागरिकांना आवश्यक सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्याच्या कामांना प्राधान्य देण्याच्या सूचना जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांना देण्यात आल्या आहेत.

दुष्काळी परिस्थितीचा कालावधी लक्षात घेता, जिल्ह्यातील सर्व कार्यालय प्रमुखांनी जिल्हाधिकारी, हिंगोली यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय अधिनस्त अधिकारी-कर्मचाऱ्यांची कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करू नये, असे निर्देश देण्यात आले आहेत. अत्यंत अपरिहार्य व अपवादात्मक परिस्थितीत रजेची आवश्यकता असल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी त्याबाबतची बाब जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून, पूर्वपरवानगी प्राप्त केल्यानंतरच संबंधितांची रजा मंजूर करावी.

या कालावधीत सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपल्या कार्यालयीन कर्तव्यावर नियमितपणे उपस्थित राहून दुष्काळाच्या अनुषंगाने सोपविण्यात येणारी कामे तसेच कार्यालयीन कामकाज तत्परतेने, जबाबदारीने आणि प्राधान्याने पार पाडावे, असेही निर्देश आहेत. जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही अधिकारी अथवा कर्मचारी कर्तव्यावरून अनुपस्थित राहणार नाही, याची दक्षता कार्यालय प्रमुखांनी घ्यावी, असे परिपत्रक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी निर्गमित केले आहे.

सदर सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याचे निर्देश देण्यात आले असून, अनधिकृतपणे अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्या विरुद्ध प्रचलित सेवा नियमांनुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही करण्यात येईल, अशी स्पष्ट सूचना देण्यात आली आहे.

दरम्यान, मदत व पुनर्वसन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक : समिती-२०२६-/प्र.क्र.८२/मदत-२, दि. २५ सप्टेंबर २०२६ अनुषंगाने सदर परिपत्रकाची तात्काळ प्रभावाने अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# मराठवाडा साहित्य परिषदेच्या वर्धापन दिनानिमित्त कवी संमेलन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २८ सप्टेंबर**




मराठवाडा साहित्य परिषदेचा ८३ वा वर्धापनदिन आणि त्यानिमित्ताने आयोजित करण्यात आलेले कवी संमेलन रविवार, दि. २७ सप्टेंबर २०२६ रोजी हिंगोली येथे उत्साहात संपन्न झाले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष म सा प चे अध्यक्ष प्राचार्य कौतिकराव ठाले पाटील व प्रमुख पाहुणे ज्येष्ठ लेखक बाबाराव मुसळे (वाशीम) हे होते. मसापचे कार्यवाह डॉ. दादा गोरे,उपाध्यक्ष डॉ. आसाराम लोमटे,श्री रामचंद्र तिरुके,डॉ. रामचंद्र काळुंखे, डॉ. गणेश मोहिते, डॉ. दीपा क्षीरसागर, मराठवाड्यातून आलेले नामवंत लेखक, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य तसेच नामदेव वाबळे,महारुद्र घेणेकर, दिलीप धामणे उपस्थित होते.

यावेळी ज्येष्ठ साहित्यिक अशोक अर्धापुरकर, विजय वाकडे व प्रा. विलास वैद्य या ज्येष्ठ साहित्यिकांचा साहित्यातील योगदानाबद्दल मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्रा.कौतिकराव ठाले पाटील यांनी मराठवाड्याच्या साहित्यिक, सांस्कृतिक आणि सामाजिक जडणघडणीत मराठवाडा साहित्य परिषदेचे महत्त्वपूर्ण योगदान विशद केले. संत नामदेवांच्या या भूमीत साहित्याची रुजवणूक शेकडो वर्षांपासून झालेली आहे तीच परंपरा ज्येष्ठ साहित्यिकांनी पुढे सुरू ठेवली मसापणे वाचन संस्कृती व लेखन संस्कृती रुजवण्यासाठी विविध उपक्रम योजना अंमलात आणल्या. दादा गोरे यांनी साहित्यिकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणे, नवोदित लेखक-कवींना प्रोत्साहन देणे तसेच साहित्यप्रेमींमध्ये वाचन व लेखनाची आवड निर्माण करण्याच्या उद्देशाने परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जातात असे सांगितले. त्याच परंपरेचा एक भाग म्हणून मराठवाडा साहित्य परिषदच्या वतीने या वर्धापनदिनाचे आयोजन करण्यात आले आहे. तीनही साहित्यिकांच्या साहित्यिक रचनांवर प्रकाश टाकण्यात आला. या कार्यक्रमाचे संचलन राधिका देशमुख यांनी व आभार प्रदर्शन दिलीप धामणे यांनी केले.

सकाळ सत्रा मध्ये मराठवाडा साहित्य परिषदेची केंद्रीय कार्यकारिणीची बैठक झाली. तदनंतर आजीवन सभासदांची आमसभा पार पडली त्यामध्ये विविध ठरावांवर सविस्तर चर्चा करण्यात येऊन सर्वानुमते ठराव पास करण्यात आले. विविध संमेलनांच्या नियोजनाविषयी चर्चा झाली. विविध जिल्ह्यांमधून आलेल्या शाखाध्यक्ष व पदाधिकाऱ्यांच्या सूचना, प्रतिक्रिया व ठाले पाटील यांचे मार्गदर्शन असा भरगच्च कार्यक्रम पार पडला.

वर्धापनदिन समारंभानंतर सायंकाळी निमंत्रितांचे कवी संमेलन संपन्न झाले. कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विलास वैद्य होते. मसापचे हिंगोली शाखा अध्यक्ष अशोक अर्धापुरकर यांनी प्रास्ताविक केले तर दिलीप धामणे यांनी ओघवते सूत्रसंचालन केले. महारुद्र घेणेकर,प्रकाश अंभोरे, शफी बोल्डेकर, गणेश आघाव, कलानंद जाधव, मुरलीधर पंढरकर, राजाराम बनसकर, सिंधुताई दहिफळे, राजकुमार मोरगे, दिलीप धामणे, पारिजात देशमुख, रघुनाथ घुगे, राधिका देशमुख, विजय ठाकरे, रसिका विडोळकर, गायत्री दरगु, सविता देशमुख, गौरी गुंडेवार, शिवदास पोटे, विजय गुंडेकर, मनोहर दिपके, शिवाजी कऱ्हाळे, श्रीरंग थोरात, महेश मंगनाळे यांनी बहारदार कविता सादर केल्या.

या कवी संमेलनाच्या माध्यमातून विविध विषयांवरील कविता, सामाजिक जाणीवा, मानवी संवेदना, ग्रामीण जीवन, साहित्यिक अनुभव आणि समकालीन वास्तवाचे प्रतिबिंब रसिकांना अनुभवता आले. त्यामुळे हिंगोलीसह जिल्ह्यातील साहित्यप्रेमींसाठी हा कार्यक्रम विशेष पर्वणी ठरला.

या वर्धापनदिन सोहळ्यास कवी संमेलनास साहित्यप्रेमी माजी शिक्षणाधिकारी शिवाजीराव पवार, नगरसेवक प्रा सुखदेव बलखंडे, चंद्रकांत पाईकराव, थवा प्रकाशनाचे गोडाती काळे, रघुवीर पतंगे, विजया पतंगे, ग्रंथपाल ससे, गाडे, दिपके काव्यरसिक, लेखक, कवी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन मराठवाडा साहित्य परिषद संभाजीनगर व शाखा हिंगोली शाखेचे सर्व सदस्य यांच्या परिश्रमातून यशस्वी करण्यात आले.

साहित्य क्षेत्रातील मान्यवरांचा सन्मान, साहित्यिकांच्या उपस्थितीत वर्धापनदिन सोहळा आणि जिल्ह्यातील मान्यवर व नवोदित कवींच्या काव्यवाचनाने हा साहित्यिक सोहळा उज्वल इंग्लिश स्कूल, हिंगोली येथे पार पडला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवरून खा. अशोक चव्हाणांचे विरोधकांना थेट प्रत्युत्तर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ सप्टेंबर -**

राष्ट्रीय पातळीवर भारतीय जनता पक्षाची भूमिका मांडणाऱ्या प्रवक्त्यांच्या धर्तीवर आता नांदेडमध्येही माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण यांनी निवडणूक आयोगाच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेवरून विरोधकांना थेट प्रत्युत्तर दिले. मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन निवडणूक आयुक्तांनी संयुक्त निवेदन जारी करून आयोगात मतभेद असल्याच्या चर्चेला पूर्णविराम दिल्याचा दावा चव्हाण यांनी केला. मात्र, ज्या वृत्ताच्या पार्श्वभूमीवर हा वाद निर्माण झाला, त्या इंडियन एक्स्प्रेस'मधील वृत्ताबाबत नेमकी कारवाई काय झाली? या प्रश्नावर आयोगाच्या निवेदनात स्पष्टता नसल्याचे सांगत चव्हाण यांनी विरोधकांच्या आरोपांवरही सवाल उपस्थित केले.

नांदेड येथे भाजपच्या वतीने आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना अशोक चव्हाण यांनी काँग्रेससह विरोधकांनी निवडणूक आयोगावर वारंवार संशय व्यक्त करण्याऐवजी मतदार याद्या अधिक अचूक आणि पारदर्शक



करण्याच्या प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन केले. यावेळी आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार तुषार राठोड, चैतन्यबापू देशमुख, भाजप जिल्हाध्यक्ष संतुजी हंबर्डे आणि डॉ. सचिन पाटील उमरेकर,अनिल पाटील बाभळीकर,महापौर कविता मुळे यांच्यासह भाजपचे पदाधिकारी उपस्थित होते.

**आयोगातील मतभेदांच्या चर्चेवर खा. चव्हाणांचे प्रत्युत्तर**

निवडणूक आयोगाच्या तिन्ही आयुक्तांनी संयुक्त निवेदन प्रसिद्ध करून निर्णयप्रक्रियेत मतभेद नसल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे आयोगात अंतर्गत संघर्ष असल्याचे चित्र उभे करण्याचा प्रयत्न चुकीचा असल्याचे चव्हाण म्हणाले.

विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्याकडून डखठ आणि निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर उपस्थित केलेल्या प्रश्नांचा संदर्भ देत चव्हाण यांनी घटनात्मक संस्थांबद्दल जनतेमध्ये संभ्रम निर्माण करू नये, असे सांगितले. कॅबिनेट सचिवांकडे पाठविण्यात आलेले पत्र हे धोरणात्मक निर्णयाशी संबंधित नसून एका अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीवरील नियुक्तीशी संबंधित असल्याचे आयोगाने स्पष्ट केल्याचा दावा त्यांनी केला. त्या पत्राला वेगळे राजकीय स्वरूप देऊन आयोगात मतभेद असल्याचे चित्र रंगवले जात असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**फॉर्म क्रमांक सहावरूनही राजकारण?**

नवीन मतदार नोंदणीसाठी वापरल्या जाणाऱ्या फॉर्म क्रमांक ६ वरूनही संभ्रम निर्माण केला जात असल्याचे चव्हाण यांनी म्हटले. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशांनुसार निर्धारित प्रक्रियेतच हा फॉर्म वापरला जात असल्याचा त्यांचा दावा आहे. निवडणूक जिंकल्यानंतर आयोग योग्य आणि पराभवानंतर आयोग चुकीचा अशी भूमिका राजकीय पक्षांनी सोडावी, असा टोला त्यांनी काँग्रेसला लगावला. तेलंगणा, पंजाब, हिमाचल प्रदेश आणि कर्नाटक येथील निवडणूक निकालांचा दाखला देत त्यांनी विरोधकांच्या आरोपांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

**ईव्हीएमनंतर आता निवडणूक आयोग लक्ष्य?**

ईव्हीएमच्या विश्वासार्हतेवर यापूर्वी आरोप करण्यात आले होते. ईव्हीएम हॅक करता येते, असा दावा करणाऱ्यांना ते प्रत्यक्ष सिद्ध करण्याचे आव्हान देण्यात आले होते, असे चव्हाण म्हणाले. आता ईव्हीएमचा मुद्दा बाजूला पडताच निवडणूक आयोगाला लक्ष्य केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. मतदारांनी दिलेला कौल स्वीकारणे हा लोकशाहीचा मूलभूत नियम आहे. प्रत्येक पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडणे म्हणजे अप्रत्यक्षपणे मतदारांच्या निर्णयावरच प्रश्न उपस्थित करणे ठरते, असे चव्हाण यांनी स्पष्ट केले.

**मतदार याद्यांतील त्रुटींवर लक्ष देण्याचे आवाहन**

मृत व्यक्तींची नावे, दुबार नोंदी, स्थलांतरित मतदार तसेच विवाहानंतर दुसऱ्या ठिकाणी गेलेल्या महिलांच्या नोंदी अशा विविध बाबींमुळे मतदार याद्यांमध्ये सुधारणा आवश्यक असल्याचे चव्हाण यांनी सांगितले. प्रत्येक राजकीय पक्षाला बूथ लेव्हल एजंट नियुक्त करण्याचा अधिकार आहे. मतदार यादीत त्रुटी आढळल्यास नियमानुसार दावे आणि हरकती दाखल करण्याची संधी उपलब्ध आहे. त्यामुळे रस्त्यावर आरोप-प्रत्यारोप करण्यापेक्षा उपलब्ध घटनात्मक प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. अखेर संविधान आणि संविधानाने निर्माण केलेल्या घटनात्मक संस्था मजबूत राहणे ही लोकशाहीची गरज आहे, असे सांगत निवडणूक आयोगाबाबत संभ्रम निर्माण करणाऱ्या राजकीय आरोपांना भाजपकडून प्रत्युत्तर दिले जाईल, अशी भूमिका अशोक चव्हाण यांनी नांदेडच्या पत्रकार परिषदेत स्पष्ट केली.

## महार रेजिमेंटच्या स्थापना दिनानिमित्त नांदेडमध्ये विशेष कार्यक्रम

**मुदखेड** -भारतीय सैन्यातील शौर्य, पराक्रम आणि त्यागाची गौरवशाली परंपरा लाभलेल्या महार रेजिमेंट तसेच प्रथम बटालियनच्या ६८व्या स्थापना दिनानिमित्त नांदेड येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील आजी-माजी सैनिकांनी या



कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे आवाहन सैनिक फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे यांनी केले आहे.मराठवाडा सैनिक फडरेशनचे अध्यक्ष लक्ष्मण देवदे यांनी प्रसिद्ध केलेल्या निवेदनानुसार, १ ऑक्टोबर २०२६ रोजी साई लॉन्स, पासदगाव रोड, नांदेड येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महार रेजिमेंटच्या शूर जवानांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांच्या गौरवशाली इतिहासाला अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच आजी-माजी सैनिकांचे कुटुंबीय आणि समाजातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. हा कार्यक्रम यश सिंधी आजी-माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन, महाराष्ट्र राज्य, शाखा नांदेड यांच्या वतीने आयोजित करण्यात आला आहे. कार्यक्रमास पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, प्रा. रवी सरोदे, दीपक कदम आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या कार्यक्रमास नांदेड जिल्ह्यातील आजी-माजी सैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सैनिक फेडरेशनचे मराठवाडा अध्यक्ष लक्ष्मण देवदे यांनी केले आहे.

## अयान आदमपूरकर चा प्रथम वाढदिवस शालेय साहित्य व वृक्षभेट देऊन साजरा

**आदमपूरकर** -बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी कवी,गीतकार,पत्रकार,व वन्यजीव प्रेमी जाफर फक्रूशा आदमपूरकर यांचे सुपूत्र अयान आदमपूरकर च्या प्रथम वाढदिवसानिमित्त बुधवार दि.१६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता गरजू मुलांना शालेय साहित्य व वृक्षभेट देऊन हर्षोल्लासात साजरा करण्यात आला.

सदरील वाढदिवसानिमित्त ग्राम परिसरातील माणिकराव पाटील, पत्रकार गंगाधर पंगलवार, बालाजी नाईक,सचिन पाटील हांद्रे,पुंडलिक नाईक,भगवान उप्पलवार,रमाकांत मठपती,ओमकार नाईक,अमोल नाईक,बालाजी डोईफोडे, संजय नागेश्वर,बालाजी नागेश्वर,निवृत्त एसटी वाहक शहा मैनोद्दीन,शेख शब्बीर,शेख मस्तान,शहा उस्मान,शेख महेबुबसाब,निवृत्त बँक सहाय्यक फक्रूशा मदार, बिस्मिल्लाबी मदार,जाफर आदमपूरकर,सना आदमपूरकर,चांडोळा बँक सहाय्यक महमदरफी मदार,रेश्मा मदार,समीरा शेख,निजाम शेख,शेख अजमोद्दीन,शेख फारूक,सुनंदा अनपलवार,शांताबाई नागेश्वर,पार्वतीबाई अनपलवार,शेख इरफान,राजू फोटोग्राफर बच्चे कंपनी शेख फरहान,अदिबा आदमपूरकर,आमेरा मदार,अमान मदार,सर्वज्ञ पाटील, दस्तगीर शेख,गौस शेख,शुभम नागेश्वर,अनन्या नागेश्वर,विठ्ठल नागेश्वर,अनुश्री नागेश्वर,श्रेयांश नागेश्वर, वेदांत नाईक,सृष्टी पाटील, गौतम कांबळे,सोहम अनपलवार,सार्थक सुनेवाड,नागेश मठपती,शेख रियान, शेख सुफियान,महेक शेख,विकास इंगळे,मन्मथ इंगळे, माहीन शेख,मुख्तार शेख,स्वरेष भुरे,सार्थक भुरे, क्रांती भुरे,महेबुब शेख,आदी प्रतिष्ठित नागरिक व लहान मुलांची विशेष भरगच्च उपस्थिती होती. सदरील उपक्रम आदमपूर परिसरात कौतुकास्पद ठरले आहे.

## तुषार वट्टमवार यांची कार्यालयीन अधीक्षक पदी नियुक्ती

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील खतगाव येथील सौ. मंजुळाबाई उच्च माध्यमिक विद्यालयातील गणित विषयाचे प्राध्यापक जयपाल नरसिंग वट्टमवार यांचे चिरंजीव तुषार वट्टमवार यांची नुकतीच भारत



सरकारच्या वित्त मंत्रालय अंतर्गत केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळात निवड झालेली असून,त्यांची कर्नाटक राज्यातील बेळगाव येथील आयकर विभागाच्या 'कार्यालयीन अधीक्षक' पदावर २१ सप्टेंबर रोजी सेवेत नियुक्त झाले आहेत. स्टाफ सिलेक्शन कमिशन अर्थात 'कर्मचारी चयन आयोगा' मार्फत कंबाईन्ड ग्रॅज्युएट लेव्हल एक्झाम अर्थात 'संयुक्त पदवी स्तरावरील परीक्षा' घेण्यात आली होती.त्यामध्ये मूळ देगलूर तालुक्यातील देगाव येथील तुषार जयपाल वट्टमवार यांनी जिद्द व चिकाटीने अभ्यास करत सदरील स्पर्धा परीक्षेत यश संपादन करीत आयकर विभागात कार्यालयीन अधीक्षक पदास गवसणी घातली आहे.त्यांनी या मिळविलेल्या यशाबद्दल खतगांव येथील साई शिक्षण मंडळ संस्थेचे संस्थापक सचिव बाळासाहेब पाटील खतगांवकर, प्राचार्य मारोती पिन्नलवार,उपप्राचार्य रमेश वासरे,पतपेढी चेअरमन हाणमंतराव कदम पाटील यांच्यासह संस्थेअंतर्गत सर्व प्राध्यापक, शिक्षक,शिक्षकत्तेर कर्मचाऱ्यांनी तुषार वट्टमवार यांचे अभिनंदन केले आहे.

## पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार महाकुंभ स्थगित

**नांदेड** -भारत निवडणूक आयोगाने औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, संबंधित निवडणूक क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. या पार्श्वभूमीवर दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेला रोजगार महाकुंभ पुढील आदेशापर्यंत तात्पुरत्या स्वरूपात स्थगित करण्यात आला आहे.

## पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वसुंधरा पायी दिंडी नाणीजकडे रवाना



**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २८ सप्टेंबर -**

जगद्गुरु श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने पर्यावरण संवर्धनाचा महामंत्र आणि अध्यात्माचा पवित्र संदेश जनमाणसात पोहोचण्याच्या उद्देशाने वसुंधरा पायी दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे ही पर्यावरण जागृतीची महायात्रा जूक्कल तेलंगणा उपपिठावरून भक्तीमय वातावरणात २७ सप्टेंबर रोजी नाणीजच्या दिशेने मार्गस्थ झाली आहे.

वसुंधरा पायी दिंडीच्या माध्यमातून केवळ आध्यात्मिक संदेश न देता पर्यावरण संवर्धनाचा प्रत्यक्ष कृतीचा संदेश दिला जाणार आहे. दिंडीच्या मार्गावरील विविध गावांमध्ये ग्राम स्वच्छता,प्लास्टिक मूक्त गाव, पाणी अडवा पाणी जिरवा,पर्यावरण संवर्धन प्रत्यक्ष वृक्षारोपण या त्रिसूत्रीवर आधारित उपक्रम राबविण्यात येणार आहेत वृक्षारोपणा सोबतच लावलेल्या झाडाचे संगोपन व संवर्धन, परिसर स्वच्छ ठेवणे निसर्गाप्रती कृतज्ञतेची भावना निर्माण करणे या उद्देशाने जनजागृती केली जाणार आहे दिंडीमध्ये सहभागी होणाऱ्या धामयात्रेकरुंची कोणत्याही प्रकारचा त्रास होणे यासाठी सोबत वैद्यकीय पथक, सुरक्षा पथक, फिरते शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

हि पाईदिडी तेलंगणा राज्यातील जूक्कल, कर्नाटक राज्यातील औराद, भालकी, बस्वकल्याण महाराष्ट्रातील उमरगा, सोलापूर, सांगोला, मंगळवेढा, कोल्हापूर,, मलकापूर मार्गे ६०५ कि. मी चा २५ दिवस प्रवास करून दि. २१आक्टोबर रोजी नाणीज येथे जगदगूरू नरेंद्रचार्यजी यांच्या वाढदिवस सोहळ्यात उपस्थित राहणार आहे.सर्वांनी ऐक तरी झाड लावेल व त्याचे सगोपण करेल अशी भूमिका घेत पाईदिन्डीत काहि अतर चालावे असे आवाहन तेलंगणा उपपिठा तर्फे करण्यात आले आहे.

# नऊ महिन्यांपासून तुटलेला धाबा दुरुस्तीच्या प्रतीक्षेत!

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २८ सप्टेंबर -**

शहरातील प्रभाग क्रमांक ६ मध्ये नाल्यावरील धाबा तुटून जवळपास नऊ महिने पूर्ण होत आले आहेत. मात्र, अद्याप या ठिकाणी दुरुस्ती अथवा नवीन बांधकाम करण्यात आलेले नाही. त्यामुळे नागरिकांना धोकादायक परिस्थितीतून ये-जा करावी लागत असून, नगर परिषद प्रशासनाच्या कारभाराबाबत नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

प्रभाग क्रमांक ६ मध्ये गंगाधर राजेवाड व खंडू धोंडगे यांच्या घराजवळील नाल्यावरील धाबा तुटलेला आहे. सध्या नाल्यावर तात्पुरत्या स्वरूपात लाकडी फळ्या ठेवण्यात आल्या असल्या तरी त्या सुरक्षित नसल्याचे चित्र दिसत आहे. नाल्याचा मोठा भाग उघडा पडला असून त्यामध्ये सांडपाणी साचलेले आहे. तसेच नाल्याच्या कडेला लोखंडी सळ्या उघड्या झाल्याने नागरिकांच्या पायाला दुखापत होण्याचा धोका निर्माण झाला आहे.



या मार्गावरून वृद्ध, महिला, लहान मुले तसेच दुचाकीस्वारांची नियमित ये-जा असते. त्यामुळे रात्रीच्या वेळी अथवा पावसाळ्यात हा उघडा नाला अधिक धोकादायक ठरू शकतो. एखादी दुर्घटना घडल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

विशेष म्हणजे, या समस्येबाबत नगर परिषद प्रशासन तसेच संबंधित लोकप्रतिनिधींना वारंवार सूचना करण्यात आल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, नऊ महिने उलटूनही कोणतीही कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांच्या संयमाचा अंत होत असून, प्रशासनाने तातडीने या ठिकाणी नवीन धाबा बांधून नाला सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे.

उघड्या नाल्यात कचरा व साचलेल्या दूषित पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी तसेच आरोग्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, शहरातील इतरही काही प्रभागांमध्ये नाल्यांवरील धाबे, रस्ते आणि सार्वजनिक सुविधांची अशीच दुरवस्था झाल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे नगर परिषद प्रशासनाने संपूर्ण शहरातील धोकादायक ठिकाणांचे सर्वेक्षण करून तातडीने दुरुस्तीची कामे हाती घ्यावीत, अशी मागणी होत आहे.

तुटलेल्या धाब्याची तातडीने दुरुस्ती करून नागरिकांना सुरक्षित मार्ग उपलब्ध करून न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

## व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेतील पत्रकारांच्या विविध प्रश्नावर विचार मंथन

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २८ सप्टेंबर -**

व्हॉईस ऑफ मीडिया इंटरनॅशनल फोरमच्या वतीने दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी नांदेड येथील शासकीय विश्रामगृह येथे संस्थापक अध्यक्ष संदीप भाई काळे यांच्या नेतृत्वाखाली मराठवाडा अध्यक्ष डॉ.गणेश जोशी व जिल्हा अध्यक्ष तुकाराम सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली संघटनेचे पदाधिकारी व जिल्ह्यातील पत्रकार यांच्या सोबत बैठक घेण्यात आली. या बैठकीत पत्रकारांच्या दैनंदिनी कुटुंबाशी निगडित असलेल्या समस्यांवर तीन तासांच्या चर्चेत सर्व बाबींचे विचार मंथन करण्यात आले व संघटना मजबुती करण्यावर भर देण्यात आला.

नांदेड जिल्हा येथे पार पडलेल्या व्हॉईस ऑफ मीडियाच्या बैठकीत नांदेड जिल्ह्यातील जवळपास सर्वच तालुका अध्यक्षांच्या उपस्थितीत व्हॉइस ऑफ मीडिया जागतिक पत्रकार संघटनेच्या माध्यमातून स्थानिक ग्रामीण भागातील पत्रकारांच्या आजच्या स्थितीत कोणती प्रश्न भेडसावत आहेत. त्यावर विचार मंथन करून आपण सर्वांनी एका ताकतीनिशी सोडविण्याचा प्रयत्न करू असे मत मराठवाडा अध्यक्ष डॉ. गणेश जोशी यांनी मांडले तर जिल्हा अध्यक्ष तुकाराम सावंत यांनी आपले मत व्यक्त करताना सांगितले तालुक्यात कोणतीही समस्या



उद्धवल्यास मी माझ्या वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली माझ्या परीने

आहोरात्र सोडविण्याचा प्रयत्न करीन. यावेळी इलेक्ट्रॉनिक मीडिया विंगचे जिल्हाध्यक्ष शेख याहीया यांनी महत्त्वाचे मार्गदर्शन केले.या झालेल्या सर्व जिल्हा, तालुका अध्यक्ष व पत्रकार बांधव यांच्यात विविध समस्यावर चर्चा करण्यात आली. यावेळी पत्रकारांचे आरोग्य, पत्रकारांच्या पाल्याचे शिक्षण, हक्काचे संरक्षण, पत्रकारांचे मानधन, पत्रकारांच्या घरांचा प्रश्न या पंचसूत्रीच्या माध्यमातून पत्रकारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी नांदेड जिल्ह्यातील व्हॉईस ऑफ मीडिया टीमने संघटित राहून एका विचाराने सर्व प्रश्न सोडविण्याचा निश्चय केला. यावेळी नांदेड जिल्ह्यातील सर्व वर्तमानपत्राचे व इलेक्ट्रॉनिक मीडियाचे प्रतिनिधी, व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी, पत्रकार यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे : पालकमंत्री अतुल सावे

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २८ सप्टेंबर -**

पावसाने दीर्घ खंड दिल्यामुळे हदगांव तालुक्यासह बामणी फाटा परिसरातील बरडशेवाळा पिंपरखेड मनाठा तिन्ही महसूल मंडळातील, परिसरातील खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद हळद यांसह अन्य पिकांवर पावसाअभावी मोठा परिणाम झाला असून जवळपास खरीप हंगाम पुर्णत गेला असून अद्याप मोठा पाऊस झाला नसल्याने रब्बी हंगामासह पाणीटंचाई जनावरांसाठी चा-याचा प्रश्न गंभीर बनला असल्याने शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे टाकले आहे.

या पार्श्वभूमी वर नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी आ. बाबुराव कदम कोहळीकर यांच्या समवेत हदगांव तालुक्यातील शिबदरा-जगापूर भोकर कडे जाताना हदगांव तामसा रोडवर डोरली शेतशिवारात प्रत्यक्ष भेट देऊन पीक परिस्थितीची पाहणी केली. यावेळी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

दुष्काळसदृश परिस्थितीची शासनाने गंभीर दखल घेतली असून शेतकऱ्यांच्या पाठीशी पूर्णपणे शासन खंबीरपणे उभे आहे.अशा गंभीर परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर न सोडता सर्वतोपरी मदत केली जाईल. असा धीर देत दिला. प्रत्यक्ष थेट शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पूर्ण परिस्थितीची पाहणी करून नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश प्रशासनाला देण्यात आले आहेत. पंचनामे व प्रत्यक्ष पाहणीच्या आधारे बाधित शेतकऱ्यांना मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला जाईल, अशी ग्वाही पालकमंत्री अतुल सावे यांनी दिली. यावेळी जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्यासह जिल्हा, तालुका प्रशासनाचे विविध विभागातील अधिकारी कर्मचारीवर्ग भाजपाचे जिल्हा अध्यक्ष किशोर देशमुख, तातेराव वाकोडे , संभाजीराव लांडगे, व्यंकटेश लोणे , तुकाराम चव्हाण, चंद्रशेखर कदम, हदगाव भाजपा तालुका अध्यक्ष सूर्यकांत हनवते डॉ.बि.के.निळे, धनंजय पाटील, मजितखान पठाण , बाला पाटील, दिलीप पाटील बल्लाळ यांच्यासह भाजपा पदाधिकारी महायुतीतील घटक पक्षाचे पदाधिकारी कार्यकर्ते राजकीय सामाजिक विविध क्षेत्रातील मंडळीसह शेतकरी शेतमजूर बांधव उपस्थित होते.

# ज्ञानेश कुमार यांच्या विरोधात काँग्रेसचे जोरदार निषेध आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ सप्टेंबर -**

भारताचे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी निवडणूक प्रक्रियेत केलेल्या भ्रष्ट कारभार व वोट चोरी विरोधात दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खासदार रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वात आणि उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार यांच्या पुढाकाराने शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयापुढे सोमवार (ता.२८) रोजी जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी ज्ञानेश कुमार यांच्या राजिनाम्याची मागणी करण्यात आली.

निवडणूक आयोगाने निपक्षपाती काम करणे अपेक्षित असताना ज्ञानेश कुमार यांच्या निवडणूक आयोगाने भाजपा हिताचे काम केले आहे.




याबाबत वेळोवेळी लोकसभा विरोधी पक्षनेते खा. राहुल गांधी यांनी पर्दाफाश केला आहे. हल्लीच एका राष्ट्रीय प्रसारमाध्यमाने निवडणूक आयोगातील मतभेद जगजाहीर करत वोटचोरीवर शिक्कामोर्तब केला आहे, यामुळे ज्ञानेश कुमार यांनी तातडीने राजिनामा द्यावा असे प्रतिपादन खा. रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केले. यावेळी माजी आ.माधवराव पाटील जवळगावकर, उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफ्फार, डॉ. यशपाल भिंगे, डॉ. श्रावण रँपनवाड, डॉ. रेखाताई चव्हाण, सुरेंद्र घोडजकर, राजेश पावडे, अब्दुल सत्तार, आनंद चव्हाण, संजय बेळगे, संजय कऱ्हाळे, प्रा. आनंत राऊत, कुमार कुर्तडीकर, महेश देशमुख तरोडेकर, प्रा.मनुरकर, आनंदराव गुंडिले, नगराध्यक्ष रफिक भाई, नगरसेवक मुन्ना अब्बास, सत्यपाल सावंत, पाशा भाई, शोहब हुसेन, मोसिम खान, शहबाज फहिज, राजू गोडबोले, मो. इब्राहिम, सचिन टाले, सुरेश हटकर, गोविंद बाबा गोंड, विनोद कांनचगिरे, तातेराव शिंदे, अजिज कुरेशी, मुन्तजिब, अतुल पेदेवाड, गणेश ढगे, शंकर शिंदे, सुरज शिंदे, अक्षय नळगे, ज्योती कदम, जेशिका शिंदे, नसिम पठाण, सुरेखा वैद्य, विमल किर्तने, शेर अली, गगन यादव, प्रविण कानगुले, दिपकसिंग हुजारिया, बापूसाहेब पाटील, अब्दुल रहिम, रमेश चित्ते, आनंद कल्याणकर, संदीप देशमुख, संजय वाघमारे, शिवहरी गाडे, निरंजन पावडे, नागराज सुलगेकर, राजू बोळसेकर, अभिलाष पावडे, व्यंकट मोरे, प्रताप देशमुख, जसपालसिंघ तबेलेवाले, आंबादास रातोळे, संदीप काळबांडे, महेश चव्हाण, विजय सोंडारे,पंजाब चव्हाण,अलिम खान, सय्यद रिहान, उत्कर्ष सोंडारे, गोविंद पाटील,किशन कदम, प्रसेनजित वाघमारे, अब्दुल वहाब, भिवाजी कदम, अनिल कदम, अमोल कदम, श्रीकांत जोगदंड, प्रल्हाद गव्हाणे, देविदास कदम, एसपी कुंभारे, लतीफ शेख, नुरोद्दीन शेख, प्रभू उरुदवाड, शेख असलम,आदित्य सोंडारे,प्रकाश दिपके, अजहर शेख आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.